CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ६ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २०८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्वाचा नारा अमेरिकेच्या स्वातंत्र्य चळवळीतून उद्भवला आहे. 'स्वातंत्र्य' आणि 'स्वदेशी' विश्वाचे शाश्वत मूल्य आहे. स्वातंत्र्य प्राप्त करणे हा जसा प्रत्येक देशाचा जन्मजात अधिकार आहे त्याचप्रमाणे मिळविलेल्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याकरिता स्वदेशीच्या मार्गाने वाटचाल करणे हे त्या राष्ट्राचे परम कर्तव्य आहे. 'स्वदेशी'चा विसर पडणे म्हणजे पारतंत्र्याला आमंत्रण देणेच होय.

**- बिंदुमाधव जोशी**
संस्थापक अध्यक्ष,
अखिल भारतीय ग्राहक पंचायत

# काँग्रेसचे माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रेंचा शिवसेनेत प्रवेश

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत अक्कलकोटमध्ये झाला भव्य पक्षप्रवेश सोहळा
- कार्यक्रमास यायला ८ तास उशीर; साष्टांग दंडवत घालत शिंदेंनी अक्कलकोटकरांची मागितली माफी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.५ जून**

सिध्दाराम म्हेत्रे तुमच्या पाठीशी श्री स्वामी समर्थ, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आहे. घाबरू नका मी दिलेला शब्द पाळणारा शिवसैनिक आहे. मी अनेक अडचणीवर मात करीत तुम्हाला व तुमच्या टीमला शिवसेनेत प्रवेश देण्यासाठी येथे आलो आहे. सिध्दाराम म्हेत्रे हे फार जुने अनुभवी नेते असल्याने जिल्ह्यामध्ये शिवसेनेला फार मोठा उपयोग होणार असून शिवसेनेमुळे अक्कलकोट, मैदर्गी दुधणीचा विकास होईल. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकित भगवा फडकवायच आहे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

म्हेत्रे यांच्या पक्षप्रवेश सोहळ्यास येण्यासाठी तब्बल ८ तास उशीर झाल्यामुळे शिंदे यांनी कार्यक्रमास उपस्थित असलेल्यांसमोर सांष्टांग दंडवत घालत माफी मागितली. शिंदेंच्या या कृतीमुळे उपस्थितांमधून त्यांचे कौतुकही ऐकावयास मिळाले. अक्कलकोट येथील काँग्रेसचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे त्यांचे बंधू शंकर म्हेत्रे यांच्यासह माजी नगराध्यक्ष, माजी सभापती, माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य सरपंच, सोसायटी चेरमनसह हजारो कार्यकर्त्यांनी शिवसेनामध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी बोलतना शिंदे म्हणाले की, सिध्दाराम आणि शंकर यांची जोडी राम-लक्ष्मण सारखी आहे. त्यांचे काम अतुलनीय आहे. जमीनीवर पाय ठेवून वावरणारा कार्येकर्त्यांचा नेता अशी सिध्दाराम यांची प्रतिमा आहे. त्यांनी उभे आयुष्य काँग्रेस मध्ये घालवले असून आता काँग्रेस दिशाहीन पक्ष आहे. एके दिवशी विरोधकांचे सगळे तंबू रिकामे होतील.



(उर्वरित वृत्त पान २ वर)

## महत्त्वाचे

### सोलापूर-पुणे महामार्गावर अपघात, ३० जखमी

**सोलापूर :** सोलापूर-पुणे महामार्गावर आढेगाव शिवारात बस चालकाला झोप लागल्यामुळे एक खासगी बस खड्यात उलटली. गुरुवारी पहाटे ४ च्या सुमारास हा मोठा अपघात झाला. या अपघातात पुणे व मराठवाड्यातील तब्बल ३० प्रवाशी जखमी झालेत. त्यापैकी २० जण गंभीर जखमी असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. अपघातग्रस्त बस (एमएच ४८ के १९१८) ही बुधवारी रात्री उशिरा लातूरच्या शिरपूर येथून पुण्याच्या दिशेने निघाली होती. सोलापूर पुणे महामार्गावरील आढेगाव शिवारात ती भरधाव वेगात खड्ड्यात उलटली. यावेळी मोठा आवाज झाला. हा आवाज ऐकूण आसपासच्या लोकांनी व इतर वाहनचालकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ जखमींना रुग्णालयात पोहोचवले. या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरण

### पोलिस आयुक्तांसह ८ अधिकारी निलंबित

**बंगळुरू :** बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणात, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पोलिसांना आरसीबी आणि डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट एजन्सीच्या अधिकाऱ्यांना अटक करण्याचे आदेश दिले. तसेच, बंगळुरू पोलिस आयुक्तांसह ८ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. पोलिस आयुक्तांव्यतिरिक्त, निलंबित अधिकाऱ्यांमध्ये अतिरिक्त पोलिस आयुक्त, क्यूबन पार्क पोलिस स्टेशनचे प्रभारी, एसीपी, डीसीपी सेंट्रल डिव्हिजन, क्रिकेट स्टेडियमचे प्रभारी, स्टेशन हाऊस मास्टर, स्टेशन हाऊस ऑफिसर यांचा समावेश आहे. आरसीबीच्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी जबाबदार असलेल्यांवरही कारवाई केली जाईल. इव्हेंट मॅनेजमेंट एजन्सी डीएनए, केएससीएच्या अधिकाऱ्यांना अटक केली जाईल.

### रशियाचा युक्रेनवर हल्ला; ५ ठार, २४ जखमी

**कीव :** ५ जून युक्रेनने केलेल्या ड्रोन हल्ल्यानंतर आम्ही बदला घेवू, असा निर्धार रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवरुन संवाद साधताना व्यक्त केला होता. यानंतर काही तासांमध्येच रशियाने युक्रेनच्या उत्तरेकडील प्रिलुकी, चेर्निहिव्हसह तीन शहरात बुधवारी रात्री जोरदार ड्रोन हल्ले केले. यात ५ नागरिकांचा मृत्यू तर २४ जण जखमी झाले. यावेळी अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या असून ढिगाऱ्याखाली अनेक लोक दबले असून बचावकार्य सुरू आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी युक्रेन आणि इराणच्या मुद्यावर ७५ मिनिटे फोनवरून चर्चा झाली, अशी माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर पोस्टद्वारे दिली होती. पुतिन यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली; मात्र याचा अर्थ असा नाही की, तत्काळ शांतता निर्माण होईल.

# एक कोटींचे बक्षीस असलेला नक्षली सुधाकर ठार

◆ **बिजापूर, ५ जून**

महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि छत्तीसगड राज्यांना हवा असलेला केंद्रीय समिती सदस्य आणि वरिष्ठ नक्षली कमांडर सुधाकर ऊर्फ नरसिंहचलम हा छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात झालेल्या चकमकीत ठार झाला आहे. त्याच्यावर विविध राज्यांचे १ कोटी रुपयांचे बक्षीस होते, असा दावा केला जात आहे. राष्ट्रीय उद्यान परिसरात ही चकमक उडाली आहे.

तेलंगणा राज्य समितीचे सदस्य बंदी प्रकाश, दंडकारण्य विशेष क्षेत्रीय समितीचे सदस्य पप्पा राव आणि काही इतर सशस्त्र माओवादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर संयुक्त दल नक्षलवादी कारवाईवर निघाले होते.

यामध्ये पोलिसांबरोबर कोबरा बटालियनचा समावेश आहे. सुरक्षा जवान राष्ट्रीय उद्यान परिसरात पोहचल्यानंतर जंगलात दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला. सावध असलेल्या जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. या चकमकीत सुधाकर ठार झाला तर त्याचे कित्येक साथीदार जखमी झाले. सुधाकर ठार होणे सुरक्षा दलांसाठी मोठे यश मानले जात आहे. घटनास्थळावरून शस्त्रेही जप्त करण्यात आली असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बिजापूरचे पोलिस अधीक्षक डॉ. जितेंद्र यादव म्हणाले, सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत सेंट्रल कमिटीचा सदस्य सुधाकर मारला गेला. परिसरात शोधमोहिम सुरू असून चकमकीत मारल्या गेलेल्या नक्षल्यांच्या संख्येत वाढ होवू शकते. चकमकीतदरम्यान मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आले. (वृत्तसंस्था)

### सुधाकर मूळचा आंध्रप्रदेशचा



नरसिंहचलम उर्फ गौतम उर्फ सुधाकर मूळचा आंध्र प्रदेशातील चिंतापलुडी येथील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच्यावर वेगवेगळ्या राज्यांत सुमारे १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. अनेक राज्यांचे पोलिस त्याचा शोध घेत होते.

### नक्षल्यांना दुसरा मोठा धक्का

मे महिन्यात बस्तरमध्ये झालेल्या चकमकीत नम्बाला केशवराव ऊर्फ बसवराजू याला चकमकीत ठार केले. त्याच्यासोबत इतर २९ नक्षलवादीही ठार झाले होते. बसवराजूही केंद्रीय समितीचा महासचिव होता आणि तो १९७० पासून नक्षली चळवळीत सक्रिय होता. १६ मे रोजी सुकमा येथील चकमकीतही १६ नक्षली ठार झाले होते. बसवराजूनंतर सुधाकरच्या रूपाने नक्षलवाद्यांना बसलेला दुसरा मोठा धक्का मानला जात आहे.

# लाडक्या बहिणींना १५०० मिळण्यास सुरुवात

- लाभार्थी महिलांच्या आधार लिंक्ड बँक खात्यात जमा होणार निधी

**मुंबई, दि. ५ जून-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेंतर्गत मे महिन्याचा हप्ता वितरणास सुरूवात केली आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी स्वतः ही माहिती दिली आहे.

महायुती सरकारने गतवर्षी जुलै महिन्यात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. तेव्हापासून आतापर्यंत महिलांना १० हप्ते मिळालेत. पण मे महिना संपला तरी अद्याप महिलांना ११ वा हप्ता नव्हता. पण आता हा हप्ता जमा होत आहे. लाभार्थी महिलांना तसे मेसेज मिळण्यास सुरूवात झाली आहे. मंत्री अदिती तटकरे यांनी बुधवारी रात्रीच एका पोस्टद्वारे मे महिन्याचा हप्ता वितरित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले होते. त्या म्हणाल्या होत्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना मे महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार लिंक्ड बँक खात्यात हा सन्मान निधी जमा होणार आहे.

### आधार लिंक असलेल्याखात्यांत पैसे

अदिती तटकरे यांच्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेचा निधी आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात जमा होत आहेत. त्यामुळे एखाद्या लाभार्थी महिलेला पैसे जमा झाल्याचा मेसेज आपला नसेल तर त्यांनी बँकेत जाणून आपल्या खात्याची स्थिती जाणून घ्यावी. संबंधित बँकेचे ॲप असेल तर त्यातही त्यांना हा निधी जमा झाला किंवा नाही हे पाहता येईल. तूर्त या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या लाखांत असल्यामुळे सर्वांच्या खात्यात पैसे जमा होण्यास ३-४ दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे आज तुमच्या पैसे आले नसतील तर तुम्हाला पुढील एक-दोन दिवस वाट पहावी लागेल.




सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत उद्बोधन करताना. शेजारी राजेश लोया, अरविंद नेताम, समीरकुमार मोहंती व दीपक तामशेट्टीवार

# सुरक्षेसाठी आत्मनिर्भर व्हावेच लागेल

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

### 'कार्यकर्ता विकास वर्ग द्वितीय'चा समारोप

◆ **नागपूर, ५ जून**

देशात गेल्या काही दिवसांत एक वेगळेच वातावरण होते. पहलगामच्या घटनेचा बदला घ्यावा अशी समाजातील प्रत्येकाची भावना होती. ही देशाची इच्छा होती. त्यानंतर भारतीय सेनेची वीरता आणि क्षमता दिसली. सेनेला आदेश देणाऱ्या शासन- प्रशासनाचीही दृढता आम्ही पाहिली. केवळ एवढे करून ही स्थिती बदलणार नाही, तर आपल्याला आपली सुरक्षा करण्यासाठी स्वनिर्भर व्हावेच लागेल, असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

नागपुरात 'कार्यकर्ता विकास वर्ग द्वितीय'चा समारोप आज रेशीमबाग मैदानावर झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय मंत्री अरविंद नेताम उपस्थित होते. व्यासपीठावर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, प्रमुख पाहुणे अरविंद नेताम, विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, नागपूर महानगर संघचालक राजेश लोया, सर्वाधिकारी समीरकुमार मोहंती उपस्थित होते, तर विशेष अतिथी म्हणून अमेरिकेतून आलेले बिल शुस्टर, बॉब शुस्टर, ब्रॅडफोर्ट एलिसन, वॉल्टर रसेल मिड आणि बिल ड्रेक्सेल उपस्थित होते.

सरसंघचालक पुढे म्हणाले, आता युद्धाचे प्रकार बदलले आहेत. थेट समोरासमोर युद्ध न करता 'प्रॉक्सी वॉर' केले जाते. आता झालेल्या युद्धानंतर सर्व राजकीय पक्ष एकत्र आले. हे एक उत्तम चित्र आहे. उत्तम लोकशाहीचे हे उत्तम उदाहरण आहे. जोपर्यंत द्विराष्ट्रवाद आहे, तोपर्यंत मात्र असे प्रकार संपणार नाहीत. या युद्धानंतर कोण आपला आहे आणि कोण विरोधक आहे, हे स्पष्ट झाले आहे. सुरक्षेसाठी विविध प्रयोग केले जातात. ते केलेच पाहिजे. पण केवळ तेवढ्याने होणार नाही. त्यात समाजाची साथ असणे आवश्यक आहे. देशहितासमोर काहीच महत्त्वाचे नसते. आपण आपसात सद्भावनेचा व्यवहार ठेवला पाहिजे. सध्या भडकविणारे लोक समोर आले आहेत. 'व्हिक्टिम हूड' करणारे लोक आहेत. त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे.

गेल्या ९८ वर्षांपासून नागपुरात हे वर्ग सुरू आहेत. त्यात समाजाला मदत करणारे स्वयंसेवक तयार केले जातात. संघाचे काम पाण्याच्या थेंबाप्रमाणे आहे. ते हळूहळू समाजात मुरते. जसा पाण्याचा थेंब जमिनीत मुरतो आणि जमिनीतील बी रुजून पीक तयार होते, त्याप्रमाणेच संघाची काम करण्याची पद्धत असल्याचे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### आपले मूळ एकतेतच

आपला देश जरी विविधतेने नटलेला असला तरी आपले मूळ एकतेतच आहे. आपली भाषा, धर्म, पूजा पद्धती, राहणीमान जरी वेगवेगळे असले तरी आपण एकोप्याने राहिले पाहिजे. कारण आपण सारे एकच आहेत. जगातील पूर्ण मानवजात एक आहे. असे विविधतेला स्वीकारून एकतेत राहणे भारतालाच जगासमोर ठेवावे लागेल.

### आदिवासी हा आमचाच समाज

आदिवासींची सध्या खूप वाईट स्थिती आहे. त्यामुळे आदिवासी समाजाला संघाने मदत करावी, अशी मागणी माजी केंद्रीय मंत्री अरविंद नेताम यांनी त्यांच्या भाषणात केली. त्यावर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, आदिवासी हा आमचाच समाज आहे. संपूर्ण हिंदू समाजाला संघ एकच मानतो. या समाजाच्या उद्धारासाठी संघ निश्चितच मदत करेल. संघ सर्वांना सोबत घेऊन काम करतो. याआधीपासूनच आदिवासी समाजासाठी संघाचे काम सुरू आहे. आताही संघ मदत करायला तयार आहे. आम्ही समाजाच्या बळावर काम करतो. ज्यांच्यासाठी काम करायचे आहे, त्यांना सोबत घेऊनच काम करू.

### आम्हाला मदत करा : अरविंद नेताम

आदिवासी समाजासमोर सध्या दोन समस्या आहेत- धर्मांतरण आणि नक्षलवाद. या दोन समस्या सोडविण्यासाठी संघाने आदिवासी समाजाला मदत करावी, अशी मागणी माजी केंद्रीय मंत्री अरविंद नेताम यांनी भाषणातून केली. ते म्हणाले की, बस्तरमध्ये आदिवासी समाजाचे मोठ्या प्रमाणात धर्मांतरण सुरू आहे. त्यापासून त्यांना वाचविले पाहिजे. यासाठी धर्मकोड तयार करण्याची मागणी त्यांनी केली. आदिवासी समाजाची ओळख कायम राहण्यासाठी हे आवश्यक असल्याचे ते म्हणाले, तर नक्षलवादावर आता नियंत्रण आले आहे. पण तो पूर्णपणे संपला पाहिजे. नक्षलवादाने पुन्हा डोके वर काढू नये यासाठी ठोस उपाय करणे गरजेचे आहे. आदिवासी समाज नक्षलवादाकडे वळू नये यासाठी त्यांना मदत करण्याची मागणी नेताम यांनी केली.

# 'रघुपती आले, सीता आली; आज अयोध्या पावन झाली!'

## 'राम दरबारची' मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा

◆ **अयोध्या, ५ जून**

अयोध्येतील राम मंदिरामध्ये आज गुरुवारी अभिजित मुहूर्तावर अतिशय उत्साह व चैतन्यमयी वातावरणात रामदरबारची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानिमित्त श्री रामजन्मभूमी असलेली अयोध्यानगरी पुन्हा एकदा सजली होती. यानिमित्त पुन्हा एकदा अयोध्येत श्रीरामांच्या नावाचा प्रचंड जयघोष करण्यात आला. श्रीराम मंदिराच्या पहिल्या मजल्यावर बांधलेल्या रामदरबाराचा अभिषेक, पूर्ण विधी आणि धार्मिक अनुष्ठानांसह पार पडला आहे. या अनुपम आणि ऐतिहासिक सोहळ्याला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ देखील उपस्थित होते.



गोरक्षपीठाधीश्वर आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ गुरुवारी आपल्या ५३ व्या वाढदिवसानिमित्त अयोध्येत दाखल झाले. प्रारंभी त्यांनी श्री रामलला मंदिरात विधीपूर्वक दर्शन-पूजा केली आणि भगवान श्रीरामाची आरती केली.

मुख्यमंत्र्यांनी विविध मंदिरांमध्ये प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात भाग घेतला. या समारंभात, सिंहासनावर विराजमान असलेल्या भगवान श्रीराम यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, त्यांच्यासोबत माता जानकी, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न उभे होते तसेच भगवान बजरंगबलीच्या मूर्तीची देखील प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या भाविकांनी जय श्रीरामच्या गगनभेदी घोषणा देऊन उत्साही वातावरण निर्माण केले. यावेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास, सरचिटणीस चंपत राय, स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ अयोध्येत दाखल झाल्यानंतर प्रथम हनुमानगढी मंदिरात पोहोचले. येथे त्यांनी विधीपूर्वक भगवान बजरंगबली यांची पूजा केली. हनुमानगढीमध्ये पूजा केल्यानंतर ते श्री रामलला मंदिराकडे रवाना झाले. (वृत्तसंस्था)

- सेंट्रल टेक्सटाईल्स कारखाना आग प्रकरण

# कारखान्याच्या तीन मालकांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**

शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसीमधील सेंट्रल टेक्सटाईल्स कारखान्यात लागलेल्या आगीमध्ये ८ जणांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी सेंट्रल टेक्सटाईलच्या तीन मालकांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस उपनिरीक्षक विजय बनसोडे यांनी भूखंड ई-८३ चे परवानाधारक इशरत हनीफ मंन्सुरी, भूखंड ई-८४ चे परवानाधारक हानीफ उस्मानभाई मंन्सुरी आणि भूखंड ई-८५ चे परवानाधारक हाजी उस्मानभाई हशमभाई मंन्सुरी (मयत) यांच्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

१८ मे रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास अक्कलकोट रोड एमआयडीसीमधील सेंट्रल टेक्सटाईल्स या कारखान्याला आग लागली होती. या आगीमध्ये हाजी उस्मानभाई हशमभाई मंन्सुरी, अनस हानिफ मंन्सुरी, शिफा अनस मंन्सुरी, युसूफ अनस मंन्सुरी, महताब सय्यद बागवान, सलमान महताब बागवान, हिना महताब बागवान, आशबी महताब बागवान हे मृत्युमुखी पडले. याबाबत प्रशासनाच्या विविध विभागाकडून आगीच्या घटनेची चौकशी करण्यात आली. आगीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये कारखान्याचे मालक इशरत हनीफ मंन्सुरी, हानीफ उस्मानाभाई मंन्सुरी, उस्मानभाई हशमभाई मंन्सुरी हे चालवित असलेल्या कारखान्यात



विनापरवाना अनाधिकृत बांधकाम करून त्याठिकाणी मालक व कामगार यांना निवास करण्याची परवानगी नसतानादेखील निवास करून, सुरक्षिततेची कोणत्याही प्रकारची काळजी न घेता हयगय व निष्काळजीपणा केल्याचे दिसून आले. त्यामुळे लागलेल्या आगीमध्ये आठजणांचा मृत्यू झाला. त्या जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी भूखंड ई-८३ चे परवानाधारक इशरत हनीफ मंन्सुरी, भूखंड ई-८४ चे परवानाधारक हानीफ उस्मानभाई मंन्सुरी आणि भूखंड ई-८५ चे परवानाधारक हाजी उस्मानभाई हशमभाई मंन्सुरी (मयत) यांच्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

पान १ वरुन

## काँग्रेसचे माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रेंचा शिवसेनेत प्रवेश

सर्व सामान्य माणूस केंद्र बिंदू मानून काम करीत आहे. मी सत्ता सोडून बाहेर पडल. केवळ विचाराला तिलांजली नको म्हणून. सत्तेसाठी बाळासाहेबाचे विचार सोडला आणि आम्ही टांगा पलटी, घोडा फरार केलं. लाडकी बहीण योजना कधीही बंद केला जाणार नाही. प्रिंटिंग मिस्टिक म्हणून शब्द मोडणार नाही.पहलगाम घटनेत सैनिक पाकिस्तानाला धडा शिकवला. आघाडीच सरकार म्हणजे स्थगिती देणारा सरकार. आताचे विकासाचे सरकार आहे. व्यासपीठावर विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे,मंत्री दादा भुसे, संजय राठोड, आ. राजू खरे, माजी आ. शहाजी पाटील, प्रा. शिवाजी सावंत, माजी आ. रवींद्र गायकवाड, महेश साठे, मनीष काळजे, अमर पाटील, संजय कोकाटे, संजय देशमुख, अनिता माळगे, शंकर म्हेत्रे, प्रा. ज्योती वाघमारे, रईस टिनवाला, रमेश बारसकर, धनेश अचलेरे, अमोल शिंदे,दिग्विजय बागल, मुख्यमंत्री मदत कक्षाचे मंगेश चिवटे, शितल म्हेत्रे, रवीना राठोड, सद्दाम शेरीकर, बाबा पाटील, मतीन पटेल, शशी जाधव, पांडूरंग राठोड, आनंद सोनकांबळे, काशिनाथ घोडके, लाला राठोड, असपाक अकसापुरे, राजू शिंदे, वर्षा चव्हाण, सिद्धार्थ गायकवाड, रामचंद्र समाणे आदी जण उपस्थित होते.

### कोण काय म्हणाले...

विचारपूर्वक पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला. दिलेले शब्द पाळणारे नेता आहे. राजकारणातल पहिला नेता शिंदे. अनेकांची इच्छा होती शिंदे येथे येऊ नये म्हणून. देगाव जोडकालवा निधी वितरित करावा. तिन्ही न प च्या विकास साठी ३०० कोटींची निधी द्यावी. कुरनुर धरणावर पर्यटक विकास व्हावा. १४ गावाचे सिंचन प्रश्न मार्गी लावावा. विमानतळ व्हावा.

**- सिद्धाराम म्हेत्रे, माजी मंत्री**

माझं आणि म्हेत्रे यांच राजकिय प्रवास एकाच वेळी सुरू झाला. दोघही आज एकाच पक्षात हेच समाधान.एकनाथ शिंदे सारख पुनः मुख्यमंत्री होणार नाही.

**- शहाजी पाटील, माजी आमदार**

या सभेमुळे काहींना डोकेदुखी, ऍसिडिटी, झालेले आहे. म्हणून दुपारी सभेत चुकीचे मेसेज सोडले. शक्तीपीठ, महामार्ग, साठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रयत्न केला.

**- नीलम गोऱ्हे, विधान परिषद उपसभापती**

म्हेत्रे यांना शिवसेनेत आणत असताना विरोधकांनी माझ्या सह महिला शिवसैनिकांना फार मोठा त्रास दिला. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

**- महेश साठे, जिल्हाप्रमुख**

तालुक्यात कार्यक्रम होऊ नये म्हणून विरोधकांनी फत्तेसिह मैदान दिले नाही. आडकाठी आणले. याच अर्थ त्यांनी घाबरलेले आहेत. कोणीही घाबरू नका तुमच्या पाठीशी ,जातपात न बघता विकासाचे काम करणारे, कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत.

**- प्रा.ज्योती वाघमारे, प्रवक्त्या**

# पालकमंत्री जयकुमार गोरे आज सोलापुरात

## आषाढी वारी संदर्भात होणार पंढरीत आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ५ (जिमाका) ;**

पालकमंत्री जयकुमार गोरे हे शुक्रवार, दि. ६ जून २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, ते आज पंढरपुरात आषाढी वारी संदर्भात विविध स्थळांची पाहणी करून तयारीबाबत आढावा बैठकही घेणार आहेत.

शुक्रवार दि. ६ जून २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथून मोटारीने जिल्हा परिषद, सोलापूरकडे प्रयाण, सकाळी ८.४० वाजता जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर येथे आगमन, सकाळी ८.४५ वाजता शिवराज्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ- जिल्हा परिषद सोलापूर, सकाळी ९.३० वाजता जिल्हा परिषद सोलापूर येथून मोटारीने पंढरपूरकडे प्रयाण, सकाळी १०.३० वाजता पंढरपूर येथे आगमन व पंढरपूर शहरातील ६५ एकर पालखी स्थळ, वाळवंट व आषाढी वारी सबंधी सर्व स्थळांची विभागस्तरीय तसेच सोलापूर जिल्हास्तरीय अधिकारी व पंढरपूर नगरपालिका अधिकारी यांच्या समवेत पाहणी, सकाळी ११.३० वाजता कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे आगमन आषाढी वारी संदर्भात आढावा बैठक, स्थळ- रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील सभागृह, दुपारी १२.३० वाजता श्री संत सावता महाराज संजीवन समाधी मंदिर अरण तीर्थक्षेत्र पर्यटनस्थळ विकास आराखडा बाबत जिल्हास्तरीय समिती बैठक. स्थळ- रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील सभागृह, दुपारी १२.४५ वाजता कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथून शासकीय विश्रामगृह पंढरपूरकडे प्रयाण, दुपारी १२.५५ वाजता शासकीय विश्रागृह येथे आगमन व राखीव, दुपारी १.३० वाजता शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथून मोटारीने वाखरी, ता. पंढरपूरकडे प्रयाण, दुपारी १.४० वाजता वाखरी येथे आगमन-पालखी तळाची पाहणी, दुपारी २.०० वाजता वाखरी येथून मोटारीने भंडीशेगाव ता.पंढरपूरकडे प्रयाण, दुपारी २.१० वाजता भंडीशेगाव येथे आगमन व पालखी तळाची पहाणी, दुपारी २.३० वाजता भंडीशेगाव येथून मोटारीने वेळापूर, ता. माळशिरसकडे प्रयाण, दुपारी २.४५ वाजता वेळापूर येथे आगमन व पालखी तळाची पाहणी, दुपारी ३.०० वाजता वेळापूर येथून मोटारीने माळशिरसकडे प्रयाण, दुपारी ३.१० वाजता माळशिरस येथे आगमन व पालखी तळाची पहाणी, दुपारी ३.३० वाजता माळशिरस येथून मोटारीने नातेपुतेकडे प्रयाण, दुपारी ३.४० वाजता नातेपुते येथे आगमन व पालखी तळाची पाहणी, दुपारी ४.०० वाजता नातेपुते येथून मोटारीने बरड, ता. फलटण जि.साताराकडे प्रयाण करतील.





## टेंभुर्णी पोलिस ठाण्याकडून वृक्षदिंडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. ५ जून -**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सर यांच्या संकल्पनेतून हरित वारी उपक्रम अंतर्गत सोलापूर जिल्ह्यामध्ये ०५ जून ते ०४ जुलै पर्यंत १० लाख वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने गुरुवारी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून टेंभुर्णी पोलीस ठाणे कडून ''वृक्षदिंडी'' काढण्यात आली.

या वृक्षदिंडीमध्ये टेंभुर्णी पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार, रोटरी क्लब चे अध्यक्ष व सदस्य, टेंभुर्णी ग्रामपंचायत सरपंच व सदस्य व टेंभुर्णी शहरातील नागरिक, टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील, पत्रकार मित्र यांनी सहभाग घेतला होता. सदर कार्यक्रमामध्ये झाडे लावा झाडे जगवा, वृक्षवल्ली आम्हा सोयरे असे टाळ मृदंगाच्या गजरात वृक्ष लागवड करण्यात बाबत नागरिकांमध्ये संदेश देऊन आपापले गावांमधील मोकळी मैदाने, शासकीय कार्यालय, पालखी मुक्कामाचे ठिकाणी व पालखी मार्गावर दुतर्फा झाडे लावणे चे आवाहन आमचे सह रोटरी क्लब व ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णी यांचे वतीने करण्यात आले. तसेच वृक्षदिंडी कार्यक्रम संपल्यानंतर नागरिकांना कैलास पत्ती, रेन ट्री, कांचन, पिंपळ, कोणोकोरपस, चिंच, सिताफळ, आंबा, करंज या प्रकारच्या १५० रोपांची वाटप करण्यात आली.

### शिस्तभंगाची नोटीस ई-मेल, व्हॉट्सअॅपवरही

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवा आदेश

- व्यक्तिशः टपालाने पाठविण्याची पध्दतही कायम
- वेळेत उत्तर देता यावे, यासाठी शासन निर्णय जारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना शिस्तभंगाची नोटीस आता व्हॉट्सअॅप आणि ई-मेलवरही पाठवली जाणार आहे. शिस्तभंगाच्या नोटिशीला वेळेत उत्तर देता यावे आणि या संदर्भातील कारवाईला गती मिळावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय (जीआर) सामान्य प्रशासन विभागाने जारी केला.

सरकारी कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरू झाल्यास, शिस्तभंगाशी संबंधित दोषारोपपत्र, चौकशी अहवाल आदी कागदपत्रे व्यक्तिशः किंवा नोंदणीकृत टपालाने पाठवली जात. मात्र, अनेकदा ही कागदपत्रे संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचत नसल्याच्या तक्रारी होत्या. तसेच, कारवाईची नोटीस पाठविल्यानंतर म्हणणे मांडण्यासाठी दिलेली मुदत टळून गेल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याचीही प्रकरणे निदर्शनास आली होती. यामुळे राज्य सरकारने आधुनिक पद्धती अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. कारवाई सुरू असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर ही कागदपत्रे पाठवली जाणार आहेत. याशिवाय, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात व्हॉट्सअॅपद्वारेही नोटिसा पाठवण्याची सोय करण्यात आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना जलद माहिती मिळेल आणि त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधीही लवकर मिळेल.

विभागाच्या जीआरनुसार, सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी व्यक्तिशः किंवा टपालाने कागदपत्रे पाठवण्याची जुनी पद्धतही कायम राहणार आहे. त्याचबरोबर नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून काम काजाला गती देण्यावर भर दिला जाईल. सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना यापुढे सरकारी ईमेल आयडीच्या माध्यमातून नोटीस बजावता येणार असून, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना व्हॉट्स ॲपच्या माध्यमातूनही नोटीस बजावता येईल. संबंधित कर्मचाऱ्याने नोटीस मिळाल्यानंतर पोचपावती देणे बंधनकारक आहे. सरकारचा हा निर्णय शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्याच्या दिशेने महत्त्वाचा मानला जात आहे. यामुळे शिस्तभंगाच्या प्रकरणांचा निपटारा जलद होण्याची अपेक्षा आहे.

## राज्यात पुढील ३ दिवस पावसाची शक्यता

- सोलापूरसह काही जिल्ह्याला यलो अलर्ट
- जिल्हा आपत्ती विभागाची माहिती
- पाऊस पडल्यास पेरण्या लांबणीवर

### या जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' जारी

ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, धुळे, पुणे, पुणे घाटमाथा, जळगाव, नाशिक, सातारा, सातारा घाटमाथा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशिम.



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

राज्यात पुढील तीन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांमध्ये वादळी वाऱ्यासह, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. राज्यातील सोलापूरसह काही जिल्हे तसेच घाटमाथ्यावर हवामान विभागाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. दरम्यान, मागील काही दिवसांपासून मान्सूनची गती मंदावली आहे. जर पावसाने हजेरी लावली तर मात्र पेरण्या लांबणीवर पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्रासह विदर्भ आणि मराठवाडा भागांत पुन्हा वादळी वाऱ्यासह, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला आहे. राज्यात काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या गुजरात राज्यात हवेच्या वरच्या थरात चक्रीय स्थिती निर्माण झाली असून, ती स्थिती अद्यापही कायम आहे. यासोबतच बांगलादेशाच्या उत्तर भागातही अशीच चक्रीय स्थिती आहे, ज्याचा परिणाम महाराष्ट्रातील वातावरणावर होत आहे. या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर राज्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः दुपारनंतर पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता असून, सकाळच्या सुमारास हवामानात ऊन पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

## ▶▶ महत्त्वाचे...

### तरूणाला तलवारीने मारहाण

**सोलापूर, दि. ५ जून-**

मोदी रिक्षा स्टॉपजवळ तरूणाला तलवारीने मारून जखमी करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राहुल नागेश कदम (वय २३, रा. शामा नगर, झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन सोनू कांबळे (रा. मोदी रिक्षा स्टॉपजवळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ जून रोजी रात्री पावणे आकराच्या सुमारास मोदी रिक्षा स्टॉपजवळील अपडेट सलून दुकान येथे राहुल कदम यास त्याचा मित्र सोनू कांबळे याने मोबाईल फोनवरून फोन करून ऋतुराज घोडके याच्यासोबत बोलायचे आहे असे सांगून बोलावून घेतले. कदम हा अपडेट सलुन येथे खुर्चीवर बसला असताना कांबळे याने कदम यास शिवीगाळ करून तु ऋतुराजला बोलव असे म्हणून त्याच्या कमरेला असलेली तलवार हातात घेऊन कदम याच्या डाव्या दंडावर दोन ठिकाणी मारून त्यास जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार राठोड पुढील तपास करीत आहेत.

### चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ५ जून-**

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत माधुरी श्रीपाद बन (वय २१, रा. डोणगाव, ता. उत्तर सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती श्रीपाद, सासू अपर्णा, सासरे राजेंद्र, सासूची आई आशाबाई, सासूचे वडील हरिदास (सर्व रा. कासरी, ता. आष्टी, जि. बीड) यांच्याविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑगस्ट २०२१ ते २३ जून २०२४ या कालावधीत माधुरी या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती व इतरांनी माधुरी हिस लग्नात हुंडा कमी दिला, मानपान केला नाही, लग्नात केलेला खर्च १५ लाख रुपये व घरातून नेलेले १५ तोळे सोने घेऊन ये असे म्हणून तिचा शारीरीक व मानसिक छळ केला. तसेच चारित्र्यावर संशय घेऊन माधुरी हिस शिवीगाळ, दमदाटी व मारहाण करून शारीरीक व मानसिक जाचहाट छळ केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाल्मिकी पुढील तपास करीत आहेत.

### तरूणास फायटरने मारहाण करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ जून-**

तरूणास फायटरने मारहाण करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तौफिक जावीद बागवान (वय ३३, रा. मुक्तेश्वर नगर, शेळगी, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन नबीलाल रजाक शेख (रा. कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ जून रोजी तौफिक बागवान हा मोटारसायकलवरून घरी जात असताना राही मंगल कार्यालयासमोर नबीलाल शेख याने त्यास अडविले. मागील आठवड्यामध्ये बागवान याने शेख यास वापरण्यास दिलेली मोटारसायकल परत घेतल्याच्या कारणावरून चिडून रागात शेख याने बागवान यास शिवीगाळ करून फायटरने डोक्यावर, कानाखाली मारहाण करून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.

# अखेर घंटागाडी कामगारांचा संप मिटला

- किमान वेतन देण्याचा झाला सकारात्मक निर्णय
- आजपासून कामगार पूर्ववत कामावर होणार रुजू

### किमान वेतन आणि चार पगारी सुट्ट्या मिळणार : अतिरिक्त आयुक्त रवी पवार

संबंधित मक्तेदार आणि घंटागाडी कामगार यांची संयुक्त बैठक महापालिकेत घेतली. या बैठकीत मक्तेदाराने किमान वेतन प्रमाणे घंटागाडी कामगारांना वेतन द्यावे. महिन्यात चार दिवस पगारी सुट्ट्या देणे यासह विविध मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय झाला. दोन्ही बाजूंनी सूचना मान्य करण्यात आल्या. यामुळे अखेर हा संप मिटला आहे, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

**सोलापूर, दि. ५ जून-**

शहरातील कचरा संकलनाचे काम करणाऱ्या घंटागाडी कामगारांनी किमान वेतनासह अन्य मागण्यासाठी पुकारलेला संप अखेर दुसऱ्या दिवशी मिटला. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी गुरुवारी दुपारी मक्तेदार आणि घंटागाडी कामगारांची संयुक्त बैठक घेऊन निर्णायक तोडगा काढला. यामुळे शुक्रवारपासून सकाळी घंटागाडी कामगार पूर्ववत कामावर रुजू होणार आहेत.



सोलापूर शहरात महापालिकेने घंटागाड्याद्वारे कचरा संकलन करण्याचा मक्ता नाशिकच्या वॉटर ग्रेस कंपनीला दिला आहे. या घंटागाडीवर चालक आणि मदतनीस असे कामगार कार्यरत आहेत. या कामगारांच्या माध्यमातून शहरातील कचरा संकलनाचे काम करण्यात येते. दरम्यान, संबंधित मक्तेदाराकडून या घंटागाडी कामगारांना किमान वेतनाप्रमाणे पगार दिला जात नाही. प्रत्येक महिन्याला कमी रक्कम दिली जाते. काही तक्रार अथवा नाराजी व्यक्त केल्यास कामावरून काढण्याची धमकी दिली जाते. कमी वेतन दिल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अडचणीचे ठरत आहे. घंटागाडी कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत संतप्त कामगारांनी कालपासून संप सुरू केला होता. काल जुळे सोलापूर पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन हे केले होते. त्यामुळे त्या परिसरातील कचरा संकलनाचे काम ठप्प झाले होते.दरम्यान, दुसऱ्या दिवशी आज गुरुवारी दुपारी महापालिकेत अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी घंटागाडी मक्तेदार आणि कामगार प्रतिनिधींची बैठक बोलावली. यावेळी मक्तेदार तसेच विशाल नागटिळक, प्रवीण मसलखांब, तानाजी राठोड , अमोल चव्हाण, अविनाश इंगळे यांच्यासह कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दोघांनाही स्पष्ट सूचना दिल्या. मक्तेदारांनी घंटागाडी कामगारांना किमान वेतन दिले पाहिजे. काम गारांना महिन्यातून चार दिवस पगारी सुट्ट्या द्याव्यात. कामगारांना धमकी देऊ नये. मानसिक त्रास देऊ नये तर कामगारांनी नियमानुसार वेळेत प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. यावर शिक्कामोर्तब करण्यात आला. निर्णय तोडगा निघाला. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी ही शिष्टाई केली. सकारात्मक चर्चा आणि निर्णय झाल्यानंतर शुक्रवारी सकाळपासून कामावर जाणार असल्याचे घंटागाडी कामगारांनी सांगितले.

## आज मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत सोलापुरात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्यमंत्री मंगलप्रभात लोढा हे दि. ६ जून रोजी सोलापूर दौऱ्यावर येत असून, त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यातनन आले आहे. सकाळी १०.३० वाजता जिल्हा कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मंगळवेढेकर इन्स्टिट्युट, ऑफ मॅनेजमेंट डफरीन चौक येथे रोजगार मेळाव्याचे उद्घाटन ना. लोढा यांचे हस्ते होईल.

सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात शिवराज्यभिषेक दिनाचे औचित्य साधून लोणावळा येथील स्तंभकार पंकज जयस्वाल यांचे छत्रपती शिवाजी महाराज व सामाजिक समरसता या विषयावर व्याख्यान होईल. दुपारच्या सत्रात जिल्हा कौशल्य विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय येथे विभागाशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यात एकूण ४१९ शासकीय व ६०० हून अधिक खाजगी औ. प्र. संस्था असून, सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर सर्व शासकीय संस्थांचे टप्याटप्याने जागतिक कौशल्य प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपांतर करण्याचा सरकारचा मानस आहे. प्रशिक्षणार्थ्यांना अत्याधुनिक दर्जाचे प्रशिक्षण मिळावे याकरिता हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. सोलापूर शहर व तालुक्यातील एकूण १५० उद्योजक या बैठकीत हजर राहणार आहेत. अशी माहिती जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस.आर. भालचिम यांनी दिली.

# मिरजेतून रेल्वे धावणार सुसाट

## १.७३ कि.मी. मिरज कॉर्डलाईन प्रकल्पाला अखेर मंजुरी

### मध्य रेल्वेच्या मिरज कॉर्डलाइन प्रकल्पाला रेल्वे मंत्र्यांचे ग्रीन सिग्नल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

रेल्वेमंत्र्यांनी १२८.७८ कोटी रुपये खर्चाच्या मिरज कॉर्डलाइन प्रकल्पाला नुकतीच मान्यता दिली आहे. याकार्डलाइनमुळे आता मिरजला गाडी थांबणं बंद - होणार असून, सोलापूर - विभागात धावणाऱ्या गाड्यांचा वेग वाढणार आहे, याचबरोबर प्रवाशांचा वेळ वाचणार असून, प्रवासही जलद होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.

दरम्यान, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि मालवाहतूक कार्यक्षमता वाढवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत, मध्य रेल्वेअंतर्गत रुपये १२८.७८ कोटी खर्चाच्या मिरज कॉर्ड लाइन (१.७३ किमी) प्रकल्पाला मान्यता दिली आहे. मल्टी ट्रॅकिंग, फ्लायओव्हर, बायपास लाइन क्षमता वाढीअंतर्गत प्रस्तावित या धोरणात्मक उपक्रमाचे उद्दिष्ट मिरज जंक्शनवरून धावणाऱ्या रेल्वे गाड्यांची ये-जा सुलभ करणे असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले. या प्रकल्पामुळे मिरज-पुणे, मिरज-कोल्हापूर, मिरज-पंढरपूर आणि मिरज-लोंढासारख्या मार्गांना जोडणारा एक प्रमुख इंटरचेंज पॉइंट ठरणार आहे.

पुणे, सोलापूर, हुबळी व कोल्हापूरला जोडणारा सांगली जिल्ह्यातील मिरज रेल्वेचे जंक्शन पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख सेतू असून अनेक वर्षांपासून हा जंक्शन दुर्लक्षित होता, पण आता रेल्वे मंत्रालयाने मिरज जंक्शनचे आधुनिकीकरण विस्तारीकरण व कोड लाईन या प्रकल्पाला मंजुरी देऊन १२८ कोटीचा निधी दिला.




### पायाभूत सुविधा वाढल्या

पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि या प्रदेशात मालवाहतूक आणि प्रवासी गाड्यांच्या कार्यक्षमतेने संचालन करण्याचा मार्ग मोकळा होईल. यामुळे प्रवाशांची मिरज ते कोल्हापूर जलद प्रवासाची दीर्घकाळापासून असलेली मागणी पूर्ण होणार आहे.

### कॉर्डलाईन प्रकल्पामुळे काय होईल फायदा

या प्रकल्पामुळे मिरज स्टेशनचा सुधार होईल, रेल्वे रुळांची संख्या वाढेल, सिग्नलिंग सिस्टीम मध्ये सुधारणा होईल व प्रवासी तसेच माल वाहतूक गाड्यांना तासनतास मिरंज जंक्शन येथे ताटकळत राहावे लागणार नाही. या प्रकल्पामुळे कोल्हापूर-सोलापूर तसेच मिरज-सोलापूर प्रवास जलद गतीने होणार व मिरज जंक्शन वरून नवीन रेल्वे गाड्या सुरू होण्यासाठी मार्ग मोकळा होईल.

### मध्य रेल्वे मार्गाचा विकास होणार

कुईवाडी किंवा हुबळी येथून येणारे आणि कोल्हापूर येथे जाणाऱ्या गाड्या, इंजिन किंवा ब्रेकव्हॅन रिव्हर्स करताना सरासरी १२० मिनिटे मिरज येथे अडकून पडतात. प्रस्तावित कॉर्डलाइनमुळे ही वेळ दूर होणार असून, उशिरा होत असलेल्या गाड्या आता वेळेवर धावणार आहेत. रेल्वे मार्गाचा विकास वेगाने होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ॥ उसंतवाणी ॥

१५३१



राहुल बरळे । म्हणे नरेंदर ।
करी सरेंडर । ट्रंप पुढे ।।१।।

पुन्हा विकृत तो । वैयक्तीक हल्ला ।
अपशब्द कल्ला । पुन्हा तोच ।।२।।

आपल्या देशाला । करी बदनाम ।
करी अपमान । सैनिकांचा ।।३।।

चीनच्या हातचे । बाहुले बोलके ।
कानाने हलके । सर्वथा जे ।।४।।

नकाराचे मुद्दे । दिसे नेमकेच ।
नाही आचपेच । बोलण्याचा ।।५।।

पक्षात संघर्ष । उठे अर्धशिशी ।
सलमान शशी । विरोधात ।।६।।

कांत म्हणे जाणा । टीकेचे ते मूळ ।
उठे पोटशूळ । देशद्रोही ।।७।।

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०४ जून २०२५

# ‘समृद्धी महामार्ग’ राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर

**● मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन ● हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण**



**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी चालविली गाडी**



समृध्दी द्रुतगती महामार्गाचे लोकार्पण झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मार्गावर गाडी पळविली. तर येताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गाडीचं सारथ्य केलं.

**मुंबई, ५ जून**

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग राज्याच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. हा महामार्ग राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण व सायन पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्रमांक तीन दक्षिण वाहिनीचा लोकार्पण सोहळा दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, अन्न व औषध प्रशासन, विशेष साहाय मंत्री नरहरी झिरवळ, सार्वजनिक बांधकाम (सा. उ.) राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार नितीन पवार, आमदार सरोज अहिरे, आमदार हिरामण खोसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष अनिल गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, समृद्धी महामार्गासाठी विक्रमी वेळेत भूसंपादन करण्यात आले आहे. या मार्गामुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्हे जेएनपीटी बंदराशी जोडले गेले आहेत, आता हा महामार्ग वाढवण बंदराशी जोडला जाईल. ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी ५५ हजार ३३५ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. समृद्धी महामार्गाचा ७६ किलोमीटर मार्ग नाशिक आणि ठाणे जिल्ह्यातून जातो. या भागात सह्याद्रीच्या डोंगर रांगा असून अतिशय खडतर भौगोलिक परिस्थितीत मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे अभियांत्रिकी आव्हान पेलले. यातील इगतपुरीजवळील बोगदा हा ८ किलोमीटर लांबीचा असून तो राज्यातील सर्वाधिक लांबीचा आणि देशातील सर्वाधिक रुंदीचा बोगदा आहे. समृद्धी महामार्गासह पालखी मार्गावर वन विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गामुळे एक हजार शेततळी तयार झाली आहेत. याबरोबरच दर ५०० मीटरवर जलपुनर्भरण व्यवस्था करण्यात आली आहे. या महामार्गालगत सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे. त्यापैकी ३५ मेगावॉट प्रकल्पाचे काम सुरू आहे. महामार्गालगत गेल कंपनीतर्फे गॅस वाहिनी टाकण्यात आली आहे. या माध्यमातून नव्याने विकसित होणाऱ्या स्टीलसिटी गडचिरोली पर्यंत गॅस पोहोचविता येईल. धार्मिक पर्यटनस्थळे या मार्गामुळे जोडली आहेत. या महामार्गामुळे मराठवाड्यातील आर्थिक चित्र बदलण्यास मदत होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.



## सोलापूर -पुणे हुतात्मा एक्सप्रेस रेल्वेला हडपसर येथे थांबा द्या

**रेल्वे सल्लागार समिती सदस्य गणेश डोंगरे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

मुंबई येथे १२६ व्या क्षेत्रीय रेल उपयोगकर्ता परामशदात्री समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मध्य रेल्वे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

दरम्यान, या बैठकीत मध्य रेल्वेच्या विविध विषयांसंबंधी चर्चा करण्यात आली. याप्रसंगी सोलापूरचे मध्य रेल्वे सल्लागार समितीचे नवनिर्वाचित सदस्य गणेश डोंगरे यांनी सोलापूर-पुणे हुतात्मा एक्सप्रेस बाबत निवेदन सादर केले. ते म्हणाले, हुतात्मा एक्सप्रेस सकाळी (६.३०) वाजता सोलापूरहून पुण्याला जाते. या गाडीला हडपसर येथे थांबा द्यावा. जेणे करून सोलापुरातून हडपसर येथे कार्यरत असणाऱ्या अनेक युवक, युवती व महिलांना सहाय्यक ठरणार आहे.

दरम्यान, सोलापुरातील अनेक युवक युवती या कामानिमित्त सोलापूर ते पुणे ये जा करतात. हडपसर या परिसरात विविध आयटी कंपनी मोठया प्रमाणात आहे. हडपसर रेल्वे स्टेशनला न थांबता रेल्वेगाडी पुणेला जाते. पुणेरेल्वे स्टेशन वरून हडपसर येथे कंपनीला जाताना वाहतूक कोंडीमुळे दोन तास जातात. त्यामुळे चाकरमान्यांना त्रास होत आहेत. सोलापूरातील नोकरी निमित्त जाणाऱ्या प्रवाशांचे हित लक्ष्यात घेता हडपसरला थांबा मिळवा मागणी केली. यावर रेल्वे प्रशासनाने सकारात्मक उत्तर दिल्याचे डोंगरे यांनी सांगितले.

## सरकारसाठी नव्हे तर भारतीय म्हणून परराष्ट्र दौऱ्यात सहभागी : खा. सुप्रिया सुळे

**दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आम्ही देशासोबत ठामपणे उभे**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.५ जून**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आम्ही भारतासोबत ठामपणे उभे आहोत. मी सरकारसाठी नव्हे तर एक भारतीय म्हणून परराष्ट्र दौऱ्यात गेलेल्या शिष्टमंडळात सहभागी झाले होते, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी व्यक्त केले.



शिष्टमंडळाच्या माध्यमातून कतार, दक्षिण आफ्रिका, इथिओपिया व इजिप्त या चार देशांना भेट देऊन परतल्यानंतर मुंबईत त्या पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या की, परदेशातील प्रत्येक बैठकीत स्थानिक नेत्यांकडून महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिराजी, डॉ. मनमोहन सिंग आणि नरेंद्र मोदी या सर्व नेत्यांमुळे निर्माण झालेला ७५ ते ७६ वर्षांचा प्रवास सातत्याने उल्लेखला गेला, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट होती. भारताकडून जगाला खूप अपेक्षा आहेत. तिथल्या नेत्यांनी स्पष्टपणे सांगितले की, आपण आतंकवादाविरोधात ठामपणे उभे राहिले पाहिजे. मात्र, त्याचवेळी शांततेच्या मार्गानेही वाटचाल करावी, ही भावना प्रत्येक देशाने वारंवार व्यक्त केली., पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आपण कारवाई केली, ती एक प्रतिक्रिया म्हणून अपेक्षित होतीच. तुमच्यावर अन्याय झाला, त्याला उत्तर म्हणून कारवाई केली, हे योग्यच. परंतु, त्यानंतर संयम आणि समजूतदारपणा दाखवून तुम्ही तणाव कमी केला, याचे आम्हाला कौतुक वाटते, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

या चारही देशांमध्ये महात्मा गांधींचा मोठा प्रभाव असल्याचं प्रकर्षाने जाणवले. मी या दौऱ्यावर माझ्या देशासाठी शिष्टमंडळाच्या माध्यमातून गेले होते. मी कोणत्याही सरकारसाठी नव्हते, तर एक भारतीय म्हणून सर्वपक्षीय शिष्टमंडळासोबत गेले होते. असे त्यांनी स्पष्ट केले.

**नरेंदर सरेंडरबद्दल माहिती नाही**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बाबत केलेल्या नरेंद्र सरेंडर या वक्तव्याबाबत आपणाला माहिती नाही, त्यामुळे त्याबाबत बोलू शकत नाही,असे सांगून सुळे म्हणाल्या की,केंद्र सरकारने अखेर जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. ही मागणी आमच्या पक्षाच्या वतीने अनेक दिवसांपासून मागणी केली होती. ती मागणी पूर्ण होत आहे ही खूप आनंदाची गोष्ट आहे.

## हा तर आदिवासी बांधवांच्या जीवनातील सोन्याचा दिवस : भोसले

**अनुसूचित जमाती आयोग स्थापनेमुळे विकासाला चालना**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.५ जून-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास मान्यता दिली. हा महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या लाखो आदिवासी बांधवांसाठी ऐतिहासिक आणि सोन्याचा दिवस ठरला आहे. यामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला चालना मिळणार असून त्यांच्यावरील अन्याय दूर होण्यास मदत होणार असल्याचे महाराष्ट्र आदिवासी पारधी समाज संघटनेचे प्रदेश अध्यक्ष आणि भाजप अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. परंतु ती केवळ घोषणांपुरती मर्यादित राहिली होती. परवा मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांच्या ठोस निर्णयामुळे आणि आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही मागणी प्रत्यक्षात उतरली आहे.

हा निर्णय म्हणजे भाजप सरकारच्या सबका साथ, सबका विकास या वचनाचा आदिवासी समाजासाठी पूर्तता करणारा टप्पा ठरला असल्याचे श्री. भोसले यांनी सांगितले. ते म्हणाले, आयोगाला वैधानिक दर्जा देण्यात येणार असून, त्यात एक अध्यक्ष व चार अशासकीय सदस्यांचा समावेश राहणार आहे. आयोगाच्या कार्यासाठी २६ पदांची निर्मिती, कार्यालयीन जागा, कर्मचारी, आवश्यक सुविधा आणि यंत्रणा उभारण्यासाठी सुमारे ४ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या आयोगाची रचना आणि कार्यपद्धती ही स्वतंत्र राहणार असून ती ‘महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग’ या नावाने कार्यान्वित होईल. या आयोगाच्या स्थापनेमुळे अनुसूचित जमाती समाजाच्या प्रश्नांवर थेट आणि तातडीने निर्णय घेता येणार आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, जमीन, पाणी, रहिवास आणि योजनांची अंमलबजावणी यासारख्या क्षेत्रांतील अडचणींचा वेळीच मागोवा घेऊन ठोस उपाययोजना राबवता येणार आहेत. यावेळी विजया भोसले, अनुप काळे, दिनेश भोसले, राजश्री काळे, मचींद्रा पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## अकरावी प्रवेश; १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

**इनहाऊस कोटासाठी ६४,२३८ विद्यार्थ्यांचे अर्ज**

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ जून :**

राज्यात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहेत. या प्रक्रियेत गुरुवारी अंतिम मुदतीपर्यंत एकूण १२ लाख ७१ हजार २९५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे, अशी माहिती प्र.संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ.श्रीराम पानझाडे यांनी दिली.

या प्रक्रियेसाठी राज्यातील कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक शाळांची पहिल्या फेरीमध्ये ९,४३५ नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता २१,२३,०४० इतकी असून त्यापैकी कॅप फेरीसाठी प्रवेश क्षमता १८,९७,५२६ तर कोटा प्रवेश क्षमता २,२५,५१४ इतकी आहे. यासाठी दिनांक २६ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत https:// mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावर विद्यार्थी नोंदणी करण्यात आली.

यामध्ये १२,१५,१९० विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क ऑनलाईन जमा केलेले आहे. १२,०५,१६२ विद्यार्थ्यांनी अर्ज भाग-१ भरलेले आहेत. तर, अर्ज भाग-२ भरुन अंतिम करुन ११,२९,९२४ विद्यार्थ्यांनी लॉक केलेले आहेत. नियमित फेरी (कॅप राऊंड) साठी ११,२९,९३२ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. इनहाऊस कोटा साठी ६४,२३८ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. व्यवस्थापन (मॅनेटमेंट) कोटासाठी ३२,७२१ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. अल्पसंख्याक (मायनॉरिटी) कोटासाठी ४७,५७८ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. वेळापत्रकानुसार शून्य फेरी गुणवत्ता यादी ८ जूनला जाहीर होणार असून ९ ते ११ जून या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश होणार आहेत.

तसेच कॅप फेरीची गुणवत्ता यादी १० जूनला जाहीर होणार असून ११ ते १८ जून या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश होणार आहेत. अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ- mahafyjcadmissions.in पाहावे. तसेच ई-मेल आयडी support@ mahafyjcadmissions.in अथवा हेल्पलाईन नंबर ८५३०९५५५६४ वर संपर्क साधावा.

# उड्डाणपूल : आता म्हणे जनमताचा कौल!

### ये जो पब्लिक है सब जानती है..!

**सोलापूर शहरात उड्डाणपूल व्हावेत की नको यासाठी आता सोलापुरातील जनतेचा कौल घेण्याची घोषणा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली आहे. या अजब घोषणेमुळे शहरवासीयांमध्ये आश्चर्य व्यक्त करण्याबरोबरच अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ‘‘ ये जो पब्लिक है सब जानती है...’’ अशीच काहीशी भावना व्यक्त होत आहे.**

गिरणगाव ते स्मार्ट सिटी अशी संथ गतीने का होईना प्रगतीची वाटचाल करणाऱ्या सोलापूर शहरात केंद्र शासनाकडून दोन उड्डाणपूल मंजूर झाले. भाजपचे आ. विजयकुमार देशमुख हे पालकमंत्री असताना हा प्रस्ताव मंजूर झाला होता. तब्बल नऊ वर्ष उलटले तरी हे उड्डाणपूल प्रक्रियेअंतर्गत कागदावरच आहेत. सोलापूर शहरातील भविष्यातील वाहतुकीची वर्दळ लक्षात घेऊन हे उड्डाणपूल मंजूर झाले. छत्रपती संभाजी महाराज चौक (जुना पूना नाका) - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैया चौक)- सात रस्ता- पत्रकार भवन तर दुसरा उड्डाणपूल कृषी उत्पन्न बाजार समिती- बोरामणी नाका- शांती चौक- गुरुनानक चौक- महावीर चौक- पत्रकार भवन या मार्गावर दोन उड्डाणपूल मंजूर आहेत.यामुळे शहराच्या रहदारी व वाहतुकीमध्ये लक्षणीय सुधारणा होण्यास मदत होणार आहे. सन २०१६ मध्ये या प्रकल्पाची घोषणा झाली होती. सन २०१५ मध्ये या प्रकल्पाची किंमत ३८० कोटी रुपये होती तर सध्या २०२५ मध्ये ९६६ कोटी रुपये चा सुधारित विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. अनेक वर्षे यासंदर्भातील कामाला गती मिळाली नव्हती. त्यामुळे हा प्रकल्प रखडला होता. गत दोन वर्षात मात्र भूसंपादनाच्या कामाला गती आली.

जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात एकूण १३७ मिळकती बाधित होणार आहेत. त्यापैकी १०० खाजगी तर ३७ या शासकीय निमशासकीय आहेत. यापैकी खाजगी मिळकतींच्या भूसंपादनाचे काम राज्य शासन नियुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत होत आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात १०० खाजगी मिळकतींपैकी ९२ निवाड्यांचे काम पूर्ण झाले आहे.पहिल्या टप्प्यातील केवळ ८ निवाड्यांचे काम बाकी आहे.

यापैकी ५९ मिळकतींचा ताबादेखील घेण्यात आला आहे. शिल्लक आठ निवाड्यांपैकी काडादी चाळ येथील तीन मिळकतींचा वाद न्यायालयात आहे. पांजरापोळ ट्रस्ट, सोलापूर एसटी आगारसह उर्वरित अन्य मिळकतींच्या हरकतीसंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात एकूण ९६ मिळकती असून यापैकी खाजगी ८४ तर उर्वरित १२ शासकीय- निमशासकीय आहेत. या प्रकल्पाच्या डिझाईनमध्ये बदल करण्यात आल्याने त्यासंदर्भातील शुद्धीपत्रक मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले होते. दरम्यान, जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या शुद्धीपत्रकाला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नुकतीच मंजुरी दिली. त्याच्या राजपत्र प्रसिद्धीनंतर पुढील प्रक्रिया करण्याचे काम सुरू होणार आहे. दरम्यान, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३७ तर दुसऱ्या टप्प्यात १२ असे एकूण ४९ शासकीय- निमशासकीय जागा आहेत. भूसंपादनानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून उड्डाणपूल बांधण्याची निविदा काढण्यात येणार आहे.सोलापूर शहरातून जाणाऱ्या उड्डाणपूलाला ६ ठिकाणी प्रवेश आणि निर्गमन रॅम्प असणार आहेत. तसेच दोन सर्व्हिस रस्तेही असणार आहेत.



दरम्यान, सोलापूर शहरातील उड्डाणपूलाच्या सुधारित प्रस्तावासाठी ९६६.२४ कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी देण्यात आल्याची घोषणा ६ एप्रिल २०२५ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात होण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी आणि आ. देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले. असा मोठा गाजावाजा झाला. आ. देवेंद्र कोठे यांनी अधिवेशनात उड्डाणपूलाबाबत लक्षवेधीही मांडली होती. ९० टक्के भूसंपादन आणि निविदा प्रक्रिया होऊनही दोन्ही उड्डाणपुलाचे काम अद्याप सुरू झालेले नाही. ते कधी सुरू होणार ? असा प्रश्न आ. देवेंद्र कोठे यांनी मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला होता. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शहरातील दोन्ही उड्डाणपूलांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते.




आता उर्वरित भूसंपादन आणि तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर उड्डाणपुलाच्या निर्मितीची प्रक्रिया मूर्त स्वरूपात येणार आहे. अशी सुखद आणि समाधानकारक परिस्थिती निर्माण झाली असतानाच अचानकपणे सोलापूर महापालिकेतील बैठकीला आले असताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उड्डाणपूल संदर्भात एक गौप्यस्फोट केला. तो म्हणजे सोलापूर शहरातील उड्डाणपूला संदर्भात दोन मतप्रवाह आहेत. व्यापाऱ्यांचा याला विरोध असल्याचे दिसून येते. या उड्डाण पुलामुळे व्यवसाय मार खाईल अशी व्यापाऱ्यांची धारणा झाली आहे. त्यामुळे सोलापुरात उड्डाणपूल व्हावेत की नको ? यासाठी आता जनमताचा कौल पोर्टल द्वारे घेण्याचा निर्णय पालकमंत्री गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना जाहीर केला. यावेळी आ. देवेंद्र कोठे हेही उपस्थित होते. यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. यामुळे या उड्डाणपलाची स्वप्नपूर्ती होणार की उड्डाणपूल लटकणार ? असा प्रश्न आता सोलापूरकरांच्या मनात निर्माण झाला आहे. जनमताची चाचणी घ्यायचीच होती तर निधी मंजुरी आणि इतर घोषणा कशासाठी केल्या , असाही सवाल आता सुजाण सोलापूरकरांच्या मनात उपस्थित होत आहे. विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासह सोलापूरकरांना महाराष्ट्र आता थांबणार नाही असे म्हणत विकासाचे अभिवचन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोलापूरकरांना दिलेला शब्द पाळत ९६६ कोटीच्या सुधारित विकास आराखड्याला मंजुरीही दिली. तर मग उड्डाणपुलाचे घोडे कुठे अडले? जनमताची चाचणी कशासाठी घेणार ? यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या वचनालाही विनाकारण तडा जाणार आहे. या दिग्गज नेत्यांचा वचन आणि शब्द फोल ठरविण्याचा प्रयत्न तरी होत नाही ना ? काही जणांच्या जागा सुरक्षित ठेवण्यासाठी तर हा अट्टाहास होत नाही ना ? अशी कुजबुज ऐकायला मिळत आहे. भाजपा मधील स्थानिक नेत्यांच्या कुरघोड्याच्या राजकारणात उड्डाणपूल कागदावरच राहणार नाही ना ? ‘‘सबका साथ - सबका विकास’’ या घोषणेचे काय होणार ? अशी चिंता आता वाटू लागली आहे. अच्छे दिन दाखविणाऱ्या भाजपाच्या सत्ता काळात उड्डाणपूल प्रकल्पाला अति विलंब होत आहे. याबद्दलही आश्चर्य व्यक्त होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला तर मग जन्मताच्या कौलानंतर त्याचे काय होणार ? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. येत्या आठ दिवसात जनमत चाचणीसाठी पोर्टल तयार करण्यात येणार आहे. या पोर्टल द्वारे जनमताचा कौल घेतला जाणार आहे. विशेष म्हणजे केवळ उड्डाणपूल नव्हे तर शहर विकास आराखडा आणि इतर सोयी सुविधा संदर्भातही हा कौल घेतला जाणार आहे. पोर्टलवर मत नोंदवू शकतील असे तांत्रिकदृष्ट्या मोबाईल साक्षर किती सोलापूरकर आहेत? यामुळे सोलापूरकरांमध्ये उलट -सुलट चर्चेला उधाण आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# मृत्यूलाही मोल हवे!

कोणतीही एखादी दुर्लभ गोष्ट प्राप्त करण्यासाठी खडतर कष्ट करावे लागतात, मोठे मोल मोजावे लागते, तेव्हा त्या गोष्टीची किंमत कळते. त्यामुळेच सहजपणे वाट्याला आलेल्या जन्माचे आणि पुढे मरण येईपर्यंत जगत राहण्याचे मोल माणसाला फारसे वाटत नसावे. सहजपणे प्राप्त झालेल्या जगण्याच्या प्रत्येक क्षणाचे सोने करण्याचाच प्रत्येकाने गांभीर्याने प्रयत्न केला पाहिजे, पण तसे होत नाही. ज्याने चोच दिली आहे त्याने चाऱ्याचीदेखील व्यवस्था केलेली असते, हा सोयीस्कर समज अंगवळणी पडलेला असल्याने जगण्याचे गांभीर्यही फारसे उमगलेले नाही, असा समज असताना जेव्हा अचानक एखाद्या संकटास सामोरे जाण्याची वेळ येते, तेव्हा जगणे जपण्यासाठी काय करावे याचेदेखील भान उरत नसावे. अन्यथा, जगण्याचे मोल उमगलेले नाहीच, पण मृत्यूचा अर्थदेखील समजला नाही अशी सैरभैर स्थिती उद्भवते आणि जगणे मातीमोल होते. ज्या जिवांचे जगणे सार्थकी लागते, त्याचा मृत्यूही मौल्यवान असतो. जेव्हा मरण स्वस्त होते, तेव्हा जगण्याची किंमत कळत नाहीच; पण जगणेच मातीमोल होते. देशाच्या रक्षणासाठी जिवाची बाजी लावून प्राण पणाला लावत शत्रूशी झुंजताना येणाऱ्या मृत्यूचे मोल यामुळेच अनमोल ठरते. बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर अशाच काहीशा क्षुल्लक विजयोत्सवाच्या उन्मादातून बेभान झालेल्या गर्दीत सहजपणे शिरकाव केलेल्या मृत्यूने काही निष्पाप जिवांचा घास घेतला ही बाब दुर्दैवी आहेच, पण अशा प्रसंगातून मृत्यूला आमंत्रण देऊन त्याला आपले जगणे सहजपणे हवाली करणे कितपत योग्य ठरते, याचा गंभीर विचार व्हायला हवा. कारण तसा विचार झाला नाही, तर पदोपदी टपून बसलेला मृत्यू कोणत्याही बेसावध क्षणाचे बोट धरून समोर उभा राहील आणि कोणताही दोष नसलेल्या निष्पापांचा नाहक बळी घेऊन डाव साधेल, हे आता या दुर्घटनेनंतर तरी ध्यानात घ्यायला हवे.

असे म्हणतात की, गर्दीचे एक मानसशास्त्र असते. गर्दी जेव्हा अनावर आणि बेभान होते, तेव्हा समूहाच्या विवेकावर उन्मादाचे आक्रमण होते. आजकाल गर्दीच्या उन्मादाच्याही वेगवेगळ्या छटा दिसू लागल्या असून त्याला सामाजिक स्थितीचे काही कंगोरे आहेत, असे म्हटले जाते. विकसित देशांत गोळा होणारी गर्दी, अविकसित देशांतील गर्दी आणि विकसनशील देशांतील गर्दी या गर्दीच्याच वेगवेगळ्या छटा असल्या, तरी प्रत्येक छटेतील गर्दीचे मानसशास्त्र वेगवेगळे असते. विकसित देशांतील गर्दीतही चेंगराचेंगरीसारख्या घटना घडतात, तेथेही उन्मादी गर्दीतील काहींना नाहक मृत्यूला सामोरे जाण्याची वेळ येते. विकसित देशांत जेव्हा केव्हा चेंगराचेंगरीच्या घटना घडतात, तेव्हा त्या साधारणतः एखाद्या आलिशान सोहळ्याच्या निमित्ताने होणाऱ्या गर्दीतील काही जणांच्या आयुष्याची अखेर ठरतात. पार्टी, पब, विजयोत्सव आदी कारणांमुळे जगण्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण साजरा करण्याच्या उन्मादातून बेभान होणाऱ्या गर्दीतील काहींना मृत्यूने कवटाळणे ही बाब दुर्दैवी, दुःखद असते हे खरेच, कोणत्याही साजरेपणाच्या क्षणातील आनंदावर असे अनपेक्षितपणे पडणारे विरजण आणि त्यामुळे होणारा क्लेशदायक शेवट हा दुर्दैवी प्रकारच असतो, पण आनंद साजरा करण्याच्या क्षणावरच दुःखाचा घाला पडतो, असे अशा अनेक घटनांतून दिसून आल्याने, जगण्याच्या आनंदाआड लपलेल्या दुःखाची जाणीव जागी ठेवण्यासाठी तरी, जगण्याचे मोल जाणावे, अशी अपेक्षा गैर ठरत नाही. अविकसित देशांत बहुधा, जगण्याच्या धडपडीतून निर्माण होणाऱ्या संघर्षाचा फायदा घेत मृत्यू आक्रमण करतो, असे दिसते. उपासमारीसारख्या संकटात होरपळणाऱ्या समूहाच्या मदतीसाठी वाटली जाणारी अन्नाची पाकिटे गोळा करण्याकरिता उडणारी झुंबड जगण्याचा संघर्ष करत असतानाच, चेंगराचेंगरीसारख्या घटनेत मृत्यू झाल्याच्या काही घटना अविकसित देशांत घडल्याचे दिसते. भारतासारख्या विकसनशील देशात सहसा उत्सवी सोहळे साजरे करण्याकरिता उन्मादी गर्दी गोळा झाल्याचे फारसे दाखले गेल्या काही दशकांतील इतिहासात नाहीत. धार्मिक सण, उत्सव, जत्रा, सत्संग आदी, जगणे सहज व समाधानी करण्याच्या सात्त्विक प्रेरणेतून साजऱ्या होणाऱ्या सोहळ्यांत सहभागी होणे, ही भारताच्या समाजसमूहांची आजवरची मानसिकता होती. गेल्या काही वर्षांत या मानसिकतेत बदल होताना दिसू लागला असून सोहळे, उत्सव, विजयोत्सव, पार्ट्या अशा उत्सवी उन्मादातूनच गर्दीवर मृत्यूचे आक्रमण होताना दिसत आहे. गेल्या काही दशकांत भारतात घडलेल्या चेंगराचेंगरीसारख्या घटनाही दुर्दैवी होत्या. जगण्याचे आध्यात्म जाणण्याच्या उत्कंठेतून गोळा होणाऱ्या गर्दीच्या मानसिकतेत उन्मादाचा लवलेशही नसताना, काही दुर्दैवी आणि अनपेक्षिताचा घाला पडावा आणि त्यामध्ये आयुष्याचा भूतकाळ व्हावा, असे दुर्दैवी प्रसंग याआधी घडले आहेत. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शन' नावाच्या संस्थेच्या पाहणीनुसार, भारतातील चेंगराचेंगरीच्या घटनांपैकी जवळपास ८० टक्के घटना केवळ धार्मिक कार्यक्रम, जत्रा, तीर्थक्षेत्रे आदी ठिकाणी घडल्या आहेत. अशा प्रसंगांचा बळी ठरणाऱ्या त्या निष्पापांचा त्यात काही दोष नसतानाही, कोणत्या तरी व्यवस्थेच्या बेफिकिरीचा बळी ठरून प्राण गमावण्याचे प्रसंग याआधी आले आहेत. एखाद्या जत्रेत भक्तिभावाने गोळा झालेल्या भाविकांच्या मनातील भक्तीचा उन्माद काही वेळा मृत्यूला संधी देणारा ठरला आहे. अलिकडे मात्र गर्दीच्या मानसशास्त्राची नवी छटा समाजजीवनात उमटू लागली आहे. उत्सवी सोहळे साजरे करण्याच्या उन्मादातून होणाऱ्या चेंगराचेंगरीसारख्या, सहसा विकसित देशांत घडणाऱ्या घटना वाढू लागल्याने, भारतीय समाजसमूहांच्या जीवनशैलीचा नवा पदरही अशा घटनांतून समोर येऊ लागला आहे.

कोणत्याही ठिकाणी कोणत्याही निमित्ताने गर्दी होण्याची व त्यातून चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना घडण्याची शक्यता असेल, तर त्याआधी प्रशासकीय यंत्रणांनी अशा ठिकाणांतील गर्दीचे व ज्यासाठी गर्दी गोळा होणार असते अशा कार्यक्रमाचे काळजीपूर्वक नियोजन व नियंत्रण करण्याची आवश्यकता असते. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पर्यायी मार्ग मोकळे ठेवणेही गरजेचे असते. बहुधा काही अफवा फैलावल्यामुळे गर्दी बेभान होऊन अनावर होते आणि तिला नियंत्रित करण्यासाठी बळाचा बेछूट वापर केला जातो, असे काही घटनांवरून दिसते. त्यामुळे अशा नियोजनाचा अभाव आणि समूहाचा अनाठायी उन्माद ही कारणे लक्षात घेतल्यास असे अनावस्था प्रसंग टाळता येणे शक्य असते, हेही स्पष्ट झाले आहे. आजवरच्या गर्दीतील चेंगराचेंगरीच्या घटनांनंतरही याच बाबी अधोरेखित करण्यात आल्या होत्या. जेव्हा जेव्हा अशा दुर्दैवी घटना घडल्या, तेव्हा त्यानंतर गर्दीच्या नियंत्रणातील नियोजनाच्या अभावावर बोट ठेवले गेले आहे. तरीही, अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होऊनही नियोजनाचे गांभीर्य मात्र दुर्लक्षित राहतेल हा दुर्दैवी अनुभव अशा घटनांनंतर वेळोवेळी येत गेला आहे. सुमारे १८ वर्षांनंतर आयपीएल क्रिकेट सामन्यात मिळालेल्या विजयाचा उत्सव साजरा करण्याचा सोहळा बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये साजरा होत असताना विजयी संघाच्या स्वागतासाठी स्टेडियमबाहेर जमलेल्या क्रिकेट शौकिनांची अफाट गर्दी अनावर झाली. गर्दीला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केल्यावर चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले, अनेक श्वास न घेता आल्याने गुदमरून बेशुद्ध पडले असून मृतांचा आकडा आणखी वाढेल, अशीही शक्यता वर्तविली जात आहे. या घटनेनंतर आता राजकीय वाग्युद्ध पेटेल. आरोप-प्रत्यारोपांचे रण माजेल, राजकारणास ऊत येईल, मृतांच्या नातेवाईकांस मदत जाहीर होईल आणि शोकसंवेदनांचा पाऊस पडेल. अशा दुर्दैवी घटना घडल्यानंतर असे होतच असते. मात्र, गर्दीच्या नियंत्रणाच्या उपायांचा अभाव कायमचा संपुष्टात आणण्यासाठी काय करावे लागेल, समाजाच्या उन्मादी अवस्थेच्या काळात विवेकाचा विचार रुजविण्याचे संस्कार कसे घडविता येतील, याची चिंता मात्र अभावानेच उमटेल. अनेक समस्यांमुळे आणि अनपेक्षित आघातांशी सुरू असलेल्या संघर्षामुळे जगणे महाग झाले आहे हे खरेच आहे. पदोपदी दबा धरून बसलेल्या मृत्यूचा घाला केव्हा पडेल हे सांगता येणार नाही, एवढी अशाश्वत स्थिती सर्वत्र दाटली आहे, हेही खरे आहे. पण याही स्थितीत, जगणे जपायला हवे. सगळे काही महाग होत असताना, आपले मौल्यवान जगणे कवडीमोल किमतीत, स्वस्तात मृत्यूच्या हवाली करण्याचा अविवेकीपणा कोणाकडूनही होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी!

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (२०)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

भारतीय संस्कृतीचा ज्ञानकोश म्हणजे महर्षी व्यासांनी लिहिलेले महाभारत. जीवनातील 'आदर्शवाद' (आयडियालिझम) हा किती उच्चतम स्तरापर्यंत जीवनात प्रत्यक्ष रूपेण जगता येतो, याचे प्रत्यक्ष दर्शन महर्षी वाल्मीकिंनी रामायणात घडविले आहे. तर, महाभारतात हाच आदर्शवाद सांभाळून व्यवहाराच्या स्तरावर परिस्थितिजन्य संदर्भात कसे जगावे, याचा वस्तुपाठ संपूर्ण मानवसमाजासाठी महाभारतकारांनी दिला आहे. रामायण आणि महाभारत हे दोन ग्रंथ म्हणजे मानवी जीवनाची कृतार्थता संपन्न करण्याच्या वाटचालीचे दर्शक 'वाटाडे' आहेत.

रामायण आणि महाभारत या दोनही महाकाव्यात एक समान सूत्र असल्याचे आपल्याला जाणवते; जर त्या सूक्ष्म दृष्टीने त्यांचे चिंतन केले तर! ते समान सूत्र म्हणजे 'राम-रावण युद्ध' आणि 'कुरुक्षेत्रावर झालेले कौरव-पांडवांचे युद्ध.' त्यानंतरच रामराज्याची आणि धर्मराज्याची साकार झालेली स्थापना. पण गंमत अशी आहे की, रावणशाही नष्ट होण्यासाठी 'सीता' कारण झाली तर कुरुक्षेत्रावर झालेल्या भीषण संहारासाठी 'द्रौपदी' कारण झाली. या दोन महायुद्धांचा वणवा या दोन नारीशक्तीच्या झालेल्या अपमानांमुळे भडकला आणि त्या वणव्यात पीडक, हिंसक, मदांध, सत्तांध, सत्तापिपासू, नारीभक्षी, अत्याचारी 'रावणी मनोवृत्ती'चा आणि 'धृतराष्ट्री मनोवृत्ती'चा संपूर्ण नायनाट झाला.

साधी असलेली युद्धे महायुद्धात परिवर्तित झाली, ती केवळ या दोन महान पतिव्रतांच्या सतित्वाच्या झालेल्या अपमानांमुळे, अवहेलनांमुळे! हा इतिहास आहे, वस्तुस्थिती आहे आणि ती नाकारताही येत नाही. जड भूमीसाठी, राज्यासाठी, सत्तेसाठी ही सर्वंकष युद्धे झाली नाहीत तर हिंदू संस्कृतीत देवीस्वरूपा, मातृस्वरूपा, जगज्जननीच्या स्वरूपात, आदिशक्तीच्या स्वरूपात पूजल्या जाणाऱ्या नारीशक्तीच्या मंगलप्रद सन्मानाच्या पुनर्प्रस्थापनेसाठी ही महायुद्धे झाली आहेत, हे निखळ सत्य चक्रवर्ती भरताच्या वारसदारांनी लक्षात घेणे जरूर आहे. सध्या गाजत असलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या घटनेकडे त्या भावनिक, सांस्कृतिक, भारतीय नारीशक्तीची प्रतिष्ठा, अस्मिता या दृष्टिकोनातून पाहणे, त्याने त्याचे खरे मूल्यांकन होऊ शकेल. नाही तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे म्हणतात तशी ती छुटपुटीची लढाईच ठरेल.

'ऑपरेशन सिंदूर' ही घटना, त्यातून काही दिवसांचा झालेला संघर्ष, त्यांत भारतीय सेनेने जगालाही आश्चर्यचकित करणारा असा केलेला पराक्रम या गोष्टीमुळे संपूर्ण जगाला उदित होणाऱ्या समर्थ भारताचे दर्शन झाले. भारतातील प्रत्येकाची मान अभिमानाने, गौरवाने उन्नत झाली. 'हा अजिंक्य आहे नरसिंहांचा देश' या म्हटलेल्या गीताची अनुभूती आली. 'गर्व से कहो हम हिंदू हैं'चा आवाज अधिक तीक्ष्ण झाला. पण 'क्रियेला प्रतिक्रिया', 'आघाताला प्रत्याघात' असे जुजबी, वरवरचे याचे स्वरूप नाही. ते अधिक खोल, विस्तृत, भारताच्या भविष्यकालीन वाटचालीचा स्पष्ट निर्देश करणारे तसेच 'समर्थ भारता'ला भविष्यात कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे संकेत देणारे आहेत. कसे ?

कथा आहे शिवपुराणातील- शिवप्रभूचे शिवसुर (सासरे) दक्ष प्रजापती देव संघातील एक फार मोठे प्रस्थ. त्यांना अनेक मुली, विविध देवांशी विवाह झालेल्या. दक्ष प्रजापतींच्या प्रतिष्ठेला साजणाऱ्या घराण्यात गेलेल्या. पण त्यांची एक मुलगी सती अतिशय सुस्वरूप, पण तिने पती म्हणून निवड केली दक्षाच्या दृष्टीने भणंग, भुतांचा स्वामी, घर नाही दार नाही, उजाड असलेल्या कैलासावर राहणारा, वैभवहीन, भस्मविलेपन करून संपूर्ण विश्वाची चिंता करीत ध्यानमग्न असणारा अशा भोळा सांब सदाशिव. त्यामुळे त्याच्या महायज्ञात पिता असूनही त्याने तिची आणि तिचा पती भगवान शंकराचा खूप अपमान केला. त्यामुळे सतीने त्याच अग्निकुंडात समाधी घेतली. संतापलेल्या शिवाने रौद्ररूप धारण करून दक्षयज्ञाचा विध्वंस केला.

त्यासाठी त्यांनी 'वीरभद्र' या अजिंक्य अशा रुद्रगणाची आणि त्याला साथ देणाऱ्या 'कृत्ये'ची निर्मिती केली. कृत्या ही रक्तपान करणारी देवता आहे. तिला प्रत्येक युगात रक्तपान करण्याची सवय आहे. प्रत्येक युगात तुला एक महाघट रक्त मिळेल, असे अभिवचन श्री भगवान शंकरांनी तिला दिले आहे. आतापर्यंत तिला तीन महाघट रक्त मिळाले असून कलियुगात अर्धा घट मिळायचा आहे. तो अर्धा घट तिला म्लेंछांच्या कृतीमुळे वा आततायीमुळे जो त्यांचा संहार होणार आहे, त्यांतून मिळणार आहे, अशी पुराणकालीन भविष्यवाणी आहे. ऋषी-मुनी, संत-महंत, फकीर यांनी केलेली भविष्यवाणी कशी अचूक असते, हे मागील लेखात आपण पाहिलेच आहे. पुराणातील भविष्यकालीन संघर्षाचा प्रतीकात्मक श्लोक असा -

'कृतयुगे रेणुका कृत्या । त्रेताया जानकी सती ।
द्वापारे द्रौपदी कृत्या । म्लेंच्छ कृत्या कलियुगें ॥' (शिवपुराण)

म्हणजे कार्तवीर्याच्या मुलांनी जमदग्नीचा वध आणि रेणुका मातेचा वध केल्यामुळे परशुरामाने केलेला नरसंहार, सीताहरणामुळे झालेल्या राम-रावण युद्धातील रक्तपात, द्वापार युगात द्रौपदीच्या अपमानामुळे झालेल्या महायुद्धातील रक्तपात, असे तीन घट रक्त कृत्येला मिळाले आहे. शिल्लक राहिलेला अर्धा घट हा तिला म्लेंछ संहारामुळे मिळणार आहे. कारण विद्यमान जागतिक परिस्थितीत आतंकवादाच्या नावाखाली 'म्लेंछ दुर्जन उदंड' झाले असून बहुतां दिवसांपासून त्यांचे 'सर तन से जुदा' या काफिरांच्या विद्वेषाचे बंड खूप माजले आहे. ते मोडून काढण्यासाठी भारतालाच पुढाकार घ्यावा लागणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने त्याला हिरवी झेंडी दाखविली आहे. कुरुक्षेत्रावरील पान्च्यजन्यचा उद्घोष झाला आहे. भारतीय स्त्रीच्या कुंकवाला हात लावणाऱ्या, दाहिर कन्यांपासून तो काश्मीरच्या माता भगिनींच्या वस्त्राला हात घालणाऱ्या आणि तिला नग्न करून तिच्यावर उघडपणे बलात्कार करणाऱ्या दु:शासनी वृत्तीची शेवटची घटिका भरायला प्रारंभ झाला आहे. भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे - 'मी लोकांचा संहार करणारा व वृद्धिंगत झालेला काळ आहे. या लोकांचा संहार करण्यासाठीच मी निघालो आहे.'

(अ.११, श्लोक ३२)

'ऑपरेशन सिंदूर' एक घटना नाही. केवळ एक प्रतिक्रिया नाही. त्याला विविध प्रकारचे भावनिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भविष्यकालीन दैवी संकेतांचे आयाम आहेत. त्या दृष्टीने त्याचा विचार होणे काळाची गरज आहे.

(लेखक प्रसिद्ध कवी आहेत)

## वेध

# शिवराज्याभिषेक!

**प्रफुल्ल क. व्यास**

महाराज, मानाचा मुजरा! राजे, 'यावत्चंद्र दिवाकरौ' आपल्या नावाचा जयघोष होत राहणार आहे. आम्हाला अभिमान आणि गर्वही आहे आम्ही याच महाराष्ट्राच्या मातीत जन्म घेतला, ज्या मातीला आपला पदस्पर्श होऊन ती सुगंधित झाली! महाराज तुमचा दराराच होता. तुम्ही बाणेदारही होता. आम्ही मात्र कर्मदरिद्री ठरतो आहोत. तुमच्या नावाचा जेवढा फायदा घेता येईल तेवढा ओरबाडण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत. याशिवाय तुमच्या नावावर पोळी शेकण्याचा जो प्रयत्न होतो आहे न त्याच्या वेदना मातोश्री जिजामातांना जास्त होत असतील. (मुंबईची मातोश्री वर्षाच्या प्रेमात पडली.) त्यांनी तुम्हाला रयतेचे रक्षण करण्याची शिकवण दिली. दुर्दैवाने जनता आता निर्ढावली आहे. सोयरसुतक नावाची गोष्टच संपलेली आहे.

महाराज, आज तुमचा राज्याभिषेक दिन साजरा होतो आहे. आम्ही एवढ्या खालच्या पातळीवर गेलो की, ज्या सुवर्ण काळात आपल्याला राजसिंहासनावर बसवले गेले, त्यावेळी हे होते आणि ते नव्हते, याचेही राजकारण करतो आहोत. समर्थ रामदास स्वामी आपले गुरू नव्हतेच याचा प्रपोगंडा करण्यात एक जमात आता आक्रमक झाली आहे. दादोजी कोंडदेव यांचा पुतळा हटवून टाकण्यापर्यंत आमची मजल गेली आहे. निव्वळ राजकारण होते आहे महाराज आपल्या नावाच्या आड! आम्ही आतापर्यंत मुघलांचाच इतिहास शिकलो. आमच्या नवीन पिढीपुढे काय वाढून ठेवले आहे. अगदी या सीबीएससीवाल्यांच्या लेखी शिवाजी महाराजांचा इतिहास दोन-चार पानांचा तोही जास्त ठरावा! महाराज, आपण हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली होती. आपण होता म्हणून आमच्या आया-बहिणींची अब्रू वाचली, आमची देवळं शाबूत राहिली. महाराज तुम्ही दैवीच होता... हिंदुस्थानसाठी सुरतही लुटली आणि दिल्लीचे तख्त हलवून ठेवले. आज त्याच दिल्लीच्या तख्तासाठी जी लाजीरवाणी चढाओढ लागली आहे त्याची कीव येते. परवा, त्या कन्हय्या कुमारने 'सिंदूर' मोहिमेवर केलेली टीका पाहून राजकारणाची पातळी किती गटार झाली, याची प्रचीती आली. महाराज तुमच्या काळाची आणि आजची तुलनाच होऊ शकत नाही. तरीही नतद्रष्टपणे तुलना करायची म्हटले तर तुम्ही 'राजे'च होता आणि आजचे 'राजकारणी!' आज ढासळलेले प्रशासन, भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला असून सरकारी कामात विलंब आणि अपारदर्शकता दिसून येते. शिवाजी महाराजांचे प्रशासन 'प्रजा' हेच परमेश्वर या तत्त्वावर होते तर आज सत्ता हीच प्राथमिकता (परमेश्वरापेक्षा जास्त) झाली आहे. मुस्लिम साम्राज्य असतानाही महाराज तुमच्या काळात स्त्रिया सुरक्षित होत्या, तुमचे कायदे कठोर होते. आज स्त्री असुरक्षित झाली आणि कायद्याला पुरावा लागू लागला. पुरावाही खोटा उभा होऊ लागला. शिक्षेला मानवाधिकाराचा आधार मिळाला आणि स्त्रियांनीही कायद्याचा दुरुपयोग सुरू केला. आपल्या राज्यात स्त्री सन्मान होता. आज स्त्री सन्मानासाठी झगडावे लागते आणि मिळालेला सन्मान पचवण्याची क्षमताही राहिलेली नाही. महाराज, आपल्या देशभक्तीविषयी काय लिहावे. पण, आज तुमच्या नावाने जे देशभक्तीचे तुणतुणे वाजवले जाते न तेव्हा 'याचसाठी होता अट्टाहास!' असे वाटून झिणझिण्या येतात. अगदी आपल्या नावाचा वापर करून 'मातोश्री'वरून मंत्रालयात पोहोचलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे उदाहरण राज्यातील गढूळ राजकारणासाठी पुरेसे ठरावे. त्यांचे ते पिलांटू (मुख्यमंत्री फडणवीसांच्या शब्दात सकाळी ९ चा भोंगा) यांनी तर तुमचे नावही जीभेवर घेऊ नये एवढी जीभ विषारी आहे. महाराज, राज्यात तुमच्या नावाचा वापर करून सत्ता मिळवण्यात एक नंबरवर कोण असेल तर शिवसेना! बाळासाहेबांनी ते पावित्र्य जोपासले होते. पण, पुत्राला आणि पुत्राच्या पुत्राला ते जोपासता आले नाही. ज्यांचा जन्मच (राजकीय) तुमच्या नावाने झाला ते आज सर्व विसरले आहेत. त्यांनी आपल्या नावावर सत्ता प्राप्त केली आहे. पण, महाराज आपल्यातील एकही गुण त्यांनी अंगीकारला नाही. किमान, चांगल्याला चांगले म्हणण्याचा एवढा एक जरी गुण त्यांनी जोपासला असता तर कदाचित त्यांची आज ही वाताहत झाली नसती. पण, महाराज सत्तेच्या लोभात सर्वच पागल झाले आहेत. त्यात कोणाला एकालाच दोष देऊन होणार नाही. अन्यथा हे लिहिणेही एककल्ली होईल. केवळ (पंचांग) तिथीचा राग म्हणून महाराज आपली जयंतीही दोन वेळा साजरी केली जाते. एक कॅलेंडर आणि दुसरी तिथीने. योगायोगाने आज 'वेध' लिहीत असताना जागतिक पर्यावरण दिन साजरा होत आहे. महाराजांच्या काळात पर्यावरण राजशक्तीचा भाग होता. आज राजकारणात शक्ती खर्च होत आहे. आज पर्यावरणाचे संकट उभे झाले आहे. आपली गरज असताना वृक्षारोपण करण्याचे आवाहन सरकारला करावे लागते आहे. 'तरुण भारत'ने आपल्या शताब्दीत 'बीज अंकुरे अंकुरे' या अभियानातून आणि उद्यापासून वट पौर्णिमेचे औचित्य साधून 'वट रोपटे' वाटपाचे पवित्र्य कार्य हाती घेऊन पर्यावरणाचा संदेश दिला आहे. महाराज, आपली माफी मागतो... आम्ही आपली चरणरजही सांभाळू शकलो नाही ना आपले ध्येयधोरणं... आज राज्याभिषेकदिनी मोठमोठी भाषणं होतील, सेल्फी विथ महाराज होईल... महाराज, चुकतोय आम्ही, काहीतरी उणीव आहे. कोणाच्या तरी रूपात आपण मार्गदर्शन करायला या! तुम्ही पुन्हा जन्म घेऊन सुखासमाधानाने राज्याभिषेक सोहळा होईल असे दिवस राहिलेले नाहीत. कालच नाही का झाला एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सुशिक्षितांचा आकांततांडव! असा तांडव नकोय आम्हाला; रजतेचे राज्य हवे महाराज रयतेचे...

९८८१९०३७६५

## दखल

# 'मोदीभक्त' झाले शरद पवार

**मोरेश्वर बडगे**

काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटक मृत्युमुखी पडले. महिलांच्या सांडलेल्या कुंकवाचा हिशोब पाकिस्तानला द्यावा लागेल, असे त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले होते. त्या दिशेने 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने चालवलेल्या लष्करी मोहिमेत अवघ्या काही तासांत पाकिस्तान गुडघ्यावर आला. भारताने तिसऱ्यांदा पाकिस्तानला आणि त्या रूपाने जगाला आपली ताकद दाखवली. मात्र, आपल्या देशातले काही विरोधी नेते यातही राजकारण शोधत आहेत. पहलगाम आणि त्या घटनेनंतरच्या युद्धात काय झाले? यावर त्यांना चर्चा हवी आहे. त्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवा, अशी मागणी करणारे पत्र या टोळीने पंतप्रधान मोदींना लिहिले आहे. या पत्रावर प्रमुख विरोधी नेत्यांच्या सह्या आहेत. मात्र, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सुप्रीमो शरद पवार यांनी सही करायला नकार दिला आहे. लोकसभेतले विरोधी नेते राहुल गांधी यांना हा मोठा झटका आहे. पहलगामच्या आडून मोदी सरकारला टार्गेट करायचं विरोधकांचं षडयंत्र होतं. सुरुवातीपासून राहुल गांधींनी त्या दिशेने दबाव आणणे सुरू केले होते. मात्र, शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ विरोधी नेत्यानेच या षडयंत्राला बत्ती दिली. युद्धासारख्या संवेदनशील विषयावर उघड चर्चा करणे धोक्याचे आहे, अशी भूमिका शरद पवारांनी घेतली आहे. फार फार तर या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक होऊ शकते, असे त्यांचे म्हणणे होते. पण विरोधकांना देशाच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील अशा या विषयावरही राजकारण करायचे आहे, हे आता लपून राहिलेले नाही. पवारांनीच विरोधकांचे कान टोचले हे योग्यच झाले. पवारांची ही भूमिका साधी नाही; विरोधकांनी चालवलेल्या स्वार्थी राजकारणाचा बुरखा फाडणारी आहे. 'इंडिया आघाडी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विरोधी पक्षांच्या या आघाडीच्या नजीक भविष्यात चिंधड्या उडालेल्या आपल्याला पाहायला मिळतील. शरद पवार विरोधी आघाडीतून बाहेर पडल्यात जमा आहेत. विरोधकांची ही आघाडी बनवण्यासाठी पुढाकार घेणारे शरद पवारच आज वेगळी भूमिका घेत आहेत. याचा अर्थ काय घ्यायचा? शरद पवार 'एनडीए'मध्ये जाणार का? दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचे विलीनीकरण होणार आहे का? तसे होणार नसेल तर मग त्यांच्या राष्ट्रवादीचे काय? त्यांच्या पुतण्याच्या राष्ट्रवादीचे काय? त्यांचा 'हनुमान' खासदार संजय राऊत कुठे जाणार? घाई गडबडीने तसे काहीही होणार नाही. या 'काका'कडे खूप संयम आहे. ते इतरांचा संयम बघतील. पवारांनी



१९९९ मध्ये स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षाचा येत्या १० जूनला वर्धापन दिन आहे. काका-पुतण्या दोघेही आपापल्या राष्ट्रवादीचे वेगवेगळे वर्धापन दिन साजरा करीत आहेत. याचा अर्थ एवढ्यात पवारांचा मोठा निर्णय नाही. पण त्यांना निर्णय करावा लागेल. त्यांच्या पक्षाचे आठ खासदार आणि १० आमदार निवडून आले आहेत. पुतण्याकडे ४१ आमदार आहेत. पुतण्याने थेट भाजपामध्ये उडी घेऊन काकाला मात दिली. हल्लीचे राजकारण हे सत्तेचे झाले आहे. लोकांची कामं करायची म्हटले तर सत्तेच्या जवळ गेले पाहिजे, हे आजच्या राजकारणाचे कटू वास्तव आहे. पुतण्या काकांपेक्षा 'स्मार्ट' निघाला. पुतण्याने ते लवकर ओळखले. काहींचे म्हणणे वेगळे आहे. 'काकाने पुतण्याला आधी पाठवले. काका लवकरच सत्तेसोबत दिसतील.' तसे होईलही; पण मग घोडं अडलं कुठं? धक्कातंत्रासाठी पवार प्रसिद्ध आहेत. तसे झाले तर लोकसभेतील एनडीएचे संख्याबळ ३०१ वर पोचेल. पण 'इंडिया' बनवणारे शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासाठी महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी बनवणारे शरद पवार आज एकदम मोदीभक्त कसे बनले? विरोधकांनाच नव्हे तर भाजपावाल्यांनाही हा प्रश्न पडत असणारच. मग मोदींनी अशी कुठली जादू केली की, कालपर्यंत या 'शिष्या'ला फटाके लावणारे शरद पवार आज अचानक 'गुरू'ची आरती करू लागले. शरद पवार ५० वर्षांहून अधिक काळापासून राजकारणात आहेत. 'याला पाड, त्याला लंबा कर' या पलीकडे पवारांनी राजकारण केल्याचे जुन्या लोकांना आठवत नाही. पण आपल्या याच 'गुणां'च्या जोरावर महाराष्ट्राला नाचवणाऱ्या या मराठा नेत्याला मोदींनी रक्ताचा एकही थेंब न सांडता जिंकले. मोदींना अख्खे जग सलाम का करते ते यावरून ओळखा. मोदींनी पवारांची कमजोरी हेरली. पवारांच्या मनातला हळवा कोपरा शोधला. मग काय, एका फटक्यात पवार मोदीभक्त झाले. पवारांनी अनेकांना बनवले, अनेकांना संपवले. पण एवढ्या वर्षांत ते आपल्या मुलीला प्रस्थापित करू शकले नाहीत. आजही सुप्रिया सुळे या पवारांची कन्या म्हणूनच दिल्लीच्या दरबारात ओळखल्या जातात. मुलींसाठी आपण काहीही करू शकलो नाही म्हणून पवारांना त्यांच्याकडील पित्याचे मन खातंय, हे मोदींनी नेमकं ओळखलं. पवार आज ८५ वर्षांचे आहेत. पुढची लोकसभा निवडणूक येईल तेव्हा पवार ८९ वर्षांचे असतील. थकलेले असतील. राज्यसभा लढतो म्हटले तरी त्यांच्याकडे तेवढे आमदार आहेत कुठे? मग काय? ते तर मोदी आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' प्रकरणात भारताची भूमिका मांडण्यासाठी मोदींनी जगभर ६-७ शिष्टमंडळं पाठवली. त्यात एक शिष्टमंडळ सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वात गेले होते. सुप्रिया सुळेंनी लोकसभेच्या चार निवडणुका जिंकल्या आहेत, संसदरत्न पुरस्कार पटकावले आहेत. पण मोदींनी सुप्रिया यांना ज्या पद्धतीने ओळखले तसे काँग्रेसवाले ओळखू शकले नाहीत. काँग्रेसनेही देशावर राज्य गाजवले. मात्र सुप्रिया सुळेंना एवढा सन्मान कधी मिळाला नाही. काँग्रेसवाले सुळेंना जगापुढे सादर करू शकले नाहीत. मोदींनी एका राजकारणी पित्याचं हळवं दुःख हेरलं आणि आज आपण राजकारणच बदललेलं पाहतो आहे. मोदीच हे करू शकतात. उद्या सुप्रिया सुळे केंद्र सरकारमध्ये मोदींच्या मंत्री झाल्या तर आश्चर्याचा धक्का नको. मोदींची काम करण्याची ही शैली आहे. त्या जोरावर शरद पवार आता मोदी सैन्याचे अलिखित सैनिक झालेले दिसतील. लगेच हे बदल दिसतील अशातला भाग नाही; पण हे होणार आहे. राजकारण झपाट्याने बदलतं आहे. दोन पक्ष म्हणजे काका-पुतण्या एकत्र आले तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे भवितव्य काय असेल? कल्पनाही करवत नाही. यावेळी काँग्रेस त्यांना जवळ करणार नाही. शरद पवार तर दारात उभे करणार नाही. भाजपाने तर त्यांचे दोर मागेच कापून टाकले आहेत. उबाठा हा 'एक्स्पायरी डेट' गेलेला पक्ष झाला आहे. विधानसभेत उबाठा म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अवघे २० आमदार निवडून आले आहेत. उद्धव ठाकरे यांनी भाजपाची संगत सोडली आणि अवघ्या पाच वर्षांत त्यांच्या पक्षाला वाईट दिवस सुरू झाले आहेत. स्वतःला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा यासाठी ठाकरे यांनी खूप आदळआपट केली. ते जमले नाही. आज तर चेहरा लपवण्याची वेळ येऊ घातली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उबाठाचा सोक्षमोक्ष लागलेला असेल. 'भोंगा' वाजणार नाही. संजय राऊत कामाच्या शोधात फिरताना दिसतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### अपात्र बहिणींना वाटलेला पैसा वसूल करा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आलेले अर्ज पडताळण्यासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने सरकारी नोकरी असलेल्या, वार्षिक उत्पन्न अडीच लाखांहून अधिक असलेल्या आणि चारचाकी गाडी असलेल्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतला. या योजनेचा लाभ सर्वांनाच देण्याची चूक झाली अशी कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात न बसणाऱ्या ज्या महिलांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांना दिलेले पैसे परत घेतले जाणार नाहीत तसेच त्यांच्यावर कारवाईही केली जाणार नाही असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पण आता काही महिलांनी या योजनेचा लाभ नको म्हणून अर्ज केले आहेत, तर अपात्र बहिणींकडून रक्कम वसूल केली जाईल, असे शासनाने म्हटले आहे. या योजनेसाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात बसणाऱ्या महिलांनीच खरेतर योजनेसाठी अर्ज करणे अपेक्षित होते; मात्र सरकारी सेवेत गलेलठ्ठ वेतन घेणाऱ्या, घरात मोलकरीण ठेवणाऱ्या, चारचाकी गाडीतून फिरणाऱ्या महिलांनीही या योजनेंतर्गत अर्ज करून या योजनेचा गैरफायदा घेतला. ही केवळ सरकारचीच फसवणूक नसून देशाच्या विकासासाठी आपल्या मिळकतीमधून कररूपाने सरकारला धन देणाऱ्या प्रत्येक सामान्य नागरिकाची फसवणूक आहे. त्यामुळे अशा महिलांवर कारवाई करून त्यांच्याकडून दंडासह रक्कम वसूल करायला हवी. जनतेची आणि सरकारची फसवणूक करणाऱ्या महिलांचे लाड सरकारने का करावेत?

**जगन घाणेकर**/ ९६६४५५९७८०

● ● ● ●

### शिक्षण सुसह्य करावे

दहावी आणि बारावी परीक्षेचा निकाल नुकताच लागला. बारावी उत्तीर्ण विद्यार्थी चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी धडपडत आहेत तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थी आणि पालक अकरावीत कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा यासाठी काथ्याकूट करीत आहेत. दहावीत असताना अनेक विद्यार्थ्यांनी कल चाचणी दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल कोणत्या बाजूने आहे याचा अंदाज विद्यार्थी, पालक, शिक्षकांना आला आहे. असे असतानाही विद्यार्थ्यांच्या पुढील प्रवेशासाठी पालकांची संभ्रमावस्था कायम आहे. कारण आपल्याकडे शिक्षणाचा संबंध नोकरी, व्यवसायाशी जोडला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आवडीपेक्षा भविष्यात विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देतील असाच अभ्यासक्रम निवडण्याकडे पालकांचा कल असतो. अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळावा यासाठी प्रचंड स्पर्धा लागते. त्यासाठी मग प्रवेश फेऱ्यांचे सत्र सुरू होते. प्रवेश मिळेपर्यंत विद्यार्थी व पालक प्रचंड तणावात असतात याचा फायदा घेऊन महाविद्यालये त्या अभ्यासक्रमासाठी मोठी शुल्कवाढ करतात. या सर्वांमध्ये विद्यार्थी अगतिक तर पालक हवालदिल होतात हे चित्र दरवर्षी पाहायला मिळते. दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थी आपल्या भविष्याचे सुखद स्वप्न पाहत असतात. त्यांच्यासाठी मात्र हे दुःस्वप्न ठरते. हे चित्र बदलण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यायला हवा. त्यासाठी सर्वांना मान्य होईल अशी प्रवेश व्यवस्था असायला हवी.

**श्याम ठाणेदार**/ ९९२२५४६२९५

● ● ● ●

### शेतातील बैलजोडीची जागा घेतली ट्रॅक्टरने

काळाच्या ओघात शेतीमध्ये अनेक बदल घडून आले आहेत. पारंपरिक शेती पद्धती, त्यात वापरले जाणारी अवजारे आणि विशेषतः बैलजोडी हे शेतीचं हृदय मानलं जायचं. मात्र आधुनिक काळात तंत्रज्ञानाने आपल्या पद्धती झपाट्याने बदलल्या असून, आज बैलजोडीच्या जागी ट्रॅक्टर दिसतो आहे. या बदलाचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पैलू आहेत. ट्रॅक्टर आल्यामुळे शेतीत अर्थात यांत्रिकीकरणाची लाट आली. श्रमबळाची गरज कमी झाली, वेळेची बचत झाली आणि उत्पादकतेतही वाढ झाली. एकेकाळी ज्या कामांसाठी दिवस खर्च व्हायचा ती कामे आज काही तासांत ट्रॅक्टरच्या साहाय्याने पूर्ण होतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. विशेषतः मोठ्या जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना ट्रॅक्टर हे एक वरदानच ठरले आहे. बैलजोडीची गरज कमी झाल्यामुळे पारंपरिक पशुधन व्यवस्थापनावर परिणाम झाला आहे. बैलांशी निगडित असलेल्या अनेक व्यवसायांना उदा. बैलांची खरेदी-विक्री, त्यांचं पोषण, गवंडी, सुतार, लोहार यांना मागणी कमी झाली. यामुळे पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेतील काही घटक अडचणीत आले आहेत. शिवाय, ट्रॅक्टर हे महागडे साधन आहे. लहान शेतकऱ्यांना ते खरेदी करणे शक्य नसायचे. त्यामुळे शेतीत असमानता वाढण्याची शक्यता आहे. ट्रॅक्टरसाठी डिझेलची आवश्यकता असल्याने इंधनखर्च आणि प्रदूषण या समस्याही वाढतात. बैलजोडी जरी वेळखाऊ असली तरी ती पर्यावरणपूरक व पारंपरिक जीवनशैलीशी सुसंगत होती. म्हणूनच, ट्रॅक्टरने जरी बैलजोडीची जागा घेतली असली, तरी त्या बदलाशी निगडित समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आधुनिकतेचा स्वीकार करताना परंपरेतील शहाणपण जपण्याचा प्रयत्न करायला हवा.

**सागर पिंगळे**/ ७७५६८३६०९१

● ● ● ●

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
https://epaper.dainiktarunbharat.com/

# स्मार्ट सिटीच्या पुढील बैठकीत होणार कामांचे मूल्यमापन

## सोलापूर स्मार्ट सिटी कंपनीचे चेअरमन असीम गुप्ता यांची माहिती; सन २०४५ पर्यंत शहराचा संपूर्ण पाणी प्रश्न सुटेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सोलापूर शहरात झालेली सर्व कामे तपासून, खात्री करूनच महापालिकेने हस्तांतरित केली पाहिजे. समाधान झाल्यानंतरच ताब्यात घ्यावीत. करारानुसार या कामाची देखभाल- दुरुस्ती होईल. त्याचबरोबर विविध कामांमधील त्रुटी पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर स्मार्ट सिटी कंपनीकडून पुरवणी करार करून ही कामे कायदेशीररित्या हस्तांतरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशन कंपनीचे चेअरमन असीम गुप्ता यांनी सोलापुरात दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशन कंपनीची बैठक आज महापालिकेतील इंद्रभुवन मीटिंग हॉलमध्ये पार पडली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी सोलापूर शहरातील स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या कामांची, उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी यासह विविध विषयांची माहिती दिली. यावेळी त्यांच्यासमवेत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे उपस्थित होते.



स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या विविध कामांसंदर्भात बोलताना चेअरमन असीम गुप्ता पुढे म्हणाले, स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सोलापूर शहरात विविध कामे पूर्ण झाली आहेत. या योजनेअंतर्गत आता कोणतेही काम राहणार नाही. स्मार्ट सिटी योजना यापुढे राहणार की नाही याचा निर्णय शासन घेणार आहे. येत्या सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशन कंपनीच्या पुढील बैठकीत स्मार्ट सिटीच्या विविध कामाचा पुन्हा आढावा घेण्यात येणार आहे. त्यावेळी सर्व कामांचे मूल्यमापन केले जाईल. कोणते काम पूर्ण झाले ? कसे झाले? यावरही विचार केला जाईल.

रस्त्यासह इतर कामे निकृष्ट झाली असल्याचा आरोप होत आहे या प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले, सोलापूर महापालिकेने स्मार्ट सिटी अंतर्गत सर्व कामे खात्री करून पूर्ण तपासून हस्तांतरित केली पाहिजेत. समाधान होत नाही तोपर्यंत महापालिकेने ती ताब्यात घेऊ नये. तीन वर्ष देखभाल दुरुस्ती ही करारानुसार मक्तेदाराकडे राहणार आहे. मोठा खर्च करून केलेल्या वास्तूची देखभाल दुरुस्ती व्हावी. मुदतीत देखभाल दुरुस्तीसह स्मार्ट सिटीकडून आता महापालिकेबरोबर पुरवणी हस्तांतरण करार कायदेशीर रित्या करण्यात येईल. चांगले काम करून घेण्याची जबाबदारी आपली आहे. कामातील त्रुटी पूर्ण करण्यात येतील. नऊ वर्षात चांगली कामे केल्याचे समाधान लाभले पाहिजे, अशा पद्धतीने सर्व प्रक्रिया पार पाडण्यात येईल. त्यानंतरच स्मार्ट सिटी कंपनीचे काम संपेल, असे चेअरमन असीम गुप्ता यांनी स्पष्ट केले.

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामा संदर्भात बोलताना असीम गुप्ता म्हणाले, दुहेरी जलवाहिनी कामाची चाचणी सुरू आहे. चांगले काम झाले आहे. येत्या दहा ते पंधरा दिवसात चाचणी प्रक्रिया पूर्ण होईल. अखेर सोलापूर शहराला जलवाहिनीने पाणी येत आहे. रोज २०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे.

### अंतर्गत पाणीपुरवठ्यासाठी पहिल्या फेजमध्ये ३५० कोटीची कामे होणार

सोलापूर शहराला नियमित आणि रोज पाणीपुरवठा झाला पाहिजे. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण होत आहे. मात्र शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्थित करण्यासाठी पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. त्यासाठी ८८२ कोटीच्या प्रकल्पास मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी ३५० कोटी रुपये निधीला शासनाने मंजुरी दिली आहे. टप्प्याटप्प्यात फेजनुसार काम पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या फेजमध्ये ३५० कोटीची कामे करण्यात येणार असून त्यासाठी आराखडाही अंतिम टप्प्यात आहे. आराखड्याला शासन मंजुरी लवकरच मिळेल. सन २०४५ पर्यंत सोलापूर शहराचा संपूर्ण पाणी प्रश्न सुटेल, असा दावा चेअरमन असीम गुप्ता यांनी केला आहे.

### पुढील दिवाळीपर्यंत पाकणी जलशुद्धीकरणाचे काम होईल

पाकणी येथे जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागा मिळाली आहे. दीड दोन महिन्यात प्रक्रिया पूर्ण होईल. या जलशुद्धीकरण केंद्राचे काम एका वर्षात पूर्ण होईल. साधारणतः पुढील दिवाळीपर्यंत हे काम पूर्णत्वास जाईल. शहरात सर्वांना एक सारखा, नियमित आणि रोज पाणीपुरवठा मिळाला पाहिजे. त्याला आणखी काही वर्ष लागतील. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे चेअरमन गुप्ता म्हणाले.

---

## महत्वाचे...



### फोमरा मूकबधिर विद्यालयास रोटरी ग्लोबलकडून मोबाईल व्हॅन भेट

**सोलापूर, दि. ५ जून -**

सोलापुरातील राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयास रोटरी ग्लोबल ग्रँटच्या माध्यमातून मोबाईल व्हॅन, मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी समूह श्रवण यंत्रे आणि शैक्षणिक साहित्य अशी लाखो रुपये किंमतीची अनमोल भेट देण्यात आली. मोबाईल व्हॅन, आणि शैक्षणिक साहित्य प्रदान डॉ रवि वदलामणी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी स्वाती हेरकल, डॉ. सुरेश साबू, रमेश वंगला, सुधीर लातुरे, डॉक्टर गिरीश कुमठेकर, संतोष भंडारी, जयेश पटेल आदी उपस्थित होते. रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा या मूकबधिर विद्यालय मागील ५१ वर्षांपासून गुणवत्ता पूर्ण शिक्षण देत आहे. येथे शिक्षण घेतलेली मुले विविध संस्थांमध्ये तसेच सरकारी कार्यालयात विनम्रतेने सेवा देत आहेत. मूकबधिर विद्यार्थ्यांना पूर्वी सिटीबस सेवा उपलब्ध होती. त्या नंतर रिक्षाने सोय करण्यात आली. पण एकत्रित आणि सुखकर प्रवास घडत नव्हता. आता शहरातील विविध भागात रहिवास असणाऱ्या मूकबधिर विद्यार्थ्यांना एकत्रित रित्या शाळेपर्यंत पोहोचवण्याचे काम या मोबाईल व्हॅन द्वारे घडणार आहे. मूकबधिर विद्यार्थ्यांना ऐकू येण्यास आवश्यक असणारी उपकरणे यामध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत असे डॉ रवि वदलामणी यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ च्या अध्यक्षा डॉ जानवी माखिजा यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या प्रसंगी शाळेचे आधारस्तंभ राजेश दमाणी यांचा सत्कार शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केला. राजगोपाल झंवर यांच्या हस्ते डॉ सुरेश साबू यांचा सत्कार करण्यात आला तर राजलक्ष्मी वडलामणी यांचा सत्कार क्षितिजा गाताडे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा जमादार यांनी केलेतर आभार प्रदर्शन सचिव सुनील दावडा यांनी केले. या कार्यक्रमास अंकित दमानी, दीपक आर्वे, स्वप्नील कोंडगुळे, धनश्री केळकर, संतोष सपकाळ, युगंधर जिंदे, दीपक आहुजा, प्रशांत अपराध, बबनराव शेंडगे, संतोष भंडारी, आसावरी सराफ, डॉ किरण सारडा, डॉ अंजली बलदवा, पारूल पटेल, मुकेश मेहता, संजय चौगुले, डॉ बाळासाहेब शितोळे, डॉ शिरशेट्टी, मूकबधिर शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी आदि उपस्थित होते.



### जगजीवनराम झोपडपट्टी मोदी येथील स्वच्छतागृहाची दुरुस्ती करावी

**सोलापूर, दि. ५ जून-**

जगजीवनराम झोपडपट्टी मोदीतील स्वच्छतागृहची दुरुस्ती करावी, असे निवेदन सोलापूर महानगरपालिकेस युवक पँथरच्या वतीने देण्यात आले आहे. याची कार्यवाही न झाल्यास दुरावस्थेची छायाचित्रे आयुक्त कार्यालसमोर प्रदर्शित करण्याचा ईशाराही त्यांनी दिला आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, जगजीवनराम झोपडपट्टी मोदी,वांगी रोड स्वच्छतागृहची दुरवस्था झाली आहे. जगजीवनराम मोदी मोठया प्रमाणात लोकसंख्या असून त्याचप्रमाणे मोठया संख्येने स्वच्छतागृह आहेत. त्यामुळे स्त्री-पुरुषांची स्वच्छतागृहची अत्यंत निकृष्ठ आणि बिकट अवस्थेत आहे. त्या ठिकाणी पाण्याच्या टाक्या पडक्या अवस्थेत आहे. या ठिकाणी असलेले लाईट बंद पडले आहेत. रात्री शौचालयस जाताना नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शौचालयाच्या सुरक्षा भितीही पावसाळ्यात पडले असून स्वच्छालयालगत आजूबाजूला लोकवस्ती असल्याने त्या अस्वच्छता मुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्वच्छतागृहाचे दरवाजे आणि खिडकी पडल्यामुळे येथील महिलांना येजा करतांना खाली मान करून जावे लागत आहे. त्या दुर्गंधीमुळे लहान मुलांना उलट्या जुलाब व पोट दुखीचा त्रास सुरू झाला आहे.

---

# समाजातील प्रत्येक महिलेच्या सुरक्षेला अधिक प्राधान्य द्या



### उपसभापती नीलम गोऱ्हे यांची सुचना

### गोऱ्हे यांच्याकडून विविध विभागांचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

महिलांवर अत्याचार होऊ नयेत यासाठी पोलीस विभागाने अधिक सतर्क रहावे. साध्या वेषातील पोलिसांची संख्या वाढवावी. भरोसा सेल मध्ये नोंद होणाऱ्या गुन्ह्याबाबत तात्काळ कार्यवाही करून गुन्हे निकाली काढावेत. तसेच समाजातील एकाही महिलांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार होणार नाही; यासाठी पोलीस विभागाने कौटुंबिक संरक्षण कायद्यानुसार महिला सुरक्षेला अधिक प्राधान्य द्यावे, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिल्या.

येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित विविध विभागाच्या आढावा बैठकीत विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त रवि पवार, पोलिस उप आयुक्त दिपाली काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, सोलापूर एस.टी महामंडळाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेने महिलांच्या गरजा लक्षात घेऊन पतपेढी, गुंतवणूक, कर्ज उपलब्ध करून महिलांच्या विकासासाठी प्राधान्य द्यावे. महिलांना जास्तीत जास्त शासनाच्या सोयी सुविधा देऊन महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न करावा. सोलापूर महापालिकेने नागरिकांना नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा तसेच शहरामध्ये स्वच्छता राहील या अनुषंगाने प्रयत्न करावेत. पावसाळ्यातील ड्रेनेज ची कामे व्यवस्थितपणे झाली आहेत की नाहीत याची खात्री करावी. पंढरपूर येथील आषाढी वारीच्या अनुषंगाने एस.टी.स्थानकाची स्वच्छता करावी वारीसाठी एस.टी महामंडळाने सुस्थितीत गाड्या देण्याचे नियोजन करावे, आशा सूचना उपसभापती गोऱ्हे यांनी दिल्या.

उपसभापती नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, महिलांना भरोसा कक्षाच्या माध्यमातून दक्षता समिती सक्षम करण्याची गरज आहे. दक्षता समिती यांनी प्राचार्य, शिक्षीका, प्राध्यापिका, समाजसेविका, सरपंच यांना कौटुंबिक संरक्षण कायद्याचे प्रशिक्षण द्यावे. जिल्हा परिषद, महिला बाल विकास विभाग, पोलिस विभाग यांनी एकत्र लोक अदालत आयोजित करण्यात यावी. कौटुंबिक गुन्ह्यांमध्ये जास्तीत जास्त समझोता करून प्रकरणे निकाली काढण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

---

# अंमली पदार्थासंदर्भात हेल्पलाईन १९३३ वर तक्रार करा

### जिल्हा नार्को समन्वय समिती बैठक

### अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**

केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो दिल्ली कार्यालयाकडून अमली पदार्थांची विक्री वितरण आणि गैरवापर करणाऱ्या लोकांविरुद्ध नॅशनल नार्कोटिक्स हेल्पलाइन क्रमांक १९३३ दिनांक १ जानेवारी २०२५ पासून कार्यान्वित केलेला आहे. ही सेवा २४ तास उपलब्ध असल्याने सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी अंमली पदार्थाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती मिळाल्यास तात्काळ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केले.

पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय नार्कोटिक्स को-ऑर्डिनेशन कमिटीच्या बैठकीत यावलकर मार्गदर्शन करत होते. यावेळी सहायक आयुक्त अन्न व औषध विभाग साहेबराव देसाई, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग गोडसे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे उपस्थित होते.

यावलकर पुढे म्हणाले की, अंमली पदार्थाच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या हेल्पलाइन क्रमांक १९३३ ची सर्व संबंधित विभागाने मोठ्या प्रमाणावर नागरिकांमध्ये जागृती करावी. तसेच सर्व समिती सदस्याने २६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिवस साजरा केला जातो, त्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालय, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, आठवडी बाजार व सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे दुष्परिणामाबाबत रॅली, पथनाट्य, बॅनर्स, होर्डिंग्ज व स्टिकर्स लावून जनजागृती करावी व त्यातून सन २०४७ पर्यंत भारत सरकारचे ''नशामुक्त भारत'' अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विभागाने यावर्षी सुरू होणाऱ्या खरीप हंगामात पीक लागवडी सोबत गांजा व खसखस यासारख्या मादक पिकांची लागवड होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्न व औषध विभागाने जिल्ह्यातील सर्व मेडिकल स्टोअर्स यांना ग्राहकास औषधेही डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय विक्री करू नये या अनुषंगाने सूचना द्याव्यात असे अतिरिक्त पोलीस अध्यक्ष श्री यावलकर यांनी सांगून पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण कार्यालयाकडून अमली पदार्थविरोधी विशेष मोहिम ेच्या काळात ५१ कारवाया करण्यात आल्या तर पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर शहर यांच्याकडून १७ कारवाया करण्यात आल्याची ही माहिती दिली.

यावेळी कृषी विभाग, शिक्षण विभाग, अन्न व औषध प्रशासन, समाज कल्याण विभाग, टपाल विभाग, राज्य उत्पादन शुल्क, वन विभाग, आरोग्य विभाग व माहिती विभाग यांनी अमंली पदार्थाच्या अनुषंगाने करावयाच्या विविध उपाय योजनांची माहिती सविस्तरपणे देण्यात आली.

---

# वृक्षारोपण मोहीम लोकचळवळ होण्याची गरज: मनपा आयुक्त डॉ. ओम्बासे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

सोलापूर शहरातील वनक्षेत्राचे प्रमाण वाढविण्यासाठी यंदाच्या पावसाळ्यात शहरतील उद्याने, रस्त्याची दुभाजके, मनपाच्या हद्दीतील खुल्या जागेमध्ये जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे. त्यानुसार शहरात १ लक्ष वृक्षारोपण मोहीम राबविली जाणार असून, शहरातील नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि महिला बचत गटांनी यामध्ये सहभागी होवून वृक्षारोपण मोहीम लोकचळवळ बनवावी, असे आवाहन सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी आज येथे केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो आणि सोलापूर महानगरपालिका यांच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित वृक्षारोपणप्रसंगी डॉ. ओम्बासे बोलत होते.

यावेळी उपायुक्त तैमूर मुलाणी, किरणकुमार मोरे, सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, सहायक आयुक्त मनीषा मगर, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ सतीश चौगुले, पर्यावरण संवर्धन अधिकारी अक्षय मोरे, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन जोशी, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी आणि निवृत्त अधिकारी सतीश घोडके आदी उपस्थित होते.

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या बैठकीसाठी आलेल्या नगर विकास विभाग (१) चे प्रधान सचिव असीम गुप्ता, पोलीस आयुक्त एम राजकुमार आणि मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे हस्ते महापालिकेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

अमृत २.० व दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत वूमन्स फॉर ट्रीस, एक पेड मां के नाम उपक्रमांतर्गत शहरातील मनपा कॅम्प प्रशाला, गांधी नगर, मनपा शाळा क्र २, मंगळवार पेठ आणि मनपा उद्यान, जानकी नगर, जुळे सोलापूर या ठिकाणी उपायुक्त तैमूर मुलाणी, किरणकुमार मोरे, सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, सहायक आयुक्त मनीषा मगर आणि महिला बचत गटाकडून बकुळ, बहावा, मोहगनी, वड, पिंपळ, कदंब, करंज आणि सोनचाफा आदी देशी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेण्यात आली आणि महिलांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले.

---


### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील सर्व्हे नं.३११/२ब/२/१ यांसी नवीन सर्व्हे नं.१३१/२/ब/२/१ मधील **''स्नेहल पार्क''** या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील बिनशेती प्लॉटजागा मिळकत यांसी **रो-हाऊस क्रमांक १६-अ** याचे एकुण क्षेत्र **७९० चौ.फुट** यात आर.सी.सी. बांधकाम असलेली विद्युत व नळ कनेक्शनसह ३ बी.एच. के. घरजागा मिळकत. यांसी चतुः सिमा :- पुर्वेस - सर्व्हे क्रमांक ३०५ (घर नं.१६), दक्षिणेस : सर्व्हे क्रमांक ३११/२/ब/१ (घर नं.१९ खुलीजागा), पश्चिमेस : सर्व्हे क्रमांक ३११/२अ (घर नं. १७), उत्तरेस : रस्ता. येणेप्रमाणे चतुःसिमेतील नमुद केलेली घरजागा व आतील तदंगभुत वस्तुसह. सदरची घरजागा मिळकत ही व्हिक्टोरिया चार्जेस बॉस्टीन यांचे मालकी कब्जे वहिवाटीची असून, त्यांनी सदर घरजागा मिळकत आमचे अशिलास खुषखरेदीने देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन आमचे अशिलाचे नांवे नोटराईज्ड इसारापावती करारपत्र लिहून दिली आहे. सदर घरजागा मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा वर नमुद मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

तरी सदर घरजागा मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कसलाही हक्क, दावा, गहाण, बोजा, बक्षीस, वहिवाट वगैरे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ (आठ) दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी अगर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणी कांही हक्काची जाणीव करुन न दिल्यास सदर घरजागा मिळकतीवर नमुद मालकांची असून, ती निर्वेध व निजोखमी आहे व सदर मिळकतीत अन्य कोणाचा कसलाही हक्क व हितसंबंध नाही, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाची कांहीही तक्रार चालणार नाही. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. ०४/०६/२०२५

**सही/-**
**ॲड. कपिल शशिकांत रणशृंगारे**
**बी.सी.ए., एलएल.बी.**
**शॉप नं.१३, मेथोडिस्ट चर्चच्या समोर, मोदी, सातरस्ता, सोलापूर**
**मो. नं ९९६०४३७४७७**
**अशिल श्री. सुखदेव नागप्पा दोड्याळकर तर्फे ॲडव्होकेट**



### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
**सूचना**

#### मुलाखतीसाठी भेट द्या

**महिला समाजसेवा समिती, बालविकास मंदिर, मध्य रेल्वे, डीआरएम कार्यालयाव्यतिरिक्त, पोर्टर चाळ, सोलापूर.**

रजिस्ट्रेशन क्रमांक-10134 22/3

CRWWO/सोलापूर द्वारे संचालित बालविकास मंदिर, इंग्रजी माध्यम पूर्व-प्राथमिक शाळा प्राचार्य पदासाठी समाजसेवेची आवड असलेल्या गतिमान, पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवते. **पात्रता निकष:** पात्रता : कोणत्याही विषयात पदवी + डी.एड./बी. एड., प्रशासकीय/व्यवस्थापन कौशल्य असणे आवश्यक आहे, इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषेचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. संगणकाचे ज्ञान अनिवार्य आहे. वयोमर्यादा 40 वर्षे आणि त्याहून अधिक. मुलाखतीच्या वेळी जन्मतारीख पडताळली पाहिजे. निवड - पदासाठी निवड ही CRWWO समितीने घेतलेल्या मुलाखतीच्या आधारे आणि पूर्णपणे तात्पुरत्या आधारावर सामील झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी केली जाईल आणि त्यानंतर समाधानकारक कामगिरीवर कार्यकाळ वाढवला जाईल. **मानधन -** मासिक मानधन पात्रता आणि अनुभवानुसार असेल. **अर्ज कसा करावा** इच्छुक आणि वरील अटी पूर्ण करणारे उमेदवार 18.00 वाजता 12/06/2025 रोजी किंवा त्यापूर्वीच ईमेल आयडी-**wssc.cr.sur@gmall.com** वर ऑनलाइन अर्ज करू शकतात आणि आवश्यक कागदपत्रांसह पीडीएफ स्वरूपात फॉर्म अपलोड करू शकतात. अर्ज रद्द झालेल्या उमेदवारांच्या मुलाखतीची तारीख फॉर्ममध्ये दिलेल्या संपर्क क्रमांकावर नंतर कळवली जाईल. मध्य रेल्वेच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

**मध्य रेल्वे - आमच्याबद्दल- विभाग-सोलापूर-कार्मिक-सूचना.**

अध्यक्ष
CRWWO/सोलापूर

SUN 75

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है



### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
**निविदा सूचना**

**भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.**

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 16-2025-SrDENC | सोलापूर विभागात ADEN(T)/SUR अंतर्गत कट आणि कनेक्शन पद्धतीने दौंड-वाडी-TFTR-3.00 किमी. | रु. 86779938.37 | रु. 583900.00 | 12 महिने | NA |

| | |
|---|---|
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | 25/06/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | 25/06/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता |

**या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.in.**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 74

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है



### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
**निविदा सूचना**

**भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.**

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 13-2025-SrDENC | सोलापूर विभागात सीनियर DEN(S) SUR अधिकारक्षेत्रात ADEN/SUR(T) विभागात TRR(P)-7 किमी, TSR(P)-12.71 किमी, रेल्वेचे कॅज्युअल नूतनीकरण-4 किमी आणि स्लीपरचे कॅज्युअल नूतनीकरण 3 किमी, CTR(P)-5.655 किमी, TRR(P) -4.237 किमी यार्ड, TWSEJ आणि ग्लूड जॉइंट्ससह SEJ चे नूतनीकरण, TTR(TSR) आणि TTR (TWS+WCMS), TFR-36.13 किमी आणि TTR (TFR). | रु. 65391168.44 | रु. 477000.00 | 12 महिने | NA |
| 14-2025-SrDENC | सोलापूर विभागात Sr.DEN(S) SUR अधिकारक्षेत्रात ADEN/KLBG विभागात TSR(P)-11.9 किमी, रेल्वेचे कॅज्युअल नूतनीकरण-4 किमी आणि स्लीपरचे कॅज्युअल नूतनीकरण 3 किमी, CTR(P)-1 किमी यार्डमध्ये, TWSEJ आणि ग्लुएड जॉइंट्ससह SEJ चे नूतनीकरण, TTR(TSR) आणि TTR (TWS+WCMS), TFR -6.1 किमी आणि TTR(TFR). | रु. 37408054.56 | रु. 337100.00 | 12 महिने | NA |
| 15-2025-SrDENC | सोलापूर विभागात DEN/T/SUR च्या अधिकारक्षेत्रात 47.3 किमी टीबीआर काम | रु. 84157008.99 | रु. 570800.00 | 12 महिने | NA |

| | |
|---|---|
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | 23/06/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | 23/06/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता |

**या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.in.**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 73

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### इंडोनेशिया ओपनमध्ये सिंधूचे आव्हान संपुष्टात



**जकार्ता** : दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू गुरुवारी येथे इंडोनेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत जागतिक क्रमवारीत ८ व्या स्थानावर असलेल्या थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगकडून निर्णायक गेममध्ये अपयशी ठरली. सिंधूने निर्णायक गेममध्ये १५-११ अशी आघाडी गमावली व ७८ मिनिटांच्या संघर्षपूर्ण लढतीत २२-२०, १०-२१, १८-२१ असा पराभव पत्करला. पिछाडीनंतरही मी त्याचे विजयात रूपांतर करायला हवे होत असे मला वाटते. तिसऱ्या सेटमध्ये मी १६-१३ अशी आघाडी घेतली होती. त्यासाठी मला सामन्यावर बरेच काही नियंत्रण ठेवावे लागले. मात्र तिथून पोर्नपावीने आगेकूच करत १८-१८ अशी बरोबरी साधली. त्यावेळी या सामन्यावर कोणीही वर्चस्व गाजवू शकले असते, परंतु तिने बाजी मारली, असे सिंधू म्हणाली. पण एकंदरीत, मी माझ्या कामगिरीवर खूश आहे. जर मी आजचे विजयात रूपांतर केले असते तर ते खरोखर चांगले झाले असते. पण हो, या सामन्यातून आणि या स्पर्धेतूनही बरेच काही शिकण्यासारखे आहे आणि पुढच्या सामन्यासाठी तयारी करायची आहे, असे ती म्हणाली. ■

### दिल्ली ग्रॅण्डमास्टर्स ओपनमध्ये १.२१ कोटी रुपयांची बक्षिसे

**नवी दिल्ली** : २१ वी दिल्ली आंतरराष्ट्रीय ओपन ग्रॅण्डमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा ७ ते १४ जून दरम्यान येथे आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेत १.२१ कोटी रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून स्पर्धेत १५ हून अधिक देशांतील २,५०० हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहे. दिल्ली बुद्धिबळ संघटनेने (डीसीए) आयोजित केलेल्या या स्पर्धेत तीन रेटिंग-आधारित विभागांमध्ये २० ग्रॅण्डमास्टर्स सहभागी होतील. ऑल इंडिया बुद्धिबळ महासंघाच्या (एआयसीएफ) नेतृत्वाखाली आयोजित, दिल्ली जीएम ओपन ही आशियातील सर्वात मोठी शास्त्रीय स्वरूपातील बुद्धिबळ स्पर्धा आहे. दोन दशकांपासून, दिल्ली जीएम ओपनने भारतीय बुद्धिबळाचा पाया रचण्यास मदत केली आहे. येथेच तरुण प्रतिभेची चाचणी घेतली जाते, जिथे नियम मिळवले जातात आणि जिथे भविष्यातील ग्रॅण्डमास्टर्स त्यांचे दात काबीज करतात, असे डीसीएचे अध्यक्ष भरत सिंग चौहान म्हणाले. या वर्षीच्या बक्षीस रकमेत गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून येते. यात श्रेणी अ साठी ५१ लाख रुपये (रेटेड खेळाडूंसाठी खुले) आणि श्रेणी ब आणि क साठी प्रत्येकी ३५ लाख रुपये (अनुक्रमे १९०० आणि १७०० वर्षांखालील) देण्यात आले आहेत. सर्व श्रेणींमध्ये प्रत्येक विभागात १० फेऱ्यांसह स्विस प्रणालीचे पालन केले जाईल.

### वाईट वाटतंय, जल्लोषापेक्षा जीव महत्त्वाचा : कपिल देव

**बंगळुरू** : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आयपीएल विजय सोहळ्यादरम्यान ११ चाहत्यांच्या मृत्यूबद्दल दिग्गज कपिल देव यांनी गुरुवारी दुःख व्यक्त केले. विजयाच्या जल्लोषापेक्षा जीव महत्त्वाचा आहे व भविष्यात सर्वांना योग्य खबरदारी घेण्याचा सल्ला दिला. बुधवारी चिन्नास्वामी स्टेडियमजवळील परिसरात आयपीएल विजेत्या आरसीबी संघाचे स्वागत करण्यासाठी सुमारे अडीच लाख लोकांनी गर्दी केली होती, परंतु त्यानंतर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. 'मला त्याबद्दल खूप वाईट वाटतंय. आपण एकमेकांकडून शिकलं पाहिजे. पुढच्या वेळी असे काही (विजय परेड) घडेल तेव्हा लोकांनी अधिक जागरूक राहायला हवे. लोक चूक करतात, असे कपिल देव म्हणाला. १९८३ च्या विश्वचषक विजेत्या भारताच्या कर्णधाराने संघांना आणि इतर भागधारकांना अशा मोठ्या प्रमाणात कार्यक्रम आयोजित करताना संयम राखण्याचे आवाहन केले. 'चूक इतकी मोठी नसावी की तुम्ही मजा करत असता आणि जीव गमावता. भविष्यात जर कोणताही संघ जिंकला तर शांत राहा. आनंद साजरा करण्यापेक्षा जीव जास्त महत्त्वाचा असतो, असा त्यांनी पुनरुच्चार केला.

### लवलीना बोर्गोहेनच्या मुष्टियुद्ध अकादमीचे उद्घाटन

**गुवाहाटी** : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा आणि ऑलिम्पिक पदक विजेत्या लवलीना बोर्गोहेन यांनी उत्तर गुवाहाटीतील बारचंद्र येथे लवलीना बोर्गोहेन मुष्टियुद्ध अकादमीचे उद्घाटन केले. ही अकादमी बोर्गोहेनच्या ईशान्येकडील तळागाळातील तरुणांना सक्षम बनवण्याच्या आणि जागतिक दर्जाच्या बॉक्सिंग प्रतिभेला जोपासण्याच्या दृष्टिकोनात एक महत्त्वाचा टप्पा आहे. गुवाहाटीमधील या प्रकारची पहिली अकादमी, इच्छुक बॉक्सरना उच्च दर्जाची पायाभूत सुविधा आणि त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शन प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवते. ही अकादमी उत्तर गुवाहाटीतील बारचंद्र येथे धोरणात्मकरित्या स्थित आहे आणि त्यात २६ बाय २६ आकाराचे बॉक्सिंग रिंग आहे. ■

# सर्वांचे लक्ष के. एल. राहुलवर

## इंग्लंड लायन्सविरुद्ध दुसरा चार दिवसीय सामना आजपासून

◆ **नॉर्दम्प्टन, ५ जून**

भारत अ विरुद्ध इंग्लंड लायन्स यांच्यात शुक्रवारपासून येथे दुसरा व शेवटचा अनाधिकृत कसोटी क्रिकेट सामन्याला सुरुवात होणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी या सामन्यात भारत अ संघ प्रभावी कामगिरी करण्यासाठी उत्सुक असेल, तर के. एल. राहुल आपल्या पहिल्या अनाधिकृत कसोटी क्रिकेट सामन्याचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे सर्वांचे लक्ष केएल राहुलच्या कामगिरीवर असेल.

भारतातील बहुतांश भागांमध्ये पावसाळा सुरू असल्यामुळे राहुलने २० जूनपासून सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या मालिकेसाठी मुख्य कसोटी संघापूर्वी सराव करण्यासाठी इंग्लंडला रवाना होण्याचा निर्णय घेतला. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ शुक्रवारी उशिरा मुंबईहून रवाना होणार आहे.

इंग्लंडमध्ये दोन शतकांसह वाजवी यश मिळवणारा राहुल हा रोहित शर्मा व विराट कोहलीच्या निवृत्तीनंतर कसोटी संघातील सर्वात वरिष्ठ फलंदाज आहे.

जरी त्याची ५८ कसोटी सामन्यांमध्ये सरासरी ३३.५७ आहे, तरी पारंपारिक स्वरूपात त्याचे बहुतेक यश वरच्या



केएल राहुल



ख्रिस वोक्स

क्रमांकावर आले आहे. तो सलामीला जाणे सुरू ठेवतो की खालच्या क्रमांकावर फलंदाजी करतो हे पाहणे शिल्लक आहे.

गिल व साई सुदर्शनसारखे खेळाडूही दुसऱ्या चार दिवसीय सामन्यात खेळतील अशी अपेक्षा होती, पण त्यांच्या आयपीएलमधील व्यस्ततेमुळे त्यांना संधी मिळाली नाही. या दोघांना लीड्समधील पहिल्या कसोटीपूर्वी संघातील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी संघात खेळण्याची संधी मिळाली.

इंग्लंड लायन्सविरुद्धच्या पहिल्या सामन्यात कसोटी संघातील सहा खेळाडूंनी भाग घेतला होता व या सामन्यात दोन्ही संघांनी मोठ्या प्रमाणात धावा केल्या होत्या. कॅन्टरबरीत न खेळणारा वेगवान गोलंदाज आकाश दीप येथे खेळण्याची शक्यता आहे.

यशस्वी जयस्वाल, अभिमन्यू ईश्वरन व करुण नायर या पहिल्या तीन गोलंदाजांसह दौऱ्यात धावा काढणाऱ्या खेळाडूंमध्ये असल्यामुळे ऋतुराज गायकवाड व ईशान किशनसारख्या खेळाडूंना मध्यभागी खेळण्याची शक्यता आहे.

द्विशतक झळकावणारा नायर पांढऱ्या चेंडूवरून लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये झटपट बदल करण्यात यशस्वी झाला. कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यासाठी त्याच्याकडे दुर्लक्ष करणे कठीण होईल. केएल राहुल सामन्यात मिळणाऱ्या संभाव्य दोन डावांमध्ये आपला खेळ आणखी घट्ट करण्याचा प्रयत्न करेल. वेगवान गोलंदाजीच्या अष्टपैलू खेळाडूच्या जागेसाठी शार्दुल ठाकूर आणि नितीश रेड्डी यांच्यात रस्साखेच होईल. दोघेही कॅन्टरबरीत खेळले, पण ठाकूरने रेड्डीपेक्षा जास्त गोलंदाजी केली. तंदुरुस्तीच्या समस्यांमुळे रेड्डीने आयपीएलच्या बहुतेक सामन्यांमध्ये आपल्या खेळाची चमक दाखविली नाही.

कॅन्टरबरीमध्ये भारत अ संघाला ५५७ धावांचा डोंगर उभारून देताना कर्णधार अभिमन्यू ईश्वरन्ने (२०४) द्विशतकी खेळी केली, सर्फराज खान (९२) व ध्रुव जुरेलनेही (९४) दमदार फलंदाजी केली. त्यांना तोडीस तोड डॅन मौसली, जमान अख्तर व हेनरी क्रोकोम्बेने इंग्लंड लॉयन्ससाठी शतके झळकाविलीत, मात्र दुसऱ्या सामन्यात या तिघांची खेळी बघता येणार नाही. या तिघांनाही टी-२० सामन्यात खेळविण्यात येणार असल्यामुळे त्यांना दुसऱ्या चार दिवसीय सामन्यासाठी संघातून वगळण्यात आले आहे.

इंग्लंड लायन्स संघात वेगवान गोलंदाज जोश टंग व ख्रिस वोक्स प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतील. त्यांना पहिल्या कसोटीसाठी अंतिम अकरा जणांमध्ये स्थान मिळू शकेल.

दुखापतींमुळे त्यांचे मुख्य वेगवान गोलंदाज मार्क वूड व जोफ्रा आर्चर भारत मालिकेत सहभागी होणे शंकास्पद असल्यामुळे इंग्लंडचे वेगवान गोलंदाज पर्याय दुर्मिळ असल्याचे दिसून येत आहे. गस ॲटकिन्सनची सुद्धा लीड्स कसोटीत खेळण्याची शक्यता कमी आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी इंग्लंड संघ जाहीर

## बेथेल, वोक्स, ब्रायडन कार्सलाही संधी

◆ **नवी दिल्ली, ५ जून**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेसाठी भारतीय संघ लवकरच इंग्लंडला पोहोचणार आहे. सध्या भारताचा अ संघ तिथे आहे. बीसीसीआयने आधीच टीम इंडियाचा संघ जाहीर केला होता, आता इंग्लंडने मालिकेच्या पहिल्या सामन्यासाठी आपला संघ जाहीर केला आहे. संघाची कमान बेन स्टोक्सकडे राहील. त्याचबरोबर काही बलाढ्य खेळाडूंना संघात संधी देण्यात आली आहे.

**जिमी ओव्हरटनचे पुनरागमन**

पहिल्या कसोटीसाठी इंग्लंड व वेल्स क्रिकेट मंडळाने जाहीर केलेल्या संघात १४ खेळाडू आहेत. विशेष म्हणजे जिमी ओव्हरटन बऱ्याच काळानंतर पुनरागमन करत आहे. त्याने २०२२ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध खेळताना त्याचा शेवटचा कसोटी सामना खेळला होता, आता तो भारतीय संघाविरुद्धही खेळताना दिसू शकतो.

जेकब बेथेल, ख्रिस वोक्स आणि ब्रायडन कार्सलाही संघात स्थान देण्यात आले आहे. तथापि, झिम्बाब्वेविरुद्ध नुकत्याच झालेल्या कसोटी सामन्यात हे सर्व खेळाडू संघाचा भाग नव्हते.



बेन स्टोक्स



जेकब बेथेल व जिमी ओव्हरटन

**गस ॲटकिन्सन बाहेर, जेमी ओव्हरटन परतला**

जेमी ओव्हरटनला पहिल्या कसोटीसाठी बोलावण्यात आले आहे, कारण गस ॲटकिन्सन दुखापतीमुळे बाहेर आहे. ॲटकिन्सन पहिल्या कसोटीसाठी वेळेत दुखापतीतून बरा होईल, असा सुरुवातीला इंग्लंडला विश्वास होता, परंतु तो अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त झाला नाही. मार्क वूड व ऑली स्टोन गुडघ्याच्या दुखापतीमुळे आधीच मालिकेतून बाहेर आहेत, तर जोफ्रा आर्चर अंगठ्याच्या समस्येमुळे दुसऱ्या कसोटीपर्यंत तंदुरुस्त होणार नाही.

**भारतीय संघासाठी ही मालिका महत्त्वाची आहे**

या मालिकेचा पहिला सामना हेडिंग्ले येथे खेळला जाईल. त्यानंतर कारवां एजबॅस्टन, लॉर्ड्स आणि एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्ड येथे जाईल. मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना ओव्हल येथे आहे. ही मालिका भारतासाठी महत्त्वाची आहे. कारण भारतीय संघाने २००७ पासून इंग्लंडमध्ये कोणतीही मालिका जिंकलेली नाही.

**भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी इंग्लंडचा संघ** : बेन स्टोक्स (कर्णधार), झॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, जेमी स्मिथ (यष्टिरक्षक), शोएब बशीर, जेकब बेथेल, हॅरी ब्रुक, ब्रायडन कार्स, सॅम कुक, जेमी ओव्हरटन, जोश टंग व ख्रिस वोक्स.

**इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघ** : शुभमनगिल (कर्णधार), ऋषभ पंत (यष्टिरक्षक, उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन्, करुण नायर, नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), वॉशिंगटन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, आकाशदीप, अर्शदीप सिंग व कुलदीप यादव. ◀(वृत्तसंस्था)

# सचित्रा सेनानायकेवर मॅच फिक्सिंगचे आरोपपत्र दाखल

◆ **कोलंबो, ५ जून**

२०२० च्या लंका प्रीमियर लीग (एलपीएल) दरम्यान एका सहकारी खेळाडूला मॅच फिक्सिंगसाठी आमिष दाखविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल हंबनटोटा उच्च न्यायालयाने श्रीलंकेचा माजी ऑफ स्पिनर सचित्रा सेनानायकेवर आरोपपत्र दाखल केले आहे.

देशाच्या अलिकडेच लागू झालेल्या भ्रष्टाचार विरोधी कायद्याअंतर्गत मॅच फिक्सिंगसाठी राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेटपटूवर असा हा पहिलाच आरोप आहे, असे ॲटर्नी जनरलच्या विभागाने म्हटले आहे. त्याला २०२३ मध्ये



अटक करण्यात आली व जामिनावर सुटका करण्यात आली. ४० वर्षीय सेनानायकेने २०१२ ते २०१६ दरम्यान श्रीलंकेसाठी एक कसोटी, ४९ वन-डे व २४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि एकूण ७८ बळींची नोंद केली आहे. तो २०१४ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा सदस्य होता.

स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, त्याने त्यावेळी कोलंबो किंग्जकडून खेळणारा दुसरा राष्ट्रीय खेळाडू थरिंदू रत्नायके यांच्याशी भ्रष्ट संपर्क साधला.

सेनानायकेने २०२० मध्ये झालेल्या पहिल्या एलपीएलमध्ये सहभागी झालेल्या इतर दोन क्रिकेटपटूंशी दुबईहून दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि त्यांना मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे, असे श्रीलंकेच्या डेली मिररमधील एका वृत्तात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)



सोलापूर : कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यावेळी जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, क्रीडाधिकारी नदीम शेख आदी उपस्थित होते.

# सोलापूर स्मॅशर्सला नमवून पुणे वॉरियर्सची विजयी सलामी

## महाराष्ट्र महिला प्रीमियर लीग

**पुणे, दि. ५ जून-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) २०२५ स्पर्धेत सलामीच्या लढतीत श्वेता मानेच्या उपयुक्त नाबाद ३८ धावांच्या खेळीच्या जोरावर पुणे वॉरियर्स संघाने सोलापूर स्मॅशर्स संघाचा ५ गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु झालेल्या या स्पर्धेत प्रथम फलंदाजी करताना सोलापूर स्मॅशर्स संघाने २० षटकात ६बाद १३९ धावा केल्या. ईश्वरी अवसरे(८), ईश्वरी सावकार(१) हे सलामीची जोडी झटपट झाल्याने सोलापूर संघाशी सुरुवात फारशी चांगली झाली नाही. त्यानंतर कर्णधार तेजल हसबनीसने ५४चेंडूत ६९ धावांची संयमी खेळी करत संघाचा डाव सावरला.

**संक्षिप्त धावफलक सोलापूर स्मॅशर्स:** २० षटकात ६बाद १३९ (तेजल हसबनीस ६९, मुक्ता मगरे ३६, खुशी मुल्ला २-१९, अनुजा पाटील १-१९, चिन्मयी बोरपाळे १-२६) **पराभुत वि.पुणे वॉरियर्स:** १९.४ षटकात ५ बाद १४२ (श्वेता माने नाबाद ३८, सुहानी कहांडल ३६, अनुजा पाटील ३०, ख़ुशी मुल्ला २३, ईश्वरी अवसरे २-२२, आरती केदार १-३३);सामनावीर - श्वेता माने.




तिने ५चौकार व २ षटकार खेचले. तेजल व मुक्ता मगरे यांनी ८५ चेंडूत १०१ धावांची भागीदारी केली. मुक्ता मगरेने ४६चेंडूत १चौकारासह ३६ धावा केल्या. १३९ धावांचे आव्हान पुणे वॉरियर्स संघाने १९.४ षटकात ५बाद १४२धावा करून पूर्ण केले. यात सुहानी कहांडलने ३८चेंडूत ४चौकाराच्या मदतीने ३६धावा, ख़ुशी मुल्लाने २३ धावा केल्या.

या सलामीच्या जोडीने ५७ चेंडूत ५४ धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर श्वेता माने हिने २४ चेंडूत ५चौकाराच्या मदतीने नाबाद ३८ धावांची खेळी करून संघाला विजय मिळवून दिला. श्वेता माने व अनुजा पाटील(३० धावा) यांनी तिसऱ्या गड्यासाठी ४३चेंडूत ६३ धावांची महत्वपूर्ण खेळी केली.

# भंडारीच्या शानदार शतकामुळे ईगल नाशिक टायटन्सची सलामी

## महाराष्ट्र प्रीमियर लीग : पारीखसह सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीची शानदार खेळी

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ५ जून-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ स्पर्धेत सलामीच्या लढतीत मंदार भंडारी(नाबाद ११२धावा)याने झळकवलेल्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर ईगल नाशिक टायटन्स संघाने गतविजेत्या रत्नागिरी जेट्स संघाचा ८ गडी राखून पराभव करून शानदार सुरुवात केली. विशेष मंदार भंडारी याने एमपीएल स्पर्धेतील वैयक्तिक दुसरे शतक झळकावण्याचा विक्रम नोंदवला. याआधी त्याने १४ जून २०२४ मध्ये एमपीएलच्या दुसऱ्या पर्वात शतकी खेळी केली होती.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत ईगल नाशिक टायटन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना रत्नागिरी जेट्स संघाने २०षटकात ६बाद १९४धावाचे आव्हान उभे केले. सामन्यात पहिल्याच षटकात नाशिकच्या मुकेश चौधरीने रत्नागिरीच्या प्रीतम पाटील(१२धावा)ला झेल बाद करून संघाला पहिला धक्का दिला. त्यानंतर कर्णधार अझीम काझीने ३१ चेंडूत ५चौकार व २षटकारासह ४२ धावा केल्या. अझीम व धीरज फटांगरे या जोडीने ५५ चेंडूत ७५ धावा करून संघाचा डाव सावरला.




**संक्षिप्त धावफलक:**

**रत्नागिरी जेट्स:** २०षटकात ६बाद १९४धावा(धीरज फटांगरे नाबाद ८१(४७,७४, ४४), अझीम काझी ४२(३१,५४,२६), दिव्यांग हिंगणेकर २०, निखिल नाईक १४, प्रीतम पाटील १२, अभिषेक पवार नाबाद १०, मुकेश चौधरी ३-४३, अक्षय वाईकर १-२६, प्रशांत सोळंकी १-३१) पराभूत वि. **ईगल नाशिक टायटन्स:** १८.२ षटकात २ बाद १९५धावा(मंदार भंडारी नाबाद ११२(५६,१२४,६६), साहिल पारीख ४६(२२,५४,३६), अर्शिन कुलकर्णी २९, अझीम काझी १-२१, दिव्यांग हिंगणेकर १-५६); सामनावीर मंदार भंडारी.

### ड्रोन शो, लाईट शोमुळे क्रिकेटप्रेमी मंत्रमुग्ध

एमपीएल स्पर्धेतील सलामीच्या रत्नागिरी जेट्स विरुद्ध ईगल नाशिक टायटन्स लढतीतील पहिला डाव संपल्यानंतर भव्य अशा ड्रोन आणि लाईट शोचे आयोजन करण्यात आले होते. मैदानाच्या भव्य आकाशाच्या विस्तीर्ण कॅनव्हासवर भारतीय सैन्यदल, हवाई दल, नौदल, भारतीय ध्वज, एमपीएल व डब्लूएमपीएल करंडक यांच्या जिवंत झालेल्या प्रतिकृतींचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला. तब्बल ६०६ ड्रोन्सचा वापर करून आकर्षक दृश्य सादर करण्यात आली. या ड्रोन शो च्या माध्यमातून भारतीय संरक्षण दलाला मानवंदना देण्यात आली. हा नेत्रदीपक सोहळा मैदानावर प्रचंड संख्येने उपस्थितअसलेल्या क्रिकेटप्रेमींनी आपल्या मोबाईल कॅमेरात टिपला. असा ड्रोन शो २०२३ विश्वचषकाच्या अंतिम लढतीनंतर आणि आयपीएल स्पर्धेच्या उद्घटनावेळी पार पडला होता.

सलामवीर धीरज फटांगरेने ४७चेंडूत ७चौकार व ४चौकारांसह नाबाद ८१ धावांची अफलातून खेळी करून एकाबाजूने संघाची बाजू सांभाळली. धीरजला दिव्यांग हिंगणेकर २०, निखिल नाईक १४, प्रीतम पाटील १२, अभिषेक पवार नाबाद १० यांनी छोटी खेळी करून साथ दिली. नाशिककडून मुकेश चौधरी(३-४३), अक्षय वाईकर(१-२६), प्रशांत सोळंकी(१-३१) यांनी सुरेख गोलंदाजी केली.

१९५ धावांचे आव्हान ईगल नाशिक टायटन्स संघाने १८.२ षटकात २ गडी बाद १९५ धावा काढून पूर्ण केले. सलामीची जोडी मंदार भंडारी व अर्शिन कुलकर्णी यांनी ७४चेंडूत १२२धावांची भागीदारी करून संघाला सुरेख सुरुवात करून दिली. अर्शिन कुलकर्णी २९धावा काढून तंबूत परतला. कर्णधार अझीम काझीने त्याला झेल बाद केले.

मंदार भंडारीने धडाकेबाज फलंदाजी करताना धावांची शतकी खेळी करून संघाच्या डावात मोलाचा वाटा उचलला. विजयासाठी नाशिक संघाला ४७ चेंडूत ७३ धावा असे समीकरण होते. मंदार भंडारीची तुफानी खेळी व साहिल पारीख(४६धावा) ची साथ यामुळे हे आव्हान १० चेंडू राखून पूर्ण केले. साहिल पारीखने २२चेंडूत ४६ धावा करताना ५चौकार व ३ षटकार खेचले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# उजनीतील गोयेगाव ते आजोती पुलाचा सर्वे तातडीने करा

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.५ जून**

करमाळा तालुक्यातील उजनी जलाशयावरील गोयेगाव (ता. करमाळा) ते आजोती (ता. इंदापूर) या पुलाच्या कामाचा सर्वे करण्याचे काम तातडीने हाती घेण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिकाऱ्यांना आदेश दिले असल्याची माहिती मकाई कारखान्याचे माजी चेअरमन व शिवसेना जिल्हा युवा नेते दिग्विजय बागल यांनी आज येथे दिली.



याबाबत अधिक माहिती देताना श्री बागल म्हणाले की, करमाळा तालुक्यातील गोयेगाव ते इंदापूर तालुक्यातील आजोती हा पूल वाहतुकीच्या व दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. गेल्या वर्षी कुगाव येथील बोट दुर्घटनेमुळे हा पूल अधिक चर्चेत आहे. नागरिकांना करमाळा तालुक्यातून पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे विविध कामांच्या निमित्ताने जावे लागते. बोटीतून होणारा प्रवास अतिशय जीवघेणा व धोकादायक असल्याने गोयेगाव ते आजोती हा पूल होणे अत्यंत गरजेचे होते. परिसरातील नागरिकांची तशी मागणी होती. त्याप्रमाणे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या मागणीचा गांभीर्याने विचार करून गोयेगाव ते आजोती हा पूल तातडीने होणे बाबत सर्वे करण्याचे आदेश मंत्रालयीन पातळीवरून दिले आहेत. त्यामुळे आता या पुलाचा सर्वे करण्याचे काम तातडीने सुरू होईल व हा पूल झाल्यानंतर करमाळा तालुक्यातून पश्चिम भागातून पुणे जिल्ह्याला होणारी वाहतूक सुरळीत होईल असा विश्वास श्री. बागल यांनी यावेळी व्यक्त केला.

---

## महत्त्वाचे...



### सांगोला न.पं. तर्फे वृक्षारोपण

**सांगोला,दि.५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सांगोला नगरपरिषद तर्फे तालुका क्रिडा संकुल येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मनोगतात लावण्यात आलेल्या रोपांची जबाबदारीने जोपासना करावी असे सुचित केले. फॅब्टेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून वृक्षारोपण कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी सांगोला नगरपरिषदेचे अधिकारी सचिन पाडे, रोहीत गाडे, विनोद सर्वगोड, प्रियांका पाटील, अस्मिता निकम, महेश रजपूत, करण सरोदे, प्रभाकर कांबळे, योगेश गंगाधरे व आरिफ मुलाणी यांनीही वृक्षारोपण केले.



### जेऊर रेल्वे स्टेशन आवारात वृक्षारोपण

**जेऊर, दि.५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जेऊर ता. करमाळा येथील रेल्वे स्टेशनवर वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी विविध वृक्षांची लागवड उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. आधुनिकीकरण करण्यात येत असलेल्या जेऊर रेल्वे स्टेशनच्या आवारात विविध वृक्ष लावण्यात आले. या वृक्षारोपण मोहिमेसाठीचा पुढाकार रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप पवार सर यांनी घेतला. ते दरवर्षी वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेतात.यावर्षी त्यांनी जेऊर रेल्वे स्टेशनला झाडे लावण्याचा उपक्रम घेतला.या वेळी शहीद भगतसिंग संघटनेचे अध्यक्ष प्रवीण करे, उपाध्यक्ष बाळासाहेब गरड,नाभिक संघटनेचे अध्यक्ष संदिपान समाजसेवक, सचिन निमगिरे, किरकोळ व्यापारी संघटनेचे अध्यक्ष पवन कोठारी, रामेश्वर सूर्यवंशी, रमीजभाई शेख, अमोल वाक्षे, नजीर चाचा नदाफ, दत्तात्रय मारकड, असलम शेख, रेल्वे स्टेशनचे प्रबंधक मीना, रेल्वे स्टेशनचे कर्मचारी व जेऊर ग्रामस्थ उपस्थित होते.



### 'लोकमंगल कृषी' मध्ये मुलांनी केले बीजगोळे; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम

**सोलापूर,दि.५ जून-**

वडाळा (ता.उत्तर सोलापूर) येथील श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी कडुलिंबाच्या बियांचे बीज गोळे (सीड बॉल) श्रमदानातून तयार केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण दिनाचे महत्त्व, थीम, प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण आणि त्यावरील उपाय याबाबत जागृत केले. प्लास्टिकमुळे पृथ्वीवर होणारे गंभीर परिणाम याबाबत चलचित्रफितीच्या माध्यमातून त्यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना संबोधित करताना नैसर्गिक शेती, जैविक खते व कीटकनाशकांचा वापर, प्लास्टिक मुळे मानवी आरोग्यावर होणारे हानीकारक परिणाम याबाबत विचार मांडले. सूत्रसंचालन व प्रा. अजित कुरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. सुजाता चौगुले, प्रा. नम्रता गोरे, प्रा. प्रज्ञा कुदळे, प्रा. सुकन्या जाधव, प्रा. कल्पना मिटकरी, डॉ. विजयारणी दावणे, प्रा. अजिंक्य ढोरे उपस्थित होते.



### एस.आर.पी कॅम्प येथे १५१झाडांचे रोपण

**सोलापूर, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एस.आर.पी कॅम्प येथे १५१झाडांचा वृक्षारोपणाचा कार्यक्रम शारीरिक शिक्षण संचालक संतोष गवळी, तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, राष्ट्रीय खो खो खेळाडू मयुरी पवार यांच्या हस्ते संपन्न झाला. इको क्लब नेचरचे मनोज देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली व एस.आर.पी.एफ ग्रुप नंबर १० च्या जवानांच्या सहकार्यांने १०० खड्डे घेण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध झाडांच्या बियांचे रोपण स्वहस्ते केले. मुख्याध्यापक पुंडलिक कलखांबकर यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सन्मान वृक्ष व शाल देऊन करण्यात आला. समादेशक पंकज अतुलकर, सहायक समादेशक श्री मते, श्री साळुंखे व श्री. शेडमाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री टोणपे व सर्व जवानांच्या सहकाऱ्यांने वृक्षारोपण करण्यात आले.

### अनंत गाजूल याचे निधन



**सोलापूर, दि. ५ जून-**

जुना विडी घरकुल येथील चि.अनंत नागेश गाजूल (वय ३) याचे निधन झाले. त्याच्या पश्चात आजी, आजोबा, आई, वडील, एक बहीण असा परिवार आहे.

---

# श्रीपूर येथे 'कर्मयोगी' तर्फे वड, आंबा, चिंच, नारळ, पिंपळाची लागवड

### आत्तापर्यंत केले २५ हजार वृक्षांचे संवर्धन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ५ जून-**

श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदशनाखाली कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलास खुळे व कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी वृक्ष लागवडीने निसर्गाचा समतोल राखला जाऊन पर्यावरण चांगले होण्यास मदत होते असे व्यक्तव्य कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे यांनी केले.

कारखान्याने आजपर्यंत सुमारे २५ हजार वृक्षांची लागवड केली आहे. या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र शासनाने सर्वश्रेष्ठ वनश्री पुरस्काराने कारखान्यास सन्मानीत केले आहे. यावर्षी पाऊस लवकर सुरु झाल्याने मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करुन त्याची योग्य प्रकारे जोपासना करणेचे नियोजन कारखान्याने केले असून यामध्ये वड, आंबा, चिंच, नारळ, पिंपळ इ. वृक्षांचा समावेश आहे. यावेळी प्रोडक्शन मॅनेजर एम.आर.कुलकर्णी, केन मॅनेजर एस.सी.कुमठेकर, चीफ अकौंटंट आर.एम.काकडे, चिफ इंजि.ए.डी.बारटक्के, को-जन मॅनेजर एस.एस. विभुते, डिस्टीलरी मॅनेजर आर.एस.पाटील, ऊस विकास अधिकारी एस.पी.भालेकर, संगणक प्रमुख टी.एस.भोसले, कार्यालयीन अधिक्षक बी.एस.बाबर, मटेरियल मॅनेजर एम.जे.देशपांडे, इन्स्ट्रुमेंट मॅनेजर समीर सय्यद, सिव्हील इंजिनिअर एच.एस.नागणे, हेड टा.कीपर एम.एन.कदम, इस्टेट मॅनेजर आर.डी.गाजरे, पर्यावरण अधिकारी एस.ए.ताम्हाणे, उपस्थित होते.

> **कुशाग्र घटकामुळे पर्यावरण समतोलास मदत**
>
> मानव हा पर्यावरणातील एक कुशाग्र घटक असल्याने त्यामध्ये मानवी हस्तक्षेप वाढला आहे त्यामुळे मृदावरण, जीवावरण, जलावरण, वातावरण या सर्व घटकांचा समावेश अभियांत्रिकी शाखांमधून केला असून त्यामधून पर्यावरण रक्षण करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केले जात आहे. जेणेकरून पर्यावरण विषयी एकसंध व संतुलिक दृष्टीकोन प्रत्येक मानवात तयार होईल.
>
> **- डॉ . यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक**

---



# 'कृषी संकल्प' अंतर्गत श्रीपुर येथे डाळिंबाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ जून-**

महाळुंग-श्रीपुर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या कृषी विज्ञान केंद्र तसेच राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र सोलापूर व कृषी विभाग यांनी संयुक्त भेट देऊन डाळिंब क्षेत्राची पाहणी करण्यात आली. त्यावेळी

सूत्रकृमी व्यवस्थापनाकरिता जैविक घटकांचा लागवडीपासून दर सहा महिन्यातून एकदा वापर करावा असे महाळुंग येथील शेतकऱ्यांच्या शेतावर पाहणी करतेवेळी डॉ. पिंकी रायगोंड यांनी माहिती दिली. यावेळी डॉ. तानाजी वळकुंडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ स्वाती कदम यांनी ऊस पाचट व्यवस्थापन संदर्भात उदबोधित केले. डॉ. बसवराज रायगोंड शास्त्रज्ञ, भरड धान्याची ओळख विषयी माहिती दिली. तसेच इतर पीक संदर्भातील अडचणी जाणून घेतल्या त्या संदर्भात मार्गदर्शन केले डॉ. सुरज मिसाळ यांनी सध्या पिक परिस्थिती व त्यावरील उपाय योजना सांगितल्या तसेच सध्या चालू असलेल्या कृषी संकल्प रथयात्रेच्या अनुषंगाने डॉ. वैरागकर यांनी जलतारा योजने अंतर्गत पाणी पुनर्भरण यासंदर्भात मार्गदर्शन केले. या वेळी महाळुंग-श्रीपुर नगरपंचायत चे नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी सहाय्यक कृषि अधिकारी भागवत शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्र मोहोळ व श्रीपुर महाळुंग ग्रामस्थांनी विशेष प्रयत्न केले.

---

# मागील भांडणाच्या वादातून एकावर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज, दि. ५ जून-**

तुला लय मस्ती आली आहे काय? तु मागच्यावेळी वाचलास, आत्ता तुला सोडणार नाही असे म्हणुन तिघांनी विष्णू सदाशिव घाडगे रा. कोंडबावी, ता. माळशिरस यांना हाताने व दगडांनी मारहाण केली. याबाबतची फिर्याद स्वतः विष्णू घाडगे यांनी अकलूज पोलिसांमध्ये दिली आहे.

याबाबत अकलूज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ४ जून २०२५ रोजी विष्णू घाडगे हे त्यांचा मित्र माऊली सुळ (रा. मोरोची, ता. माळशिरस) त्याचे स्कॉर्पिओ गाडीतुन अकलुज येथे गिरीराज पान शॉप समोर गाडी पार्किंग करून चहा पिण्यासाठी चालले असता त्यांचे गाडीच्या पाठीमागे एक स्विप्ट डिझायर गाडी येवुन उभी राहीली. तेव्हा सदर गाडीतुन सागर धुमाळ (रा. नवचारी बागेचीवाडी), चिरंजीव दत्तात्रय वाघमारे (रा. कोंडबावी, भैया डांगे रा. वाघवस्ती बागेचीवाडी) हे उतरले. त्या गाडीत आणखी दोघे संतोष दत्तात्रय वाघमारे (रा. कोंडबावी) व उमेश धुमाळ (रा. नवचारी बागेचीवाडी) हे बसलेले होते. त्यानंतर सागर धुमाळ, चिरंजीव वाघमारे, भैया डांगे यांनी विष्णू तुला लय मस्ती आली आहे काय? तु मागच्यावेळी वाचलास, आता तुला सोडणार नाही असे म्हणुन तिघांनी विष्णू यांना मारहाण केली. गाडीत बसलेले संतोष दत्तात्रय वाघमारे व उमेश धुमाळ हे बाहेर आले. त्यावेळी संतोष दत्तात्रय वाघमारे हा हातात गज घेवुन मला विष्णू यांना मारण्यासाठी आला त्यावेळी विष्णू बाजुला झाल्याने त्यांना गज लागला नाही. तसेच मी मोक्का केस मधुन सुटुन आलो असुन मला काही होत नाही म्हणुन तु केस केली तर बघ अशी धमकी दिली व उमेश धुमाळ यांने शिवीगाळी करून हाताने मारहाण केली. तसेच सागर धुमाळ यांने विष्णू यांच्या गळ्यातील तीन तोळ्याचे सोन्याचे लॉकेट व चिरंजीव वाघमारे यांने उजव्या हाताचे बोटातली एक तोळ्याची सोन्याची अंगठी मारामारी मध्ये काढुन घेतली. विष्णू घाडगे यांना उजवे डोळ्यास, नाकास, छातीस मार लागुन दुखापत झाल्याने त्यांचा मित्र माऊली सुळ यांने घाडगे यांना पोलीस ठाणे येथे नेवुन तेथे दवाखाना यादी घेवुन उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय अकलुज येथे नेले. तेथे डॉक्टरांनी तपासुन पुढील उपचाराकरीता सिव्हील हॉस्पिटल सोलापुर येथे पाठवले. परंतु घाडगे यांच्या सोईनुसार अकलुज, ता. माळशिरस येथे त्यांचेवर उपचार चालु आहेत.

---

# सांगोल्यात वीरशैव लिंगायत सभागृहाचे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.५ जून-**

सांगोला शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील वीरशैव लिंगायत समाज बहुउद्देशीय सभागृहाचे भूमिपूजन मत्स्योद्योग व बंदरे विकास कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते गुरुवार दि.५ जून रोजी संपन्न झाले. यावेळी आ.सचिन कल्याणशेट्टी, भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, शशिकांत चव्हाण, हिंदू जागरण मंचाचे जिल्हा संघटक देवाभाऊ कोकाटे, युवासेना तालुका प्रमुख गुंडादादा खटकाळे, वीरशैव लिंगायत सभा सांगोला तालुका अध्यक्ष महेश गुळमिरे, महात्मा बसवेश्वर युवक संघटनेचे अध्यक्ष संदेश पलसे, अरविंद केदार, जगदीश बाबर उपस्थित होते.



यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ना.नितेश राणे म्हणाले, आमच्या हिंदू समाजाला जे अपेक्षित काम आहे ते हिंदुत्ववादी विचाराचे सरकार म्हणून आमचं सरकार करणार आहे. हिंदुत्ववादी विचाराचे कार्यकर्ते म्हणून आम्ही सगळेजण काम करणार आणि आज जसे भूमिपूजनासाठी आम्ही सगळे एकत्र आलो आहोत त्याच पद्धतीने लवकरच भव्य अशा भगव्या उद्घाटनासाठी पण आम्ही सगळेजण मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहोत.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ना.नितेश राणे यांनी अभिवादन केले. यावेळी वीरशैव लिंगायत समाज महिला मंडळ व सकल हिंदू समाज, सांगोला यांच्यावतीने मंत्री राणे यांचा सत्कार करण्यात आला. सदर वीरशैव लिंगायत समाज बहुउद्देशीय सभागृहाची भूमिपूजन पूजा गायत्री पाटणे व राहुल पाटणे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी लिंगायत समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# यंदाचा पावसाळा बेडकांना पोषक; बेडूक झाले सक्रिय

### रोडावत चाललेल्या बेडकांची संख्या वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ जून-**

गेल्या दहा बारा वर्षात मान्सूनचे आगमन कधीच वेळेवर झाले नव्हते; परिणामी शेतकऱ्यांचे मित्र व अन्नसाखळीतील प्रमुख घटक म्हणून ओळख असलेले बेडूक नष्ट होण्याच्या मार्गावर होते. मात्र यंदा पावसाचे आगमन वेळेवर झाल्यामुळेच परिसरात उरलेसुरले बेडकं आपल्या जीवनक्रमात सक्रिय झाल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. यंदाचा अवकाळी पाऊस जोरदार बरसल्याने शेतशिवारातील पाण्याचे डबके, नाले, तालीम या ठिकाणी बेडकांचे डरांव डरांव कानी पडत आहे.

मागील काही दिवसांत ऐन उन्हाळ्यात झोडपलेल्या मान्सून पूर्व पावसामुळे संपूर्ण महाराष्ट्र जलमय झाला आहे. या जोरदार अवकाळी पावसामुळे शेतजमिनीतील ताली, जनवसतीतील डबकी, नाले-ओढे तुडुंब भरल्या मुळे अस्तित्व हरवण्याच्या मार्गावर असलेल्या बेडकांना प्राणदया मिळाले आहे. हा अवकाळी पाऊस बेडकांचे अस्तित्व टिकविण्यासाठी नक्की उपयोगी ठरेल. भात खाचरात पाणी साठून त्यांना तलावाचे स्वरूप आल्यामुळे बेडकांचे जीवनचक्र पूर्ण करण्यास पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे यंदाच्या भातशेती जोमाने बहरून कमाल मर्यादेचे उत्पन्न होईल असा अंदाज भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. बेडूक हा कीटकाहारी प्राणी आहे. पिकांना हानी पोहचविणाऱ्या कीटकांना बेडूक कर्दनकाळ ठरतात. बेडूक पर्यावरणातील समतोल राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

#### बेडकांतील शीतकालीन समाधी

वातावरणात बदल होणाऱ्या तापमानाची जुळवून घेण्याची क्षमता असलेल्या व शीतरक्तीय बेडकांमधध्ये 'शीतकालीन समाधी' ही जीवन घटना वैशिष्ट्यपूर्ण आहे. पावसाळा व हिवाळा संपल्यानंतर उन्हाळ्यात बेडकं निष्क्रिय होऊन सुप्तावस्थेत जाऊन पुढील पावसाळ्यापर्यंत सुप्त जीवन पत्करतात. उन्हाळ्यात बेडकं जमिनीतील मातीत स्वतःला गाढून घेतात. बेडकांतील या सवयीला शीतनिद्रा किंवा शीतकालीन समाधी असे म्हणतात. सुप्त अवस्थेतील बेडकांमध्ये शारीरिक चयापचय क्रिया अतिशय मंद गतीने चालत असतात. या काळात बेडकं फुफ्फुसांऐवजी त्वचेमार्फत श्वसनक्रिया चालू ठेवतात आणि शरीरातील साठवून ठेवलेल्या चरबीचा ऊर्जेसाठी वापर करतात. जूनमध्ये पावसाळा प्रारंभ झाला की वातावरणातील बदलाला प्रतिसाद देत हे उभयचर प्राणी वातावरणात पुन्हा सक्रीय होऊन प्रजननासाठी सरसावतात.

> बेडूक नैसर्गिक अन्न साखळीतील एक महत्त्वाचा घटक आहेत आणि ते कीटकांची संख्या नियंत्रित करतात. यंदा मान्सून पूर्व पाऊस मनसोक्त बसल्यामुळे बेडकांना संजीवनी मिळाली आहे. या पावसाळ्यात बेडकांच्या संख्येत वाढ होईल व पर्यावरणाचे समतोलन राखण्यात मदत होईल. बेडकांचा विविध मार्गाने वारेमाप वापर केल्यामुळे जाणवत असलेल्या पर्यावरणातील असमतोल हे लक्षात घेऊन शासनाने प्रयोगशाळेत बेडकांच्या वापरावर बंदी घातली आहे.
>
> **-डॉ. अरविंद कुंभार, प्राणिशास्त्र अभ्यासक**



#### बेडकांची संख्या रोडावण्याचे कारण

पूर्वी शाळा महाविद्यालयात विज्ञान शाखेकडील अभ्यासक्रमाला अनुसरून प्रयोगशाळेत प्रचंड प्रमाणित बेडकांचे विच्छेदनासाठी वापर होत असे. भारतातील गोवा राज्यात तसेच परदेशात बेडकांच्या मांसाला मोठी मागणी होती. बेडकांच्या मांडीचे फ्राय करून 'जंपिंग चिकन' या नावाने तारांकित होटेल मध्ये रेसिपी म्हणून खवय्यांची चोचले पुरवण्यासाठी बेडकांची शिकार केली जात होती. जागतिक तापमानवाढीमुळे पावसाळ्याचे वेळापत्रक बिघडल्यामुळे बेडकांच्या जीवनचक्रावर अरिष्ट परिणाम झाला आहे. शेती व्यवसायात विंधन विहिरींची संख्या वाढून विहिरी कमी होऊन बेडकांच्या अधिवासांवर संकट कोसळले आहे. या कारणां मुळे बेडकांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात घट झाली आहे.

#### बेडूक प्रयोगशाळेतून हद्दपार

कित्येक वर्षांपासून शाळा महाविद्यालय व संशोधन केंद्रातील प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना प्राण्यांच्या शरीर रचनेची माहिती देण्यासाठी प्रचंड प्रमाणात बेडूक विच्छेदनासाठी वापरत होते. बेडकांचे वारेमाप विच्छेदन होत असल्यामुळे बेडूक लुप्त होत चालल्यानंतर शेती व्यवसायावर व पर्यावरणावर विपरीत परिणाम दिसून आले. या कारणामुळे शासनाने प्रयोगशाळेत बेडूक वापरण्यावर २०११ पासून बंदी घातली. अनेक कारणांमुळे बेडूक जीवावर बेतले जात होते; त्यामुळे बेडूक वाचण्यासाठी पीपल्स फॅर एथिक ट्रीटमेंट ऑफ एनिमल्स (झएढ) या संस्थेने पुढाकार घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाकडे संपर्क साधून बेडकांच्या वापरावर बंदी आणली. या निर्णयामुळे बेडूक पकडणे गुन्हा ठरतो.

#### बेडूक आणि सामाजिक महत्त्व

बेडकांच्या पावसाळ्यातील राजा समजतात. पाऊस न झाल्यास किंवा पाऊस लांबला तर बेडकांचे लग्न लावण्याची प्रथा आहे. अनेक संस्कृतीत बेडकांना शुभ मानले जाते व त्यांना समृध्दीचे प्रतीक समजतात. जो संकुचित मनाचा असतो व ज्याला बाहेरचे जग माहित नाही त्याला कूप मंडूक म्हणून संबोधले जाते. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या सीमावर्तीय दुष्काळी जिल्ह्यातील शेतकरी पावसासाठी बेडकांची पूजा करत साकडं घालतात. पुराणात 'मांडुकासुक्त' चरित्र सर्वश्रुत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा उपयुक्त व नाविन्यपूर्ण प्रकल्प

**सोलापूर, दि. ५ जून-**

भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग येथील संगणक अभियांत्रिकी शाखेतील द्वितीय वर्षाचे विद्यार्थी कार्तिक कोथलकर आणि सूरज मारूयांनी अत्यंत उपयुक्त व नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवा आयाम दिला आहे. कार्तिकने विकसित केलेली "SIDDHI AI"' ही प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली कोणत्याही समस्येचे अचूक विश्लेषण करून योग्य समाधान सुचवते. ही प्रणाली उद्योग, वैद्यकीय, शिक्षण इत्यादी क्षेत्रात उपयुक्त ठरणारी आहे. सूरजने तयार केलेला महिला सुरक्षा प्रकल्प महिलांना संकटाच्या वेळी तत्काळ मदत मिळवून देण्यासाठी विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महिलांची सुरक्षितता वाढवण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. या दोन्ही प्रकल्पांना समीर शेख आणि डॉ. सोहेल राणा यांचे तांत्रिक तर संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख आनंद ग्यानबोटे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच या प्रकल्पांचे पेटंट अर्ज सादर करण्यात आले असून, भविष्यात हे प्रकल्प व्यावसायिक आणि सामाजिक उपयोगासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. महाविद्यालयाचे चेअरमन इंजि. रविद्र गायकवाड आणि सेक्रेटरी अनामिका गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मुलीची गळफास घेऊन आत्महत्या; वडीलांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ जून -**

काळ्या तोंडाची म्हणून मुलीला सतत शिवीगाळ व मारहाण केल्याने मुलीने नैराश्यातून गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी आईच्या फिर्यादीवरुन वडीलांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रियदर्शनी श्रीकांत शिंदे (रा. भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. याबाबत अनुराधा श्रीकांत शिंदे (वय २८) यांच्य फिर्यादीवरुन श्रीकांत मोतीलाल शिंदे याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुराधा शिंदे यांचे श्रीकांत शिंदे हे पती असून मयत प्रियदर्शनी व तन्वी अशा दोन मुली आहे. श्रीकांत यांच्याकडून त्यांची मोठी मुलगी प्रियदर्शनी व लहान मुलगी तन्वी यांच्यात सतत तुलना करण्यात येत होती. श्रीकांत हे मुलगी प्रियदर्शनी हिस काळ्या तोंडाची असे म्हणून सतत शिवीगाळ करीत असत. तसेच दारूच्या नशेत अनुराधा व त्यांच्या माहेरच्या लोकांना ही सतत शिवीगाळ व मारहाण करीत. म्हणून मुलगी मयत प्रियदर्शनी ही सतत नैराश्यात होती. वडील श्रीकांत यांच्या सततच्या त्रासाबद्दल प्रियदर्शनी हिने तिची मैत्रीण शुभांगी मेकाले सांगितले होते. २५ एप्रिल २०२५ रोजी साडेसातच्या सुमारास वडील श्रीकांत यांच्या त्रासाला कंटाळून प्रियदर्शनी हिने घरातील किचनमधील छताच्या लोखंडी हुकाला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. प्रियदर्शनी हिच्या आत्महत्येस वडील श्रीकांत हेच जबाबदार असल्याची फिर्याद अनुराधा यांनी दिल्याने याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनकर पुढील तपास करीत आहेत.

### हुलजंतीत शेतीच्या बांधावरून भावकीत हाणामारी; पाचजण जखमी

**सोलापूर, दि. ५ जून -**

शेतीच्या बांधाच्या कारणावरून झालेल्या भांडणात पाच जण जखमी झाले. ही हाणामारी मंगळवेढा येथील हुलजंती गावात भावकीत बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास झाली. बिराप्पा रायप्पा कोठे (वय ५७), प्रियंका बिरप्पा कोठे (वय १८), खणव्वा बिरप्पा कोठे (वय ३५), सुरमेंदर रायप्पा कोठे (वय ५१) व रायप्पा धोंडप्पा कोठे (वय ७०, सर्व रा. हुलजंती ता. मंगळवेढा ) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. बिराप्पा कोठे यांची हुलजंती परिसरात शेती आहे. बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास शेतातील बांधाच्या कारणावरून त्यांची जकराया कोठे व इतरांबरोबर तक्रार झाली. यात जकराया कोठे, आण्णप्पा कोठे, मारुती कोठे व इतर सहा जणांनी लोखंडी रॉड व लाकडाने मारल्याने खणव्वा हिच्या हाताला व सुरमेंदरच्या पाठीला जखम झाली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने पाच जणांनी मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेतला. त्यानंतर रात्री १०.१० वाजता सर्वजण शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरात घुसून महिलेस व तिच्या पतीस शिवीगाळ करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ जून-**

घरात घुसून महिलेस व तिच्या पतीस शिवीगाळ करणाऱ्या महिलेवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिनाक्षी दिनेश बनसोडे (वय ३०, रा. बसवंतराव पाटील नगर, दहिटणे, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सपना बालू वाडेकर (रा. विद्या नगर, शेळगी, सोलापूर) या महिलेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ जून रोजी सायंकाळी मिनाक्षी बनसोडे या पती, बहिणीचा मुलगा, वडील व मुलांसोबत घरात बसलेल्या होत्या. त्यावेळी सपना वाडेकर ही महिला बनसोडे यांच्या घरात बेकायदेशीरपणे घुसून मिनाक्षी यांच्या पतीस तु माझ्या सोबतच रहायचे, बायकोसोबत रहायचे नाही, नाही तर तुला जीवे मारतो व तुझ्या घराच्यांनाही जीवे मारतो अशी धमकी देत शिवीगाळ केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.

# खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा!

**● जायचं कुठून यायचं कुठून; शहरवासीयांना नेमके हेच कळेना ● महापालिकेच्या गौडबंगाल कामकाजाचा काही केल्या लागेना थांगपत्ता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

यंदा प्रथमच मे महिन्यात त्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात बरसलेल्या अवकाळी पावसाने सोलापूर शहराचा चेहरा मोहराचे बदलून टाकला आहे. सोलापूर शहराच्या स्मार्ट रस्त्यांची अक्षरशः दैना उडाली आहेत. ''खड्ड्यात रस्ता.... की रस्त्यात खड्डा...जायचं कुठून यायचं कुठून शहरवासीयांना नेमकं हेच कळत नाहीये.''शहरातील अनेक रस्त्यांवर लहान मोठ्या आकाराचे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यात पावसाचे पाणी साचून सर्वत्र चिखलाचा राडा निर्माण होत आहे. अशातच वाहनधारकांना कार्य वर्षी घसरत करत वाहने चालवावे लागत असल्याने अपघाताचा धोका बळावत आहे.

दरम्यान, शहरातील प्रमुख चौकात तसेच हद्दवाढ भागातील स्मार्ट रस्त्यांची अवस्था काळानुरूप दयनीय बनलेली आहे. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची डागडुजी किंवा दुबार डांबरीकरण करणे गरजेचे असताना ते केले जात नाही. त्यामुळे खराब रस्त्यांची अवस्था आणखीनच दयनीय बनलेली आहे. खड्ड्यात रस्ता आहे की रस्ताच खड्ड्यात आहे. हा प्रश्न वाहनधारकांना नागरिकांना सतावत आहे. सोलापूर शहरातील अनेक सखल भागात पावसाचे पाणी साचल्यने तळे निमार्ण होतेय. अशा परिस्थितीत नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. शहरातील सम्राट चौक, कुमठा नाका, स्टॅन्ड परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य पडलेले आहे. तर काही ठिकाणी नवीन रस्त्यांची पहिल्याच पावसात अक्षरशः धूळधान उडालेली आहे. संबंधित रस्त्यांची डागडुजी करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु आज झालेल्या पावसात खडी डांबर धुवून निघालेले आहेत. ''लाव लिजाव टिमकी बजाव'' अशी भूमिका महापालिका प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांनी घेतल्याने पावसाळ्यात रस्त्यांची दैना उडत आहे. यामुळे नागरिकांच्या जीवाला चैन पडत नाही. खड्ड्यातून वाहन चालवताना वाहनधारकांना मणक्याचे तसेच पाठीचे अनेक विकार होत आहेत. खड्ड्यात साचलेल्या पाण्यामुळे खड्ड्याचा अंदाज न येता गंभीर दुखापत उद्भवत आहे. सोलापूर आहे की खड्डापूर अशी गत स्मार्टसिटीची झालेली आहे.

खड्डे बुजवण्याच्या नावाखाली रस्त्यांवर ठिगळ लावली जातात. कुमठा नाका रोडवर अशाच पद्धतीने रस्त्याचे काम केले. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पावसात रस्त्यावरील खडे आणि डांबर वाहून गेले. त्यामुळे पुन्हा एकदा या रस्त्यावर खड्ड्याचे अस्तित्व जाणवत आहे. त्याच पद्धतीने रस्त्याच्या कडेला नेहमीच मातीचे ढीग साचलेले असतात.





**सोलापूर : शहरातील विविध रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पडलेले आसून त्या खड्ड्यातून वाट काढताना वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत असताना सम्राट चौक येथे टिपलेले हे छायाचित्र.**

#### खराब रस्त्यांचे दुबार डांबरीकरण करणे आवश्यक

मान्सूनपूर्व काळात शहरातील रस्त्यांची अवस्था सुधारणे गरजेचे आहे. ज्या रस्त्यांची अवस्था दयनीय बनलेली आहे. अशा रस्त्यांचे दुबार डांबरकीकरण करणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता शहरातील विविध रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य पडलेले आहे. या खड्ड्यांमध्ये पाणीसाठून गंभीर इजा अपघात होऊ शकतो. त्यामुळे अशा रस्त्यांचे प्रशासनाकडून दुरुस्ती किंवा दुबार डांबरीकरण करणे गरजेचे आहे. यामुळे होणारा संभाव्य अपघात टाळता येणार आहे. पर्यायाने निष्पाप बळी जाणार नाही. यासाठी प्रशासनाने शहरातील विविध रस्त्यांचे निरीक्षण करावे. **- योगेश कुंदुर, सामाजिक कार्यकर्ते शहीद अशोक कामटे विचारमंच**

#### महापालिकेने संबंधित ठेकेदारवर कारवाई करावी

शहरातील विविध रस्ते बनवण्याचा मक्ता घेतलेल्या मक्तेदाराने उत्कृष्ट पद्धतीचे रस्ते तयार न केल्यास महापालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदारावर कारवाई करणे गरजेचे आहे. ठेकेदाराकडून वारंवार अशा पद्धतीचे काम केले जात असल्यास, त्याला ब्लॅकलिस्ट काळ्या यादीत टाकावे. जेणेकरून कामाचे भ्रष्टाचार आणि दर्जा रोखण्यासाठी मदत होणार आहे.

**-अक्षय वाघमारे, वाहनधारक**



#### शिवबा ते छत्रपती महानाट्याचा आविष्कार

**सोलापूर : शिवराज्याभिषेक दिनी अस्तित्व मेकर्स फाउंडेशनच्या वतीने शिवबा ते छत्रपती या महानाट्याचा अविष्कार सादर होणार आहे. कलावंतांच्या तयारीचे गुरुवारी टिपलेले छायाचित्र.**



**सोलापूर : जुना एम्प्लॉयमेंट चौकातून फॉरेस्टकडे जाणाऱ्या रस्त्यावर भाजी विक्रेत्यांचे वाढलेले अतिक्रमण.**

## 'फॉरेस्ट'रस्त्यावरील मार्केट हटणार का?

**जुना एम्प्लॉयमेंट चौकातून फॉरेस्टकडे जाणाऱ्या रस्त्यावर भाजी विक्रेत्यांचे वाढते अतिक्रमण; महापालिका प्रशासन उगारणार का कारवाईचा बडगा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून**

महापालिका प्रशासनाने यापूर्वी खड्डे बुजवण्याचे आणि अतिक्रमण हटवण्याचे कार्य केले. परंतु दोन्ही परत उगवले. अशी अवस्था सोलापूर स्मार्ट सिटीत वारंवार दिसून येते. प्रशासनाने ''७० फूट''रोडवर भरणाऱ्या अनधिकृत भाजी मार्केटवर कारवाई नंतर पुढे काय, असा प्रश्न शहरवासीयांमधून उपस्थित होतो आहे. जुना एम्प्लॉयमेंट चौकातून ''फॉरेस्ट''कडे जाणाऱ्या रस्त्यावरील अनाधिकृत भाजी मार्केटवर प्रशासनाचा हातोडा पडणार का ? अतिक्रमण हटणार का? असा सूर उमटत आहे. प्रशासन या अनाधिकृत भाजी मार्केटवर कारवाई करते का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

शहरातील वाढत्या अतिक्रमणावर कोणतीही ठोस उपाययोजना शोधली जात नाही. अनेक अधिकाऱ्यांनी सोलापूरकरांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. परंतु कुठे ना कुठे शिस्त मोडण्याचा प्रकार घडत आहे. आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी शिस्त लावण्याचा स्तुत्स उपक्रम सुरु आहे. परंतु यापूर्वीदेखील असे प्रयत्न झाले ते अयस्वी ठरलेले आहेत. कारण याला महापालिकेतील स्थानिक अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत. शहरात सर्वत्र असलेली अस्वच्छता व दुर्गंधी पुसण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रयत्नांना सोलापूरकरांनीदेखील साथ दिली पाहिजे. शहरातील विविध रस्त्यांवर छोट्या-मोठ्या भाजी विक्रेत्यांनी अतिक्रमण केलेले आहे. वर्षानुवर्षे त्याच रस्त्यांवर व्यवसाय करण्याची सवय विक्रेत्यांना असून किंबहुना ग्राहकांनी विक्रेत्यांना लावलेली आहे. त्यामुळे रस्त्यांवरच मार्केट भरते. वास्तविक पाहता शहरातील प्रत्येक भागात सार्वजनिक भाजी मार्केटसाठी जागा उपलब्ध केलेली आहे. कित्येक अधिकारी आले आणि गेले, मात्र रस्त्यावरील व्यवसाय काही केल्या हाटला नाही हे कटूसत्य आहे.

दोन दिवसांपूर्वी ७० फूट रोडवरील मार्केटवर कारवाई करण्यात आली. विक्रेत्यांचे साहित्य, भाजीपाला जप्त करण्यात आला. काही काळ पोलीस बंदोबस्त व अतिक्रमण विभागाचे अधिकारी कर्मचारी तैनात झाले. मात्र संध्याकाळी पोलीस कर्मचारी गेल्यानंतर काही विक्रेत्यांनी रस्त्यावर भाजी विक्रीचा प्रयत्न केला. ७० फूट भाजी मार्केट नंतर आता पुढे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण शहरातील विविध रस्त्यांवर भाजी व फळ विक्रेत्यांची अनधिकृत मार्केट भरतात. विजापूर रोडतर या अतिक्रमणांमुळे अपघाताला निमंत्रण देणारा झाला आहे. येथे देखील प्रशासनाने कारवाई करणे गरजेचे आहे. जुना एम्प्लायमेंट चौकातून फॉरेस्टकडे जाणाऱ्या रस्त्यावर भाजीविक्रेत्यांचे अतिक्रमण आहे. त्यामुळे हा मार्ग एकेरी रस्ता वाहतुकीसाठी बंदच असतो. दुसऱ्या लेनमधून दोन्ही बाजूंचे वाहनधारक वाहन घेऊन जातात. अशा परिस्थितीत अपघाताचा दुर्दैवी प्रसंग ओढवू शकतो. त्यामुळे ''७० फूट'' नंतर ''फॉरेस्ट'' रस्त्यावरील भाजी मार्केटचे अतिक्रमण हटणार का? असा प्रश्न नागरिकांना पडत आहे.

## मुलासाठी विवाहितेचा छळ करून बेकायदेशीर तलाक

**पती आणि मौलानासह सहाजणांवर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**

मुलबाळ पाहिजे म्हणून विवाहितेचा छळ करून तिचा नोटरी पध्दतीने बेकायदेशीर तलाक करणाऱ्या पती, मौलानासह सहाजणांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शबनम सैफअली पठाण (वय २२, रा. भैरू वस्ती, वांगी रोड, लिमयेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती सैफअली, सासू आफरीन, सासरे म. रफिक, दीर सुफियान (सर्व रा. थोरली इरण्णा वस्ती, वांगी रोड, सोलापूर), मौलाना महंमद रमजनान फलाही, गरीब नवाज जमादार (दोघे रा. हबू हनिमा मस्जिद, नं. २ झोपडपट्टी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शबनम व सैफअली यांचा विवाह जून २०२१ मध्ये झाला आहे. लग्नानंतर शबनम या सासरी नांदत होत्या. १८ जून २०२१ ते १६ मार्च २०२५ या कालावधीत पती व त्याच्या घरातील लोकांनी शबनम यांचा वेळोवेळी लवकर मुल बाळ पाहिजे या कारणावरून तिच्याशी भांडण करून शिवीगाळ करून मानसिक व शारीरीक त्रास दिला.

तसेच १६ जानेवारी २०२४ रोजी सासरकडील मंडळी व मौलाना फलाही व जमादार यांनी मिळून शबनम व सैफअली यांचा नोटरी पध्दतीने बेकायदेशीरपणे तलाक केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार चंगरपल्लू पुढील तपास करीत आहेत.

# सोलापूर बसस्थानक समस्याग्रस्त; प्रवासी हैराण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या वतीने प्रवाशांना मूलभूत सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात अपयशी ठरत आहेत. ऐन पावसाळ्यात प्रवाशांना एसटीच्या वाहनतळावर तसेच खचलेल्या मार्गावर साचलेल्या पावसाच्या व सांडपाण्यातून डबक्यातून वाट काढावी लागत आहे. अवकाळी पावसाने त्यानंतर मान्सूनने सर्वत्र पाणीच पाणी केलेले आहे. अशा परिस्थितीत प्रवाशांना एसटी स्टँड परिसरात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, एसटी स्टँडकडे जाणाऱ्या सम्राट चौक या रस्त्यावर भले मोठे खड्डे पडले असून, या खड्ड्यांकडे एसटीच्या अधिकाऱ्यांचे व महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. या खचलेल्या रस्त्यावरून सातत्याने बसेसची ये जा असते. अशातच काही प्रवासी या रस्त्यावरून पायी जातात. या पायी जाणाऱ्या अबालवृद्ध प्रवाशांना व महिलांना खाचखळग्यांचा व भल्या मोठ्या खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे. जेव्हा मोठ मोठ्या खड्ड्यातून एसटी बसेस जातात, तेव्हा त्या बसेस पूर्णतः एका बाजूला कलंडल्या जातात. त्याचवेळी विरुद्ध दिशेने दुसरी एसटी स्टँडकडे प्रवेश करत असते. जेव्हा या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या बसेसचा समोरासमोर येतात. अशा अवस्थेत अपघाताचा धोका संभवतो. मात्र याकडे एसटी महामंडळाचे तसेच पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

प्रशासनाची ''हाताची घडी तोंडावर बोट'' या भूमिकेमुळे प्रवाशांना नाहक त्रास व मनस्ताप सहन करावा लागतो. वास्तविक पाहता पावसाळ्यापूर्वी या समस्यांचा निपटारा करणे गरजेचे असताना, तसे होताना दिसत नाही. वर्षानुवर्षे व वारंवार या समस्या डोकेवर काढतात. एसटीचा प्रवास हा सुरक्षित प्रवास मानला जातो. त्यामुळेच हा प्रवास सुरक्षित म्हणून प्रवासी एसटीकडे प्राधान्य क्रमाने पाहतात. त्यानुसार एसटी महामंडळाने देखील प्रवाशांची सुविधा प्रथम म्हणून त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचे कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे. परंतु येथे हेतू पुरस्कार कर्तव्याला तिलांजली दिली जाते का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. रस्त्याची उडालेली दैना व स्टॅन्ड परिसराची अवस्था सर्वांना परिचित आहे. तरी देखील यावर उपाययोजनात्मक कार्यवाही केली जात नाही. ही शोकांतिका म्हणावी लागेल.





**सोलापूर : बस स्थानक परिसराकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून त्यातून वाट काढताना महिला प्रवासी.. तर दुसऱ्या छायाचित्रात वाहनतळावर दुर्गंधी अन् अस्वच्छ पाण्याच्या साचलेले तळे.**

#### पावसाळ्यात बसस्थानक परिसराची बिकट अवस्था

पावसाळ्यात बस स्थानक परिसराची अवस्था न पाण्याजोगी असते. सर्वत्र अस्वच्छता, दुर्गंधी, पसरलेली असते. एसटी बसेसमध्ये देखील थुंकण्याचे प्रमाण कायम असते. पावसाचे तसेच सांडपाण्याचे तळे साचलेले असतात. खड्ड्यातून चिखलातून मार्ग काढावा लागतो. याकडे महामंडळाने व शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. अत्याधुनिक बसस्थानक प्रवाशांसाठी उपलब्ध करावे. हीच अपेक्षा.

**- संजय गायकवाड, प्रवासी**

#### ● प्रवाशांना काढावी लागते खड्ड्यातून आणि पाण्यातून वाट

#### ● एसटी महामंडळाने प्रवाशांना सुविधा देण्याची गरज

एकीकडे मान्सूनपूर्वकामे करण्यात महापालिका प्रशासन कमी पडताना दिसत आहे. तर दुसरीकडे एसटी महामंडळ देखील प्रवाशांना मूलभूत सोई सुविधा पुरवण्यात असमर्थ ठरत असल्याचे दिसत आहे. अस्वच्छता, पिण्याचे पाणी, दुर्गंधी, लघुशंका, भंगार झालेल्या एसटी, रस्त्यांची दयनीय अवस्था अशा एक ना अनेक समस्यांचा ऊत आला असताना देखील, याकडे सोईस्कररित्या डोळेझाक केली जात आहे. या सर्व समस्यांचा तात्काळ निपटारा करून प्रवाशांना अव्वल दर्जाच्या सुविधा द्याव्यात हाच सूर आता प्रवाशांमधून उमटत आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## डोळ्यावर प्रखर प्रकाश पडल्याने अपघात होऊन दोघे जखमी

### पाटकूल, पेनूर येथील दुचाकीस्वार; पंतनगरजवळ घडला अपघात

**सोलापूर दि. ५ जून-**

पंढरपूर ते कराड रोडवरील पंतनगरजवळ समोरील वाहनाचा प्रखर प्रकाश डोळ्यावर पडल्याने दुचाकी दुभाजकाला धडकली.

या अपघातात मोहोळ तालुक्यातील पाटकून व पेनूर येथील दोघे जखमी झाले. हा अपघात गुरुवारी रात्री ११ च्या सुमारास घडला असून यातील एकाची शुध्द हरपली आहे. हनुमंत यशवंत सातपुते (वय ३५,रा. पाटकूल ता. मोहोळ) व बाळासाहेब हनुमंत भोसले (रा. पेूनर ता. मोहोळ) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. यातील हनुमंत सातपुते यांची शुध्द हरपली आहे.

गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास हनुमंत आणि बाळासाहेब असे दोघे दुचाकीवरून जात होते. पंढरपूर कराड रस्त्यावरील पंत नगरजवळ आले असता, समोरून आलेल्या वाहनाच्या दिव्याचा प्रखर प्रकाश त्यांच्या डोळ्यावर पडला. यामुळे काहीवेळ समोरील काहीच दिसले नसल्याने दुचाकी रस्त्याच्या दुभाजकाला धडकली. या अपघातात खाली पडल्याने दोघांच्या सर्वांगास मुकामार लागल्याने पंढरपूर येथील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार गुरुवारी पहाटे पाच वाजता भाऊ संभाजी याने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेव्हा हनुमंत यांची शुध्द हरपली असल्याचे तर बाळासाहेब हा शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महत्वाचे...

### आसार मैदान इदगाह येथे शनिवारी सामूहिक नमाज

**सोलापूर, दि. ५ जून-**

आसार मैदान इदगाह येथे बकरी ईद (ईदुल अजहा) निमित्त बकरी ईदचा सामूहिक नमाज शनिवारी ७ जून रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. सर्व मुस्लीम बांधवानी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आसार शरीफचे चीफ ट्रस्टी काझी व खतीब शकील शब्बीर मौलवी यांनी केले आहे.

### सूर्योदय फाउंडेशनचे रक्तदान शिबिर १० जूनला

**सोलापूर, दि. ५ जून-**

महाराष्ट्र व कर्नाटक राज्यासह एकूण ४३ शाखा असणाऱ्या एलकेपी मल्टीस्टेट चे संस्थापक चेअरमन तसेच सूर्योदय उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष अनिल भाऊ इंगोले यांच्या ४६व्या वाढदिवसानिमित्त सूर्योदय फाउंडेशन व एलकेपी मल्टीस्टेट सोलापूर क्लस्टर विभाग यांच्या वतीने रेओनिल ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर १० जून रोजी सकाळी दहा ते दुपारी चार यावेळी आयोजित केले आहे. हे रक्तदान शिबिर हे एलकेपी मल्टीस्टेट रीजनल ऑफिस कुबेर चेंबर इंचगिरी मठासमोर युवराज हॉस्पिटल शेजारी येथे आहे. तरी नागरिकांनी या रक्तदान शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सूर्योदय फाउंडेशनचे सदस्य संजीव चव्हाण यांनी केले आहे.

### मंडपाचे काम करणारा मजूर डोक्यावर पडल्याने जखमी

**सोलापूर, दि. ५ जून -**

मंडपाचे काम करताना अचानक तोल जाऊन डोक्यावर पडून मजूर जखमी झाला. हा अपघात गुरुवारी दुपारी १२.३० वाजता मोदी पोलीस चौकीच्या बाजूला घडला. संतोष विठ्ठल शिंदे (वय ४०, रा. न्यू बुधवार पेठ, डॉ. आंबेडकर नगर) असे जखमी झालेल्या मजुराचे नाव आहे. गुरुवारी संतोष हा मंडप उभारणीचे काम करत होता. तो अचानक तोल जाऊन डोक्यावर पडला. त्यामध्ये त्याच्या डोक्याला जखम झाली. दुपारी ३.१५ च्या सुमारास तो स्वत: उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पत्नीला, मुलाला भेटण्यासाठी गेल्यानंतर मारहाण

**सोलापूर, दि. ५ जून -**

पत्नी आणि मुलाला भेटण्यासाठी गेल्यानंतर लाकूड तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. ही घटना गुरुवारी मध्यरात्री १२.१५ वाजता रंगभवन चर्चच्या पाठीमागे असलेल्या घरी घडला.सुदर्शन हिरालाल धुप्पा (वय २८, रा. सतनाम चौक) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सुदर्शन याची पत्नी मेव्हणा फ्रान्सीस वाडे याच्या घरात राहत आहे. गुरुवारी रात्रीच्या सुमारास तो पत्नी, मुलाला भेटण्यासाठी म्हणून तेथे गेला होता. त्यावेळी फ्रान्सीस व तिम्मनी वाडे यांनी लाकूड तसेच लाथाबुकयांनी मारहाण केल्याने चेह-याला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने भाऊ रोहितने रात्री रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.






**सोलापूर : राज्याचे मत्स्य व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी सोलापुरातील पंजाब तालीम परिसरात झालेल्या एका घटनेतील पिडीत हिंदू कुटुंबियांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी हिरेहब्बू वाडा येथे पत्रकारांशी संवाद साधला.**

## हिरव्या सापांची वळवळ पाकिस्तानात चालेल, हिंदुस्थानात नाही!

- मंत्री नितेश राणे यांचा खणखणीत इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०५ जून-**

राज्यातील तमाम हिंदू बांधवांनी आम्हाला सत्तेत बसवले आहे. त्यांच्यावर झालेला अन्याय कदापि सहन केला जाणार नाही. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस रूपाने कडवट हिंदुत्ववादी विराजमान असल्याने हिंदुंनी चिंता करण्याचे कारण नाही. हिरव्या सापांची वळवळ पाकिस्तानात चालेल मात्र हिंदुस्थानात चालू देणार नाही, असा खणखणीत इशारा राज्याचे मत्स्य व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना सोलापुरात दिला.

सोलापुरात काही दिवसांपूर्वी पंजाब तालीम परिसरात झालेल्या एका घटनेतील पिडीत हिंदू कुटुंबियांची त्यांनी भेट घेतल्यानंतर ते हिरेहब्बू वाडा येथे पत्रकारांशी बोलत होते. तत्पूर्वी त्यांनी बाळीवेस येथील अय्या गणपतीची तसेच श्री मल्लिकार्जुन मंदिरात महाआरती केली. पत्रकारांशी बोलताना मंत्री राणे पुढे म्हणाले की, सोलापुरात जिहादी मानसिकतेच्या लोकांकडून व्यवसाय व अन्य कारणांच्या निमित्ताने हिंदू बांधवांना त्रास देण्यात आला. यासंदर्भात पीडित कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना सरकार तुमच्या पाठीशी आहे, हा विश्वास देण्यासाठी मी सोलापूरला आलो आहे. हिंदूंच्या रंगपंचमी, दिवाळी सणावेळी पर्यावरणवादी अनेक सूचना, सल्ले देतात. पर्यावरणपूरक रंगपंचमी, दिवाळी साजरी करावी असे आवाहन केले जाते. असे आवाहन किंवा नियम हिंदू बांधव समजूतदारपणाने घेतात. ते थयथयाट न करता सण साजरे करतात. याच पद्धतीने मुस्लिम समाजानेदेखील पर्यावरणपूरक बकरी ईद साजरी करावी, व्हर्च्युअल बकऱ्या कापाव्यात, अशी अपेक्षा आहे. मुस्लिम समाजाचे मौलामौलवी हे बकरी ईद को हम कुर्बानी देंगेही, असे अरेरावीने सांगत आहेत. त्यांची ही भूमिका चुकीची आहे.

अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी काही दिवसांपूर्वी राणे यांना संस्कार शिकावेत, असा सल्ला दिला होता. त्यावर प्यारे खान यांनी मला संस्कार शिकवू नयेत. मी फडणवीसांच्या मंत्रीमंडळात मंत्री आहे. प्यारे खान यांनी मुस्लीम समाजात पुढाकार घेऊन पर्यावरणपूरक बकरी ईद साजरी करण्यासाठी धर्मगुरू व समाजाला सांगावे, या शब्दांमध्ये नितेश राणे यांनी प्यारे खान यांना सुनाविले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, सिद्धेश्वर यात्रेचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू, सुधीर थोबडे, मल्लिनाथ मसरे, शिवानंद पाटील, जगदीश हिरेहब्बू, गिरीश कवडे, मनोज हिरेहब्बू, प्रकाश वाले, प्रतीक थोबडे, पंकज काटकर आदी उपस्थित होते.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या रखडल्या

### प्रशासनाकडून ३१ मेचा मुहूर्त हुकला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**

जून महिन्याची सुरुवात होऊन एक आठवडा उलटत आला तरी अजूनही सरकारी अधिकारी-कर्मचारी, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांना अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. सर्वसाधारणपणे मे महिन्यात या बदल्या होतात. परंतु, यंदा तुरळक पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या वगळता, इतर अधिकाऱ्यांच्या बदल्या अजूनही झालेल्या नाहीत.

मे महिन्याच्या अखेरीस राज्यभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रशासन कामात गुंतले असून, त्या पार्श्वभूमीवर १५ दिवसांची मुदतवाढ देण्याबाबत सरकार निर्णय घेणार असल्याचे कळते. बदलीस पात्र असलेले राज्य सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सर्वसाधारण बदल्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत दर वर्षी केल्या जातात. नियमित बदल्यांबरोबरच विनंती बदल्याही यावेळी केल्या जातात. परंतु, या वर्षी आतापर्यंत सरकारी विभागांतील केवळ १५ ते २० टक्के अधिकारी-कर्मचाऱ्यांच्याच बदल्या झाल्याचे चित्र आहे. बदलीस पात्र कर्मचाऱ्यांचे ३१ मेआधी समुपदेशन करून नियुक्तीपत्रे लवकरात लवकर द्यावीत, अशा सूचना मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आल्या होत्या.

राज्य पोलिस दलात आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या नुकत्यात करण्यात आल्या. तसेच, मुंबईतील अंतर्गत बदलही नुकताच करण्यात आला. मात्र, तरीही राज्य सरकारच्या काही विभागांमध्ये बदल्या अजूनही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

#### पाल्यांच्या शिक्षणावर परिणाम नको...

सरकारी अधिकारी-कर्मचारी यांच्या बदलीनंतर त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये, यासाठीच ३१ मेपूर्वीच त्या व्हाव्यात, असे संकेत आहेत. परंतु, करोनाकाळापासून यात अनियमितता आली आहे. यंदाही विविध पदांच्या संवर्गातील खूप कमी बदल्या आतापर्यंत झाल्या असून त्या लवकरात लवकर झाल्यास अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना स्थिरस्थावर होण्यास अधिक वेळ मिळेल, असे मत कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडले.









## हत्तुरे, पवार की शटगार? कोणाच्या गळ्यात पडणार जिल्हाध्यक्षपदाची माळ

- प्रदेशाध्यक्षांच्या निर्णयाकडे लागले सर्वांचे लक्ष !
- जिल्हातील काँग्रेस ताब्यात ठेवण्यासाठी विराजमान होणार मर्जीतला अध्यक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदासाठी पक्षनिरीक्षक मोहन जोशी यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे तीन नावे सादर केली आहेत. या नावांवर शिक्कामोर्तब होईल का, याकडे लक्ष आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद गेल्या पाच महिन्यांपासून रिक्त आहे. पक्ष निरीक्षक मोहन जोशी नुकतेच जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते.

या दौऱ्यात त्यांनी तालुकाप्रमुखांना १५ दिवसांत जिल्हाध्यक्ष मिळेल, असा शब्द दिला होता. त्यानुसार त्यांनी तीन नावे सादर केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जोशी यांनी विद्यमान उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, राजेश पवार, सातलिंग शटगार या तीन जणांची नावे दिली आहेत.

हे तिघेही सोलापूर लोकसभा मतदारसंघात सक्रिय असतात. परंतु काँग्रेसचे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांना विचारून ही नावे सादर झाली आहेत, की परस्पर सादर झाली, याचा उलगडा झालेला नाही. त्यामुळे यामधील नेमक्या कोणत्या नावावर शिक्कामोर्तब होईल हे मात्र येणारा काळच सांगणार आहे.

दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी मुंबईत राज्यातील रिक्त जिल्हाध्यक्ष आणि शहराध्यक्ष पदांवरील नियुक्तीसाठी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. या बैठकीला काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे उपस्थित होत्या. या बैठकीत प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील रिक्त पदांवर चर्चा झाली. सोलापूरचा विषय आठ दिवसांत निकाली निघण्याची शक्यता आहे.

## महसूलमंत्र्यांच्या शब्दांवर आमचा ‘भरोसा’ नाय!

- शासन निर्णय होईपर्यंत आता माघार नाही
- २२ व्या दिवशीही भूमी अभिलेखचे कामबंद आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

राज्यातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन बेकायदेशीर आहे. त्यांनी त्वरीत कामावर हजर व्हावे अन्यथा कारवाई करू, असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवार, दि. २९ मे रोजी सोलापुरात दिला होता.

यानंतर दि. ४ जून रोजी अमरावती, नागपूर येथील कर्मचाऱ्यांशी महसूलमंत्र्यांनी बैठक घेवून सकारात्मक चर्चाही केली परंतु मागील काही वर्षाचे शासन स्तरावरील अनुभवावरून केवळ आश्वासनेच मिळत असून, आता जोपर्यंत शासन निर्णय पारीत होत नाही; तोवर आमचे आंदोलन चालूच ठेवणार असल्याचा पवित्रा पुणे विभागातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी घेतला असून, आज (दि.५) २२ व्या दिवशीही त्यांनी लेखनीबंद आंदोलन केले. यावरून महसूलमंत्र्यांच्या शब्दावर त्यांचा भरोसा नाही, असे दिसून येते.



#### शासनासह सर्वसामान्यांचेही मोठे नुकसान

महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख, कर्मचारी संघटनांचे विविध जिल्ह्यात २२ दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरु असल्याने शासनाचा कोट्यवधीचा महसूल बुडाला असून, या आंदोलनामुळे शेतकऱ्यांसह इतर नागरिकांचेही मोजणीचे व इतर कामांचे मोठे नुकसान होत आहे. यामुळे मंत्रालय स्तरावरील वरिष्ठ अधिकारी, महसूलमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनावर लवकर तोडगा काढून सर्वसामान्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी होत आहे.

जरी महसूलमंत्र्यांनी आमच्या अमरावती, नागपूर संघटना पदाधिकाऱ्यांबरोबर सकारात्मक चर्चा केली असली तरी तांत्रिक वेतनश्रेणी व अन्य मागण्यांबाबत निर्णय पारीत केले नाहीत. खुल्लर समितीने वेतन त्रुटींमध्ये भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी यांचे तांत्रिक वेतनश्रेणी मागणीला कचऱ्याचा डब्बा दाखविला आहे. आमच्या संघटना प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा झाली असली तरी इतर जिल्ह्यातील संपातील सहभागी कर्मचाऱ्यांच्या भावना तीव्र आहेत. यामुळे सर्वांनी बेमुदत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केल्याची माहिती विदर्भ भूमी अभिलेख कर्मचारी संघटना अध्यक्ष राजू मुरकुटे यांनी एका निवदनाद्वारे दिली आहे. यामुळे राज्यातील विविध जिल्ह्यात भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच आहे. राज्यातील भूमी अभिलेख कर्मचारी १५ मे पासून संपावर आहेत. आमच्या मागण्यांसाठी आम्ही सर्वप्रथम २०१५ मध्ये २४ दिवसांचा संप केला होता. शासनाने आश्वासन दिल्यामुळे संप स्थगित केला. त्यानंतर विविध मागण्यांसाठी आमचा लढा सुरू आहे. सुधारीत वेतनश्रेणीसाठी फेब्रुवारीमध्ये आंदोलन सुरू केले. २७ फेब्रुवारी रोजी विभागीय उपसंचालकांकडे बैठक झाली होती. मार्च महिन्यात दोनवेळा काम बंद आंदोलन केले. सरकारच्या आश्वासनामुळे आम्ही थांबलो.

आता सरकार लक्ष द्यायला तयार नाही म्हटल्यावर आम्ही २६ एप्रिल रोजी संप पुकारणार असल्याचा इशारा दिला होता. त्यानुसार आम्ही १५ मे पासून संपावर आहोत. आमच्या आंदोलनाला राजपत्रित अधिकारी संघटनेने पाठिंबा दिला आहे. आता जोवर शासन निर्णय पारीत होत नाही; तोवर आमचा लेखणीबंद संप सुरूच राहणार असल्याची माहिती सोलापूरच्या कर्मचाऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

## औक्षण करून गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

- सुट्टीनंतर सीबीएससी अभ्यासक्रमाच्या शाळा सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

सोलापूर शहरातील सी.बी. एस.सी. अभ्यासक्रमांच्या शाळांची तासिका आज (दि.५) जून पासून सुरु झाल्या आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर इयत्ता पहिलीपासून ते दहावी वर्गातील विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रमुख प्रवेशद्वारासमोर मोठ्या उत्साही आणि आनंदमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाबपुष्प देण्यात आले. त्यानंतर शाळेच्या वेळेप्रमाणे पहिली घंटा वाजली. उन्हाळच्या सुट्ट्या संपल्यानंतर आज शाळेचा पहिला दिवस होता. गेल्या महिन्याभारापासून सुट्ट्यामुळे शाळा बंद होत्या. त्यानंतर सीबीएससी अभ्यासक्रमाच्या शाळा आता



**सोलापूर : शहरातील संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये सीबीएससी अभ्यासक्रमाच्या शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प उधळून स्वागत करताना टिपलेले छायाचित्र.**

पूर्ववत सुरू झाल्या आहेत. दरम्यान, सोलापूर शहरातील संगमेश्वर पब्लिक स्कूल, इंडियन मॉडेल स्कूल अशा विविध सी.बी. एस.सी अभ्यासक्रम पद्धतीच्या शाळांमध्ये हा प्रवेशोत्सव संपन्न झाला. आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यासाठी संबंधित शाळा समितीच्या वतीने विविध जय्यत तयारी करण्यात आली होती. शाळेत प्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिल्या ते दहावीच्या वयोगटातील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी आनंददायी व प्रसन्नमय वातावरणात प्रवेशोत्सव साजरा झाला.


#### उत्साहाचे वातावरण


नवीन शैक्षणिक वर्षासाठी पालक, विद्यार्थी आणि शिक्षक वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण होते. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर पुन्हा एकदा शाळेत परतण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी पूर्ण झाली. अनेक शाळांनी आधी प्रवेशप्रक्रिया, पुस्तकांचे वाटप आणि नव्या शैक्षणिक वर्षाच्या योजनांचे काम पूर्ण केले आहे.

## ॲड. राजेश कांबळे खून खटल्याची पुढील सुनावणी आता २० जूनला

### उलट तपासात साक्षीदाराने दिली नकारात्मक उत्तरे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**





ॲड. राजेश कांबळे खून खटल्याच्या सुनावणीमध्ये साक्षीदार विश्वनाथ मेरकर व पांडुरंग सगर यांच्या साक्षी जिल्हा व चत्र न्यायाधीश जे जे मोहिते यांच्यासमोर नोंदविण्यात आल्या. या खटल्याची पुढील सुनावणी २० जून रोजी होणार आहे. ॲड. राजेश श्रीमंत कांबळे (वय ४५ रा. ४३, ब्रह्मचैतन्य नगर नवीन आर. टी. ओ. सोलापूर) यांचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, अँड सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे.मोहिते यांच्यासमोर सुरू आहे.

गुरुवारी या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी साक्षीदार विश्वनाथ मल्लिनाथ मेरकर यांनी त्यांच्या साक्षीत यातील आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल हा त्यांच्या हॉस्पिटलमध्ये वॉचमन म्हणून कामास होता. तसेच तो १५ ते १७ जून२०१९ पर्यंत परस्पर गैरहजर होता असे सांगितले. त्याबाबतचा ड्युटी चार्ट पोलिसांना दिला होता, तो त्यांनी ओळखला अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदविली. त्यानंतर दुसरा साक्षीदार पांडुरंग चंद्रकांत सगर यांनी आपल्या साक्षीत दिनांक ८ जून २०१९ रोजीचे सायंकाळी साडे सहा ते आठ च्या दरम्यान अश्विनी हॉस्पिटल येथील मेन गेटवरील सीसीटीव्ही फुटेज डी व्ही आर मधून पेनड्राईव्ह मध्ये पोलिसांना काढून दिले व त्याचा पंचनामा केल्याची महत्त्वपूर्ण साक्ष दिली. त्यानंतर तिसरा साक्षीदार दत्तात्रय मुरलीधर येलपले याची साक्ष अंशता झाली. झालेल्या साक्षीदारांनी आरोपींच्या वकिलांनी घेतलेल्या उलट तपासात साक्षीदाराने नकारात्मक उत्तरे दिली. या खटल्यात विशेष सरकारी वकील अँड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे अँड.मिलिंद थोबडे अँड.विनोद सूर्यवंशी तर आरोपींच्यावतीने अँड राजेंद्र फताटे, अँड नागराज शिंदे, अँड जयदिप माने हे काम पाहत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११३८

**पुज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी ।**
**हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ।।**

ज्ञानी व्यक्तिला अंत:करणात जेव्हा ज्ञान प्राप्त होते, तेव्हा त्या ज्ञानाची लक्षणे देहावर उतरल्याचे दिसून येते. ज्ञानी व्यक्तिच्या सद्वर्तनावरुन व्यक्ती ज्ञानी असल्याचे समजते. ज्ञानी व्यक्तिची लक्षणे भगवंत सांगत आहेत. कोणत्याही आणि कसल्याही लौकिक विषयात त्याला रंगून जाणे आवडत नाही. लोकांमध्ये संभवितपणाचा डौल दाखविणे त्याला संकोचासारखे अर्थात ओझे झाल्यासारखे वाटत असते. ज्ञानी व्यक्तींच्या ठिकाणी असलेल्या सदगुणांची कोणी स्तुतिसुमने उधळली किंवा त्याच्या मोठेपणाचा, बहुमानाचा गाजावाजा झाला किंवा मोठया, चांगल्या योग्यतेची उपाधी त्याच्या अंगाला लावली तर मनात संकोचाने ज्ञानी भक्त ओशाळला जातो. तो अशा मोठेपणाने व्याकुळ होतो. त्याला अशा गाजावाजाचे, मोठेपणाचे प्रचंड दु:ख होते. पारध्याने हरिणाला जाळयात पकडल्यानंतर हरिणाची किंवा आपल्या बाहूसामर्थ्याने नदी तरुन जाताना बोहऱ्यात सापडलेल्या माणसाची जशी स्थिती होते. तशी या ज्ञानी व्यक्तिला लोकमान्यता म्हणजे एक संकटच वाटते. लौकिकतेला तो आपल्या अंगाला स्पर्श करु देत नाही. लौकिकतेबद्दल, बहूमानाबद्दल त्याची भावना काय असते हे सांगताना भगवंत म्हणाले, पुज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी । हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ।। अर्थात, ज्ञानी व्यक्तिला आपला बहूमान आपल्या डोळ्यांनी पाहवत नाही. आपला लौकिक आपल्या कानांनी ऐकू नये, आपण एक विशिष्ट व्यक्ती आहोत अशी लोकांना जाण होऊ नये, असे त्याला वाटत असते.



ज्ञानी व्यक्ति विद्वान असला तरी तो आपली विद्वता दाखवित फिरत नाही. समाजात आपली पूजा व्हावी असे त्याला वाटत नाही. कोणी त्याला वंदन केले तर त्याला मरणासारखे दु:ख होते. स्वत:च्या अंगी नम्रता ठेवणे, कमीपणा हेच भुषण मानणे, अशी त्याची वृत्ती असते. त्याचे चालणे, वागणे कोणालाही हनीकारक नसते. ज्ञानी व्यक्तिला वृक्ष मित्रत्व आवडत असते तसेच त्याला एकांत जास्त आवडतो, असेही भगवंत म्हणाले. ज्ञानी व्यक्तिची अनेक महत्वपूर्ण लक्षणे आपण माऊलीकडून स्पष्टीकरणासह ऐकली आहेत. या लक्षणापैकी आपल्यात काही लक्षणे आहेत? याची चाचपणी आपणच करुन घ्यायला हवी. आमच्यात ही लक्षणे येणे अंत्यत आवश्यक आहे. आज स्वत:चा मोठेपणा, गाजावाजा व्हावा म्हणून धडपडणाऱ्यांची संख्या जास्त आहे. मोठेपणा हा मागावा लागत नाही, तो आपल्या वर्तनातून आपोआप निर्माण होत असतो. पण वर्तनापेक्षा दिखावूपणातूनच मोठेपण मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची संख्या जास्त झाली आहे. या जास्त संख्येत आपला क्रमांक येणार नाही याची दक्षता आपण घ्यायलाच हवी. आपण मोठेपणाच्या मागे न लागता मोठेपणाच आपल्या मागे लागेल असे आपले वर्तन ठेवण्याचा आपण प्रयत्न करु या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ६ जून २०२५ | किल्ले रायगड येथे |
| विक्रम संवत् २०८१ | शिवराज्याभिषेक सोहळा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकादशी (१८.४७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - हस्त (०६.३३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्यतिपात (१०.१२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१५.३०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# सोलापुरात मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू

### शिक्षकांची पुस्तके घेण्यासाठी धावफळ

### शाळेच्या पहिल्या दिवशी मिळणार विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

नवीन शैक्षणिक वर्षांसाठी बालभारती पोर्टलवर सोलापूर शहरातील खाजगी अनुदानित आणि सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या वतीने एकूण ४ लाख ३१ हजार ५९१ पाठ्यपुस्तकांची मागणी करण्यात आली होती. सदरची पुस्तके महापालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर आहेत. मनपा शाळा क्रमांक सहा येथे सदरची पुस्तके उतरवण्यात आली होती. त्यानंतर आता सोमवार २ जून पासून सदरची पुस्तके संबंधित मनपा आणि मनपा अनुदानित खाजगी शाळांच्या शिक्षकांकडे वितरित केली जात आहेत.

बुधवारी ४ जून रोजी ११३ शाळांना वाटप करण्यात आले. १० जूनपर्यंत शाळांना प्राप्त पाठ्यपुस्तक वाटपाचे नियोजन करण्यात आलेले आहे. यंदाच्यावर्षी इयत्ता पहिलीपासून नवीन अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने पहिलीच्या नव्या अभ्यासक्रमानुसार पुस्तकांचा पुरवठा केला आहे. दरम्यान, इयत्ता पहिली पासून ते आठवीपर्यंतची मोफत पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातामध्ये पडणार आहेत. तसे नियोजन बालभारती आणि शासनाच्या वतीने करण्यात आले होते. त्यानुसार जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित शाळेच्या शिक्षकांना ही मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जात आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेचे पहिल्या दिवशीच हे पुस्तके वाटप होतील असे नियोजन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

दरवर्षी प्रशासनाच्या वतीने शहरातील खाजगी अनुदानित तसेच महापालिका व झेडपी अशा सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांची योजना राबवली जाते. सदरच्या योजनेमध्ये मराठी, उर्दू, कन्नड, तेलगू, हिंदी, इंग्रजी अशा एकूण ६ माध्यमांची पाठ्यपुस्तके दर शैक्षणिक वर्षात शासनाकडून मागविली जातात. इयत्ता पहिलीपासून ते इयत्ता आठवी पर्यंतची पुस्तके शासनाकडून प्राप्त होत असतात. पुस्तक मागणीचा अहवाल मे महिन्यामध्येच बालभारतीकडे पाठवण्यात आला होता. त्या अहवालानुसार सदरची पाठ्यपुस्तके प्राप्त झाल्यानंतर, सदरची पुस्तके शाळांच्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांकडे यु-डायस वरील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात येत आहेत. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षात राबवण्यात येत आहे. राज्यातील पहिल्याच्या विद्यार्थ्यांसाठी (सी.बी. एस.सी) केंद्रीय अभ्यासक्रम पद्धती लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार इयत्ता पहिलीचे नवीन अभ्यासक्रमाचे पाठ्यपुस्तक देखील उपलब्ध झाले असून, त्यांचे वितरण देखील करण्यात येत आहे.





सोलापूर : मनपा व खाजगी अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांची वितरण केंद्रातून पाठ्यपुस्तक घेताना टिपलेले छायाचित्र.

**पाठ्यपुस्तक वाटप शाळांची संख्या तपशील**

| | |
|---|---|
| हिंदी | ०२ |
| इंग्रजी | ०२ |
| कन्नड | १४ |
| तेलुगू | ०३ |
| मराठी मनपा शाळा | ३५ |
| खाजगी अनुदानीत मराठी | ५६ |

**पाठ्यपुस्तक अहवाल**

| | |
|---|---|
| प्राप्त पाठ्यपुस्तक संख्या | ४,२९,९७५ |
| अप्राप्त पाठ्यपुस्तक संख्या | १,६१६ |
| टक्केवारी | ९९.६३ |

**मनपा व खाजगी अनुदानित शाळांच्या मुख्याध्यापकांकडे पाठ्यपुस्तकांचे वितरण**

सोलापूर शहरातील मनपा अखत्यारीत येणाऱ्या खाजगी अनुदानित व सरकारी शाळेतील मराठी, उर्दू, हिंदी, कन्नड, तेलुगू माध्यमांच्या एकूण ७२,६७० इतक्या विद्यार्थ्यांसाठी ४,२९,९७५ पुस्तकांच्याप्रती प्राप्त झालेल्या आहेत. उर्वरित १,६१६ येत्या दोन दिवसांत प्राप्त होणार आहेत. सदरची पाठ्यपुस्तके संबंधित शाळेच्या शिक्षकांना वितरित केली जात आहेत. शाळेचे शिक्षक पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांना हे पुस्तके वाटप करतील. राज्यात नवीन अभ्यासक्रमानुसार इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलण्यात आल्याने, पहिलीची पाठ्यपुस्तके प्राप्त झालेली आहे.

**- रियाज आत्तार, समन्वयक बालभारती**



# अंकुर प्रकल्पातील मुला-मुलींचा नववर्षारंभ मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

भटके विमुक्त जमातीतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया पक्का करण्यासाठी गतवर्षी तीन ठिकाणी विनाशुल्क वर्ग झाले. वर्गखोल्या भाड्याने घेतल्या होत्या. दररोज एक तास वर्ग चालत होता. तीन शिक्षक तिन्ही ठिकाणी वर्ग चालवत होते. येत्या वर्षी देखील ते वर्ग सुरू ठेवत आहोत.

४ जून २०२५ रोजी स. १० ते दु. १ दरम्यान या मुलांसाठी ज्ञान प्रबोधिनी सोलापूरच्या उपासना मंदिरात वर्षारंभ मेळावा संपन्न झाला. तीन ठिकाणचे २८ मुली व २५ मुले असे दोन्ही मिळून ५३ विद्यार्थी उपस्थित होते. उपासना, योग, प्राणायाम, व्यायाम, फळांचे शब्दकोडे, चांगल्या-वाईट सवयी व गीतेतील श्लोक अशी सत्रे झाली. सौ. नीताताई भैरप्पा यांनी विविध छोटे खेळ घेतले. सहकार्यवाह डॉ. अमोल दादांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. दि. १६ जून २०२५ पासून या तिन्ही वर्गांना प्रारंभ होईल. या सर्व मुलांना हे शिक्षण नि:शुल्क आहे. तसेच त्यांना आपण सकस आहार पुरवतो. हा प्रकल्प देणग्यांच्या आधारावर चालतो, अशी माहिती अंकुर प्रकल्प संयोजक संतोष साबणे यांनी दिली.

**वर्ग ठिकाण व तपशील याप्रमाणे**

१. तळे हिप्परगा - पारधी, गोसावी, मातंगी समाजातील विद्यार्थी, मार्गदर्शिका - माधुरी ताई काळे

२. माशाळ वस्ती - बहुरूपी व लमाण समाजातील विद्यार्थी, मार्गदर्शिका - माधवी ताई इंगळे

३. सोरेगाव - नंदी व बहुरूपी समाजातील विद्यार्थी, मार्गदर्शिका - अंजलीताई सूर्यवंशी

## दुचाकी घसरून दोन अघपात; दोघेही जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

शहरात दोन ठिकाणी दुचाकी घसरून झालेल्या अपघातात दोघे जखमी झाले. यातील दोन्ही अपघात बुधवारी रात्री अकरा व ११.३० च्या सुमारास घडले आहेत. सय्यद राज अहमद (वय ४५, रा. न्यू पाच्छा पेठ) व सोनू शेरअली नदाफ (वय २१, रा. होटगी ता. द. सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत.

यातील पहिला अपघात वालचंद कॉलेज रस्त्यावर घडला. यात सय्यद अहमद हे राहते घरातून वालचंद कॉलेजकडे जाताना दुचाकी घसरली. यात डोक्याला जखम झाल्याने गुरुवारी मध्यरात्री एकच्या सुमारास भाऊ शकिल यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. दुसरा अपघात हैद्राबाद रोडवरील बागवान नगर येथे घउला. होटगी येथून दुचाकी चालवित सोनू हा सोलापुरातील हैद्राबाद रस्त्यावरील बागवान नगरातील नातेवाईकांच्या घरी जात होता. बागवान नगरजवळ त्याची दुचाकी घसरल्याने डाव्या हाताला मुकामार लागल्याने फारून नदाफ याने गुरुवारी मध्यरात्री २.१० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# भाजपा कार्यालयात उत्साहात वृक्षारोपण

**सोलापूर, दि. ५ जून-**

मोदी सरकारच्या ११व्या वर्ष पूर्ती निमित्त संकल्प से सिद्धी तक अभियानअंतर्गत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपा कार्यालया समोर वृक्षारोपण करून कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

यावेळी शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, प्रा. नारायण बनसोडे, माजी अध्यक्ष रामचंद्र जन्नू, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी महापौर श्रीकाचना यन्नम, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, अक्षय अंजिखाने, नागेश खरात, अर्जुन जाधव, श्रीनिवास दायमा, बजरंग कुलकर्णी, संगीता जाधव, महिला अध्यक्षा विजया वड्डेपल्ली, रामेश्वरी बिरू, रंजिता चाकोते, चिटणीस संपदा जोशी, लक्ष्मण गायकवाड, नागेश गंजी, यशवंत पाथरुट, दिलीप पतंगे, आनंद बिरू, नागनाथ शिवसिंगवाले, अविनाश बेजरपे, श्रीशैल हिरेमठ, दत्ता सुर्यवंशी, शेखर फंड, राहुल काटकर, संदीप कुलकर्णी, मनोज कलशेट्टी, सुनिल टोणपे आदी उपस्थित होते.

# ‘व्हिक्टरी परेड’ साठी गेलेल्या फॅन्सना कोणी दोष देऊ नये

*काल बेंगळुरू येथे झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. आरसीबीच्या 'व्हिक्टरी परेड' साठी गेलेल्या फॅन्सना कोणी यासाठी दोष देऊ नये. ती लोकं तिकडे गेलीच कशाला होती, ही आर्ग्युमेंटच चूक आहे! मी तरी त्यांना दोष देणार नाही. केवळ दोन दिवस आधी दीड लाख लोकं नरेन्द्र मोदी स्टेडियमला मॅच बघायला एकत्र आले होते आणि सगळे आपापल्या घरी सुखरूप पोहोचले. काही दिवसांपूर्वी ऑपरेशन सिंदूरच्या वेळी हिमाचल प्रदेश मधील धरमशाळा येथे मॅच सुरू असताना ब्लॅक-आउट करून २५-३० मिनिटात ४० हजार लोकांना अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने बाहेर काढण्यात आले होते.*

स्टेडियमच्या बाहेरची ट्राफिक-मॅनेजमेंट व गर्दीचे व्यवस्थापन पण टॉप-क्लास होते. कोणताही अनुचित प्रकार तिकडे घडला नाही. प्रत्येक शाही स्नानाच्या दिवशी ४-५ कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केले होते व एकूण ६५ कोटी लोकांनी दीड महिन्यात गंगास्नान केले, त्यातील केवळ एक घटना वगळता प्रयगराज, अयोध्या, चित्रकूट व काशी येथील क्राउड-मॅनेजमेन्ट आणि ट्राफिक-मॅनेजमेन्ट १० पैकी १० म्हणता येईल एवढे परफेक्ट होते!म्हणूनच, कर्नाटकातील कालची दुर्दैवी घटना फक्त अपघात म्हणता येणार नाही. कालच्या घटनेत मेलेली प्रत्येक व्यक्ती ही सरकारच्या असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. गर्दी होणार असल्याचे अंदाज असूनही, सरकारने योग्य ती पावले उचलली नाहीत, आणि परिणामतः निष्पाप जीवांचा बळी गेलाय. किती लोकं दगावली आहेत, यावरही गोंधळ आहेच.प्रत्येक मोठ्या कार्यक्रमासाठी गर्दीचे व्यवस्थापन हा एक महत्त्वाचा घटक असतो. तरीसुद्धा, प्रशासनाने तिकडे दुर्लक्ष केले. सुरक्षेची उपाययोजना अपुरी होती. आपत्कालीन मदतीसाठी कोणताही प्लॅन नव्हता. अश्या वेळी घटनास्थळी पोहोचण्यासाठी आवश्यक असलेल्या मार्गांची योजनाच नव्हती. रुग्णवाहिकाही पोहचू शकत नव्हत्या. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या दुर्घटनेनंतरही नेत्यांचा व्यवहार! एका बाजूला लोकं मरत होते, तर दुसऱ्या बाजूला नेत्यांचा सत्कार आणि सेल्फी-सोहळ्याचा तमाशा सुरूच होता.याच वर्षी २०२५ मध्ये ८ जानेवारी रोजी तिरुपती मंदिरात, १५ जानेवारी रोजी दिल्ली रेल्वे स्टेशनवर, २९ जानेवारी रोजी महाकुंभ मेळ्यात, ३ मे रोजी गोव्यात चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या होत्या. या सर्व राज्यातील पोलिस प्रशासन भाजप/एनडीए कडे होते. त्यामुळे या सर्व घटनांना इंटेल फेल्युअर, पोलिसांची अनप्रोफेशनलगिरी, प्रशासनाचा भोंगळ कारभार, त्या-त्या गृहमंत्रालयांचे अपयश, सरकारची असंवेदनशीलता जबाबदार होती!! त्या वेळी 'याने राजीनामा द्यावा, त्याने राजीनामा द्यावा' म्हणत 'ट्रॅजेडी-टुरिजम' करणारे मीडियावाले, इंडीआघाडीतील राजकीय पक्ष आणि सोमी प्लेटफॉर्म्सवर उघड्यावर शौच करणारे विचारजंत व गुलाम आठवतात? ही सगळी मंडळी कालपासून मात्र त्यांचे स्वतःचेच निकष सोयीनुसार विसरून, कर्नाटक सरकार, कर्नाटक पोलिस यांना जाब विचारायचं सोडून बीसीसीआय, आयपीएल, आरसीबी, विराट कोहली, अनुष्का शर्मा, आरसीबी फॅन्स आणि जनतेला दोष देत आहेत. 'चेंगराचेंगरी' हा केवळ अपघातच असेल असं नाही. कोणत्याही हत्याराची किंवा एखादा हल्ला प्रत्यक्ष न करताही अनेक निष्पाप लोकांचा एकाच वेळी बळी घेता येऊ शकेल असा हा कधीही स्फोट होईल असा टाईम-बॉम्बच आहे. भारतात अनेक इव्हेन्ट, जत्रा, सोहळे, उत्सव, रॅली, मॅचेस, कार्यक्रम होत असतात ज्यात हजारोंच्या संख्येने लोकं एकत्र येत असतात. घात, अपघात की 'अपघातपात' हे काही लोकं मेल्यावर समजले तरी काय उपयोग? म्हणून, त्याआधीच : मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांसाठी गर्दी व्यवस्थापनाचे स्पष्ट नियम असले पाहिजेत. या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक व कायद्याने बंधनकारक असावे. सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये काही आपत्ती आल्यास प्रत्येक गोष्टीची जबाबदारी कोणाकोणाची असेल, हे आधीच फिक्स झाले पाहिजे. त्यातून अजिबात पळवाट असता कामा नये. प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमाच्या ठिकाणी आपत्कालीन मदतीची सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक असावे. भले त्यासाठी येणारा संपूर्ण खर्च ऑर्गनाईझर कडूनच वसुली करावा. अशा घटनांमध्ये निष्काळजीपणा करणाऱ्या व प्रशासकीय अथवा आपात्कालीन कामांमध्ये अडथळा आणाऱ्यांवर केलेल्या कोणत्याही कठोर कारवाईला कायद्याने संरक्षण असावे.




**आणि सगळ्यात महत्त्वाचं :**

आपत्तीच्या वेळी काय करावे, (किंबहुना काय करू नये), याबद्दल जनतेत सातत्याने जागरूकता निर्माण करत राहणे गरजेचे आहे. स्वखुशीने गर्दीचा भाग बनणाऱ्या लोकांसाठी (उदा. आरसीबी फॅन्स) आणि मजबुरीत गर्दीचा भाग बनणाऱ्या लोकांसाठी (उदा. रोज संध्याकाळी दादर रेल्वे स्टेशन) आपत्तीच्या वेळी लक्षात ठेवायचे ॲक्शन्स माहीत असतील, तर अनेक जीव वाचवू शकतात.मुंबईतील मरिन-ड्राईव्ह येथील वर्ल्ड-चॅम्पियन भारतीय टीमच्या व्हिक्टरी-परेड मध्ये लाखो लोकं उपस्थित होते. अश्यावेळी अनेकांना गर्दीचा त्रास होऊ शकतो याची कल्पना असल्याने मुंबई पोलिसांनी तशी आपात्कालीन व्यवस्था चोखपणे राबविली होती. त्यादिवशी एकूण ११ क्रिकेट-फॅन्स ना त्रास जाणवला होता. एवढ्या गर्दीतून पण त्यातील ९ लोकांना रुग्णवाहिका आणून वेळीच जिटी रुग्णालयात, एक चाहत्याला सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये तर एकाला जवळच्या प्रायव्हेट दवाखान्यात नेऊन, प्रथमोपचार करून बरं वाटल्यावर त्याच दिवशी डिस्चार्ज देण्यात आला होता. मुंबई पोलिसांनी व्हीक्टरी-परेड आणि चाहत्यांच्या आनंदाला कोणतेही गालबोट लागू दिले नव्हते. मॉरल ऑफ दि स्टोरी : लोकांच्या जीवाला किंमत देणारी आणि जबाबदारीची जाणीव असलेली यंत्रणा हवी असेल तर त्याची पहिली पायरी आहे मतदानाच्या दिवशी ईव्हीएमवर योग्य बटनाची निवड करणे!

**- वेद कुमार**

महत्वाचे...



## बार्शी तालुक्यातील नुकसानीचे सरसकट पंचनामे करा

**कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे आदेश**

**बार्शी, दि.५ जून-**
राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश (अजित पवार गट) सचिव शिरीष ताटे यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची भेट घेऊन बार्शी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकाचे नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी, याबाबतचे निवेदन देण्यात आले. यावेळी कृषिमंत्री कोकाटे यांनी बार्शी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकाच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश कृषी सचिवांना दिले.

## करकंब येथे नवदापत्यांच्या शुभहस्ते लेकीच्या झाडाचे रोपण

**नववधूची झाडाच्या रुपाने राहणार कायम आठवण**



**करकंब, दि.५ जून-**
करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्यावतीने वृक्षारोपण मोहिम सुरू असताना चालू वर्षी २५० झाडांचा टप्पा पूर्ण करत गेल्या तीन वर्षात १००० झाडांचं संवर्धन सुरू आहे. याच माध्यमातून बुधवारी पर्यावरणदिनाच्या पूर्वसंध्येला नवदाम्पत्य चि.रोहन मेणकुदळे आणि सौ.वैष्णवी शेटे यांच्या विवाहाचे औचित्य साधून करकंब गावची लेक वैष्णवीच्या नावाने वटवृक्षाचे झाड लावून कायम स्वरुपी तिची आठवण राहावी या उद्देशाने वृक्षारोपण करण्यात आले. यानिमित्ताने का होईना पर्यावरण रक्षणासाठीचा उद्देश सफल होत असताना दिसत आहे. पुढील काळात प्रत्येक नवदाम्पत्यांनी सहभागी होण्याचे आवाहन लेकीच झाड टीमच्यावतीने करण्यात येत आहे. यावेळी संतोष शेटे, कविता शेटे, सुनील शेटे, शारदा शेटे, राजेश मेणकुदळे, सविता मेणकुदळे व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे अभियान यशस्वी करण्यासाठी करकंब गावच्या लेकीचं अभियान टीमचे संकल्पक ज्ञानेश्वर दुधाणे, विशाल बोधे, देविदास काटवटे, विश्वजीत शिंदे, नागेश खारे, चेतन पुरवत यावेळी उपस्थित होते.



## बार्शी वन विभागाच्यावतीने पांगरी पोलीस स्टेशनच्या प्रांगणात वृक्षारोपण

**बार्शी, दि.५ जून-**
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पांगरी पोलीस स्टेशनच्या प्रांगणात सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत काटकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना विविध रोपे भेट देण्यात आली. यावेळी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व, प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा असे आवाहन करण्यात आले.

यावेळी बार्शी वन विभागाचे वन परिमंडळ अधिकारी धनंजय शिदोडकर तसेच श्रीमती ए.आर. पीरजादे व वनरक्षक बालाजी धुमाळ व इतर वन कर्मचारी उपस्थित होते.



## भाजपा सोलापूर शहर अध्यक्षा रोहिणी तळवळकर यांचा बार्शीत सत्कार

**बार्शी, दि.५ जून-**
भारतीय जनता पक्षाच्या सोलापूर शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रोहिणी तळवळकर यांचा बार्शीतील इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या श्रीमान रामभाई शहा रक्तपेढीच्यावतीने डॉ. आण्णा कश्यपी सभागृहात सत्कार करण्यात आला.

यावेळी रक्तपेढीचे सचिव दिलीप कराड, अशोक डहाळे, बार्शी भाजपाचे शहराध्यक्ष महावीर कदम, उद्योजक अतुल सोनीग्रा, माजी अध्यक्षा पद्मजा काळे, प्रमोद काळे, माजी शहराध्यक्ष अश्विन गाढवे, बबन चकोर, सतीश आरगडे, पत्रकार संतोष सूर्यवंशी, गणेश भोळे, चंद्रकांत करडे, अरुण बळप, शाम थोरात, पंचायतराज व ग्रामविकास विभाग प्रमुख हेमंत रातंजनकर, रवींद्र माचवे, नितीन कवठेकर, ॲड. दिलीप महिंद्रकर, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश शिंदे, शहर उपाध्यक्ष विवेक कुलकर्णी, दिलीप माचवे, प्रदीप माचवे, रजनी माचवे, रक्तपेढीचे व्यवस्थापक प्रशांत बुडूख व सेवक, इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी हा सत्कार माझ्या घरचा आहे. मला हा सत्कार स्वीकारताना मनस्वी आनंद होत असल्याचे म्हणत त्यांनी बार्शीतील आठवणींना उजाळा दिला. यावेळी संतोष सूर्यवंशी, सतीश आरगडे, हेमंत रातंजनकर व महावीर कदम यांची समयोचित भाषणे झाली. पद्मजा व प्रमोद काळे, माचवे परिवार, महावीर कदम व तरुण भारत बार्शी कार्यालयाच्यावतीने रोहिणी तडवळकर यांचा सत्कार करण्यात आला.

# माळशिरस तालुक्यात २ लाख ८० हजार ३७६ पुस्तकांचे पहिल्याच दिवशी होणार वाटप

**गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.५ जून-**
समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व व्यवस्थापनांच्या अनुदानित वर्गांना शाळेच्या पहिल्या दिवशी २ लाख ८० हजार ३७६ पुस्तकांचे वाटप करणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांनी दिली. शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळणार असून एकही पात्र शाळा या योजनेपासून वंचित राहणार नाही.शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिली ते आठवीच्या मान्यता प्राप्त शाळांना सर्व विषयांची पुस्तके स्थानिक पातळीवर समारंभ पूर्व देण्यात येणार आहेत.यासाठी नियोजन तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी केंद्रप्रमुख हे वितरण करतील आठ दिवसात आढावा घेऊन केंद्रांतर्गत समायोजन करण्यात येणार असून बीट अंतर्गत समायोजनेसाठी आपल्या शिक्षण विस्तार अधिकारी यांना माहिती देण्यात येणार असुन बीट स्तरीय समायोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले

इयत्ता निहाय व विषय निहाय लाभार्थी संख्या व एकुण वाटप पुस्तके पुढील प्रमाणे :

इयत्ता १ली एकुण लाभार्थी ५ हजार ४३६, मराठी माध्यम ३ हजार ४९६,उर्दू माध्यम १०, सेमी इंग्रजी माध्यम १ हजार ९३०, एकुण १६ हजार ३०८. इयत्ता दुसरी एकूण लाभार्थी ५ हजार ४३६ मराठी माध्यम ३ हजार ५०८ उर्दू माध्यम १०, सेमी इंग्रजी माध्यम १ हजार ८४८ एकूण पुस्तके २१ हजार ७४४. इयत्ता तिसरी एकूण लाभार्थी ५ हजार ४३६ मराठी माध्यम ३६ पुर उर्दू माध्यम १० सेमी इंग्रजी माध्यम १ हजार ७७४ एकूण पुस्तके २७ हजार १८०. इयत्ता चौथी एकूण लाभार्थी ६ हजार ११९ मराठी माध्यम ४ हजार १५८ उर्दू माध्यम १० सेमी इंग्रजी माध्यम १ हजार ९५१ एकूण पुस्तके ३६ हजार १७४. इयत्ता पाचवी एकूण लाभार्थी ६ हजार ६२२ मराठी माध्यम ३ हजार २४९, उर्दू माध्यम १०, सेमी इंग्रजी माध्यम ३ हजार ३६३ एकूण पुस्तके ४६ हजार ३५४. इयत्ता सहावी एकूण लाभार्थी ५ हजार ७४८, मराठी माध्यम २ हजार ८३, उर्दू माध्यम १२, सेमी इंग्रजी माध्यम ३ हजार ६५३ एकूण पुस्तके ४० हजार २३६ इयत्ता सातवी एकूण लाभार्थी ६ हजार २९८ मराठी माध्यम २ हजार ५९३, उर्दू माध्यम ११, सेमी इंग्रजी माध्यम ३ हजार ६९४ एकूण पुस्तके ४४ हजार८६, इयत्ता आठवी एकूण लाभार्थी ६ हजार ८२२ मराठी माध्यम २ हजार ८६०, उर्दू माध्यम ६ सेमी इंग्रजी माध्यम ३ हजार ९५६ अशा एकूण ४७ हजार ९१७ लाभार्थींना पुस्तके २ लाख ८० हजार ३७६ वाटप होणार आहे.

# आचेगाव सरपंच विश्रांती पाटील यांच्या अपात्रतेला 3 जुलैपर्यंत स्थगिती

**अतिरिक्त विभागीय आयुक्तांचा आदेश**



**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि.५ जून-**
आचेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील सरपंच विश्रांती पाटील यांना अतिक्रमण केल्याचे प्रकरणात जिल्हाधिकारी यांच्याकडून सरपंचपदासाठी अपात्र ठरविण्यात आले होते. याबाबत विश्रांती पाटील यांनी अतिरिक्त विभागीय आयुक्तांकडे अपील केले असता अपात्रता आदेशाला ३ जुलैपर्यंत स्थगिती मिळाली आहे.

सदर प्रकरणात कोणतीही सविस्तर चौकशी अथवा पंचनामा करण्यात आलेला नाही. तसेच, ग्रामपंचायत आचेगाव येथील दिनांक २२ सप्टेंबर २०२३ रोजीच्या मासिक सभेतील विषय क्र. ६ चे परीक्षण करता, अपीलार्थी यांचे नाव नमुना क्र.८ मध्ये अनावधानाने भोगवटादार म्हणून नोंदविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले असून संबंधित जागा प्रत्यक्षात रिकामी असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीने तयार केलेल्या अतिक्रमण यादीत अपीलार्थीचे नाव समाविष्ट करताना कोणती कार्यवाही करण्यात आली, तसेच या संदर्भात अपीलार्थींना नोटीस बजावण्यात आली होती किंवा कसे, याबाबत कोणतीही माहिती किंवा स्पष्टता जिल्हाधिकारी यांच्या निर्णयामध्ये आढळून येत नाही. त्यामुळे अपीलार्थी हे शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्याचा उपभोग घेत आहेत किंवा कसे? याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडील मूळ नस्तीचे आणि ग्रामपंचायतीकडील संबंधित कागदपत्रांचे सखोल परीक्षण करणे अत्यावश्यक आहे. सदर तपासणीस काहीसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. या दरम्यान, अपीलार्थी त्यांच्या कायदेशीर अधिकारांपासून वंचित राहू नयेत, यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा निर्णय स्थगित ठेवणे आवश्यक आहे, असे वरील विवेचना आधारे श्रीम. कविता द्विवेदी, अतिरिक्त विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून स्थगिती आदेश पारित केले आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी विवाद अर्ज क्र.२८/२०२४ मध्ये दि.६ मे २०२५ रोजी दिलेल्या आदेशास पुढील सुनावणी दिनांकापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी दि.३ जुलै २०२५ रोजी नेमणेत येत आहे. ग्रामपंचायत आचेगाव यांचेकडील प्रकरणाशी संबंधित मूळ कागदपत्रे प्राप्त करून घ्यावीत असे आदेश देण्यात आले.



## माढ्यातील १००महिलांनी घेतले अयोध्येत रामलल्लाचे दर्शन

**भगव्या साड्या आणि भगव्या टोप्या केल्या परिधान**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि.५ जून-**
माढा शहर आणि परिसरातील १०० महिलांनी अयोध्या येथे जाऊन प्रभु रामलल्लाचे मोठ्या भक्ती भावाने सामूहिकरित्या मंगळवार दिनांक ३ जून रोजी दर्शन घेतले. माढा शहरातील महिलांचे या दर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वच महिलांनी यावेळी भगव्या साड्या आणि भगव्या टोप्या घालून श्री रामाचे दर्शन घेतले. या विषयाची सर्वत्र चर्चा होऊन अयोध्येतील प्रसार माध्यमांनी याची दखल घेऊन टेली व्हिजनवर या संदर्भात बातमी दाखवली आहे.

याबाबतची अधिक माहीती अशी की माढा येथील सन्मतीनगर भागातील महिलांनी एकत्रित येत अयोध्या दर्शन चे नियोजन केले. या भागातील महिलांनी उत्स्फूर्त पणे सहभाग नोंदवला. २८ मे रोजी माढा येथून निघालेल्या या महिलांची विशेष ट्रीप ९ जून रोजी परत येणार आहे.

## उंदरगावचे प्रा.राजेंद्र तांबिले यांना पीएच. डी. पदवी संशोधनास विद्यापीठाची मान्यता



**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि. ५ जून-**
माढा तालुक्यातील उंदरगाव येथील व सध्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे इंग्रजी विभागात कार्यरत असलेले प्रा.राजेंद्र तांबिले यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची इंग्रजी विषयात डॉक्टरेट पदवी (पीएच.डी.) बहाल करण्यात आली आहे. पोस्ट ह्यूमन स्पेक्यूलेशन्स इन सिलेक्ट फिक्शन ऑफ ग्रेग इगन्स या विषयावर त्यांनी सादर केलेला संशोधन प्रबंध विद्यापीठात स्वीकारण्यात आला.

या प्रबंधात त्यांनी ऑस्ट्रेलियन विज्ञानकथा लेखक ग्रेग इगन यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास करताना पोस्टह्युमन संकल्पनांचे सखोल विश्लेषण केले आहे. या संशोधन कार्यात त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातील प्रा. डॉ. अक्षय सरवदे यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा.राजेंद्र तांबिले यांचे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग म नकुदळे, संस्थेच्या ऑडिट विभागाचे सहसचिव कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे तसेच इंग्रजी विभागासह कॉलेजचे सर्व सहकारी प्राध्यापकांनी व शुभचिंतकाने मन:पूर्वक अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## अंजनगाव येथे कृषी संकल्प आभियानातून मार्गदर्शन

**कृषी विभागाचा कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून -**
माढा तालुक्यातील अंजनगाव येथे आधुनिक कृषि तंत्रज्ञान आणि खरीप हंगाम पूर्व नियंत्रण प्रसारासाठी विकसित कृषी संकल्प अभियानातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

दि. २९ मे ते १२ जून २०२५ या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र म ोहोळ, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर, राष्ट्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांच्यामार्फत हे अभियान राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमा दरम्यान उपस्थित वैजनाथ चौगुले यांच्या डाळिंब बागेत भेट देऊन पाहणी केली. दरम्यान डाळिंब बागेमध्ये मर व तेल्या रोगाचे ओळखणी करून एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रातील डॉ. शिल्पा परशुराम यांनी केले. केंद्रीय भरड धान्य संशोधन संस्थेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. परशुराम पात्रोटी यांनी भरड धान्याचे पौष्टिक तत्त्वे, विकसित वाण, बियाण्यांची उपलब्धता, लागवड तंत्रज्ञान याविषयी सविस्तर माहिती दिली. कृषि विज्ञान केंद्र मोहोळचे विषय विशेषज्ञ (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान) दिनेश क्षिरसागर यांनी कृषि मालाचे मूल्यवर्धन, फळे व भाजीपाला निर्जलीकरण उद्योग, कडधान्य प्रक्रिया, आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना याविषयी सविस्तर माहिती दिली. विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण) डॉ. पंकज मडावी यांनी खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापन, आधारित फेरोमॅन ट्रॅप्स अशा विविध नवीन तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. विषय विशेषज्ञ, (मृद विज्ञान व कृषि रसायन शास्त्रं) श्रीम ती काजल जाधव-म्हात्रे यांनी माती व पाणी परीक्षण आधारित खत व्यवस्थापन याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. याप्रसंगी अंजनगावचे सरपंच प्रदीप चौगुले, उप कृषि अधिकारी संदीप ढोले, सहायक कृषि अधिकारी घोडके हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुयोग ठाकरे यांचे सहकार्य लाभले.

# निष्ठावंत आणि आदर्श किर्तनकार निर्माण होणे ही काळाची गरज : हभप डॉ. अनंत महाराज बिडवे




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ जून-**
आज किर्तनाचे अनेक प्रकार आणि किर्तनकार पहायला, ऐकायला मिळतात, परंतु निष्ठावंत आणि आदर्श किर्तनकार दिसून येत नाहीत. ते किर्तनकार नारदीय किर्तन क्लासेसच्या माध्यमातून घडावेत, असे प्रतिपादन ह.भ.प. डॉ. अनंत महाराज बिडवे यांनी केले. श्री स्वामी समर्थ कला आणि बहुद्देशीय मंडळ संचलित नारदीय कीर्तन क्लासेस च्या उद्घाटन समारंभ बिडवे महाराजांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी महाराजांनी बार्शी भूषण, किर्तन केसरी कै. करंदीकर बुवा यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. यावेळी मान्यवरांचा सत्कार क्लासच्यावतीने करण्यात आला. प्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ मार्गदर्शक ह.भ.प. डॉ.ना. पां. देशपांडे आणि क्लासेसचे संचालक ह.भ.प.प्रसादबुवा सहस्त्रबुद्धे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात देवर्षि नारद स्वामी, सरस्वती, श्री स्वामी समर्थ, कै. करंदीकर बुवा यांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात नारदीय किर्तन परंपरा आणि त्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेल्या क्लासेसची तसेच संस्थेमार्फत आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या कार्याची उद्दीष्टे संचालक प्रसाद सहस्त्रबुध्दे यांनी विषद केली. तर प्रमुख अतिथींचा परिचय तुषार गदगी यांनी करुन दिला.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. ना.पां. देशपांडे बोलताना म्हणाले की पालकांनी आपल्या पाल्यावर इतर संस्कार करण्याबरोबरच किर्तन कलेचेही संस्कार करावेत. जेणे करुन पाल्याचे व्यक्तिमत्व संस्कारित आणि बहुगुणी होण्यास मदत होईल.

या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहून शुभेच्छा देणाऱ्या कै. करंदीकर बुवा यांच्या स्नुषा कल्पना करंदीकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच बार्शी शहर आणि परिसरातील किर्तनकार सुनिल बुवा बडवे, सुयोग बुवा केसकर, केदार महाराज शिंदे यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच शहर आणि परिसरात संपन्न होणाऱ्या किर्तनांना साथसंगत करणारे वादक सुहास जोशी, सुहास शेटे, सिध्देश्वर मोरे यांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी शहर आणि परिसरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. या सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संचालिका ह.भ.प. दिपाली सहस्त्रबुद्धे यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे संचालक सर्वश्री तुषार गदगी, निलेश मांजरे, कैवल्य सहस्त्रबुद्धे यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. राहुल पालके यांचेकडून कवितांचे सादरीकरण



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.५ जून-**
पर्यावरण हा मानवी जीवनाचा एक अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. पर्यावरण व मानव यांच्या अतूट संबंधाचे वर्णन साहित्यामधून प्रतिबिंबित होते. ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त डॉ. राहुल पालके यांनी पर्यावरणाचे चिंतन करणाऱ्या कवितांचे सादरीकरण केले. 'अवनी'चा अनुप्रास या कवितेत त्यांनी वसुंधरेचे चिंतन केले आहे. 'निसर्गाची किमया' या कवितेत त्यांनी धबधबा, पृथ्वी ही प्रतीके वापरुन शब्दांच्या माध्यमांतून पर्यावरणीय घटकात जिवंतपणा बहाल केला आहे. 'हिमालयाचा वारसा' या काव्यरचनेत त्यांनी हिमालय मानवासाठी किती उपकारक आहे याचे चिंतन केले आहे. आसेतू हिमाचल कधी न थकतो, कधी न खचतो असे म्हणत ते हिमालयाची साक्ष देतात. भारताचा मुकुटम णी असे ते हिमालयाला संबोधन करतात. पर्वतराजीचे गीत या कवितेत उत्कटतेने येते. या कवितांमधून डॉ. पालके यांनी पर्यावरण व मानव या दोन घटकांचे साहचर्य स्पष्ट केले आहे. याचबरोबर त्यांनी अमिताव घोष या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या लेखकाचे पर्यावरण विषयक विचार यावर चिंतन केले. या दिनाचे निमित्त साधून त्यांनी पर्यावरण वाचवा, जग वाचवा असा संदेश दिला.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पर्यावरण दिनानिमित्त माढा नगरपंचायतीकडून वृक्षारोपण

**माढा, दि. ५ जून-**
माढा शहरातील शिवाजीनगर येथे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून माढा नगरपंचायतच्या वतीने खुल्या जागेत वृक्षारोपण करण्यात आले. तसेच या वेळी प्लास्टिक पिशवीचा वापर टाळून शहरातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन वापरात कापडी पिशवीचा वापर करावा असे आवाहन करण्यात आले.



यावेळी नगरध्यक्षा ॲड. मीनलताई साठे, मुख्याधिकारी नेहा कंठे, पाणी पाणीपुरवठा सभापती शबाना बागवान, महिला व बालकल्याण सभापती रेश्मा लंकेश्वर, नगरसेवक आजिनाथ माळी, नगरसेविका निर्मला थोरात, नगरसेवक मारुती पवार, अरविंद खरात, शिवाजी जगदाळे, मुन्ना बागवान, रमेश थोरात तसेच प्रशासकीय अधिकारी प्रदीप शिंदे, स्थापत्य अभियंता ओंकार सोनवणे, लेखापाल समीर नदाफ, अंतर्गत लेखापरीक्षक गजानन हांगे, पाणीपुरवठा अभियंता केशव पवार व प्रभागातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महत्वाचे...

## जलसंपदा विभागाचे क्षेत्रीय कार्यालय सांगोला येथे होणार : आ. देशमुख

**सांगोला, दि.५ जून-**
लवकरच जलसंपदा विभागाचे क्षेत्रीय कार्यालय सांगोला येथे होणार असल्याची माहिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली. यामुळे सांगोला तालुक्यात २० को.प.बंधारे व १४ लघु पाटबंधारे तलाव आहे. या प्रकल्पांचे देखभाल दुरुस्ती व सिंचन व्यवस्थापनाचे कामकाज करणे सोयीचे होणार आहे. सध्या या क्षेत्रातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना प्रशासकीय कामांसाठी दूरवरच्या कार्यालयात जावे लागते, ज्यामुळे वेळ आणि खर्च वाढतो. सांगोला तालुक्यातील एकूण जलसंपदा विभागाकडील प्रकल्प संख्या व सिंचन क्षेत्रांची गरज व येथील जलसंपदा विभागांशी संबंधित समस्यांचे त्वरित निराकरण व्हावे आणि स्थानिक पातळीवर जलसंपदा प्रकल्पांचे प्रभावी व्यवस्थापन व्हावे यासाठी सांगोला येथे जलसंपदा विभागाचे क्षेत्रीय कार्यालय स्थापन करण्याची मागणी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी पत्राद्वारे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. या मागणीची त्वरित दखल घेवून ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागास सूचना देत लवकरात लवकर क्षेत्रीय कार्यालय सांगोला येथे सूरू करण्याबाबत अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असल्याचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.






## रायगड वारीसाठी नातेपुतेतून १५ बसेस रवाना; शिवप्रसाद समूहाचे आयोजन

**नातेपुते, दि.५ जून-**
माळशिरस तालुक्यातील ५६ गावातून ७५० नागरिक राज्याभिषेक रायगड वारीसाठी बसमधून रवाना झाले असून शिवराज्याभिषेक रायगड वारीचा प्रारंभ अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, नातेपुते पोलीस स्टेशनचे सपोनी महारुद्र परजने, शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद मोरे व ऋतुजाताई मोरे यांच्या हस्ते झाला. नागरिकांना बस सेवेसह जेवण, नाश्ता, रेनकोट, टी-शर्ट शिवप्रसाद समूह तर्फे देण्यात आले आहेत. यावेळी पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांचा सत्कार शिवप्रसाद उद्योग समूहचे अध्यक्ष शरद (बापू) मोरे यांच्या हस्ते तसेच नातेपुते पोलीस स्टेशनचे एपीआय महारुद्र परजने यांचा सत्कार शिवप्रसाद उद्योग समूहाचे संचालक वैभव मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रमेश मोरे, अश्विनी मोरे, वैभव मोरे, तेजस मोरे, सुशांत पाटील, माऊली देशमुख, गणेश सोनवले, सुहास देशमुख, अभिजित भिसे, दिलीप सोरटे, अण्णा चिकणे, तुषार निकम आदि मान्यवर, कार्यकर्ते व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.



## माजी उपसरपंच पाटील यांचा सन्मान

**पिलीव, दि.५ जून-**
माळशिरस तालुक्यातील कुसमोडचे माजी उपसरपंच व पत्रकार संजय पाटील यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक संघटनांच्या वतीने सन्मान करणयात आला. माजी आ. रामभाऊ सातपुते, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकरीणी सदस्य के के पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, माळशिरस मंडळ अध्यक्ष नितीन मोहीते, नातेपुते मंडळ अध्यक्ष संजय देशमुख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अजित बोरकर, तसेच विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय, पत्रकार, नातेवाईक, मित्र मंडळी यांनी वाढदिवसानिमीत्त शुभेच्छा दिल्या. यावेळी सेट्रल हयुमन राईटचे जिल्हा अध्यक्ष रणजित सातपुते, ठेकेदार उमेशभाऊ सरवदे, सरपंच शहाजी लेंगरे, माजी सरपंच तुषार लवटे, हवालदार सतिश धुमाळ, भाजपचे शहराध्यक्ष प्रमोद भैस, अतुल नष्टे, लक्ष्मीनगरचे माजी उपसरपंच नाथा मदने, सरपंच शहाजी लेंगरे, विजय मदने, सुरज गोंजारी, कुमार राऊत,विनायक मदने, गोरख मदने, दादा येडगे, अक्षय गोजारी, वैभव राऊत, अमर गोंजारी, मगर, प्रगतशील बागायतदार काळे, नबाजी मदने, विनायक मदने, सुग्रीव मदने माजी सरपंच सुरेश सातपुते, अमोल वाघमारे, अक्षय सातपुते, सागर सातपुते, उत्तम मोरे, विलास मोरे, माऊली वाघ, माजी सरपंच तुषार लवटे, प्रमोद भैस, ज्ञानेश्वर सातपुते, यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## चांदापुरीतील शिबिरात ४१जणांचे रक्तदान

**पिलीव, दि.५ जून-**
माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथे अहील्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ४१ जणांनी रक्तदान केले. हे शिबीर शेतकरी राजा फाऊंडेशनचे अभिजीत जाधव व विजय बंडगर यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उदघाटन चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सरपंच तथा शेतकरी पतसंस्थेचे चेअरमन भजनदास चोरमले, भगवान सुळ, तात्यासाहेब चोरमले, डॉ. कुमार लोखंडे, अभिजीत जाधव, विजय बंडगर यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. रक्तसंकलन सोलापूर येथील अक्षय ब्लड बँकेच्या वतीने करण्यात आले.

# जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना मिळणार ४५ हजार ब्रास मोफत वाळू

- वाळू वाटपासाठी ११९ गट निश्चित
- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद
- वाळू तस्करांना आता तडीपारी नाही तर सबजेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**
शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रत्येक लाभार्थ्यांना ५ ब्रास मोफत वाळू देण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील जवळपास १ हजार लाभार्थ्यांना ४५ हजार ब्रास वाळू देण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाकडून आखण्यात आले असून, यासाठी जिल्ह्यातील ११४ ठिकाणी वाळू वाटप स्थळे निश्चित करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी आज (दि.५) माध्यमांशी बोलताना दिली.

जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यासाठी महाखनीज पोर्टलवर नोंदी घेण्यात येत आहेत. आतापर्यंत ६९८ लाभार्थ्यांची यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यात आली असून, सर्व तहसील पातळीवरुन त्यांना वाळू



वाटप करण्यात येणार आहे. यासाठी बायहॅन्ड त्यांना परमीट दिली जाणार आहेत. ही परमीट १ महिन्याच्या आत घेवून संबंधित गटावर गेल्यावर त्यांना वाळू मिळणार आहे. याशिवाय बेकायदा उपसा व वाहतूक प्रकरणात जप्त केलेली १७० ब्रास वाळूही १८३ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे. तर उर्वरित लाभार्थ्यांना २ ते ३ आठवड्यात प्रत्येकी ५ ब्रास वाळू देण्यात येणार आहे.

### २५२ लाभार्थ्यांना केले जागा वाटप

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलासाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना शासकीय जागाही देण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील पंचायत समितीकडून २ हजार ६६ लाभार्थ्यांना जागा देण्याचे प्रस्ताव प्राप्त आहेत. यात १ हजार २३५ लाभार्थ्यांचे प्रस्ताव परिपूर्ण आहेत. यातील २५२ लाभार्थ्यांना जागाही देण्यात आली असून, उर्वरीत लाभार्थ्यांना महिनाभरात जागा घरकुलासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचीही माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

### तहसीलदारांच्या आदेशानुसार वाळू तस्करांना 'सबजेल'

जिल्ह्यातील अवैध वाळू तस्कारांवर कडक कारवाई करण्याची मोहिम घेण्यात आली आहे. वाळू तस्करावर आता केवळ दंडात्मक कारवाई न करता त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येत आहे. पंढरपूरचे तहसीलदार यांनी २ वाळू तस्करांना सबजेलमध्ये ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सब जेलची कारवाई झाल्यानंतर जामिनासाठी एक लाख रुपये बॉण्ड आणि दोन सरकारी अधिकारी, कर्मचारी जामीनदार द्यावे लागणार आहे. वाळू चोरी करणाऱ्यांना अशी कठोर शिक्षा आपल्याकडेच देण्यात येत आहे. दरम्यान, आता जिल्ह्यातील वाळू, मुरूम, दगड आदींचे अवैध उत्खनन केले तर त्या केसमध्ये आता दंडात्मक कारवाई नाहीतर थेट एफआयआर फाडण्यात येणार असल्याचा इशाराही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिला आहे.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

- जिल्ह्यात सर्वत्र पर्यावरण दिन साजरा



## वृक्षमित्र मंडळी यांच्या वतीने मोडनिंब स्टेशन परिसरात वृक्षारोपण

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मोडनिंब येथील पर्यावरण गतिविधी वृक्षमित्र मंडळी यांच्या वतीने मोडनिंब रेल्वे स्टेशन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात ज्येष्ठ नागरिक, महिला, व्यायाम करणारे युवक, पतंजली परिवाराचे सदस्य यांचा सहभाग दिसून आला.गेल्या तीन वर्षांपासून या परिसरात वृक्षसंवर्धनाचे कार्य सातत्याने सुरू असून पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विविध झाडे लावण्यात आली.

पुण्यातून आणलेली वड, पिंपळ, चिंच, करंज, बहावा आदी पर्यावरण पूरक रोपे यावेळी लावण्यात आली. रेल्वे स्टेशन परिसर हिरवागार होण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने मोलाचे योगदान दिले.या उपक्रमात सुरेश वाडकर, विश्वनाथ बेलगुफे, स्टेशन प्रबंधक शिवाजी श्रीरामे, गणेश कांबळे, तानाजी इंगळे, संतोष सुर्वे, हनुमंत कुंभार, पिंटू गायकवाड, दत्ता जाडकर, मधुकर एडके, मधुकर शिंदे, वीरण कुलकर्णी, खांडके गुरुजी, नागनाथ मोहोळ, संजय लोखंडे, मारुती वाघ, शंकर जाधव, नागनाथ काळे, विलास कांबळे, सतीश गांधी, सुरेजाडकर, हनुमंत चोपडे, बुद्धिबळ, सोहम लक्ष्मण नारनवर, आनंद माळी, शंकर आदलिंगे, सोहम नारनवर, सुरेश लादे आदींनी उत्साहाने सहभाग नोंदवला.मोडनिंब रेल्वे स्थानकाचे स्टेशन प्रबंधक शिवाजी श्रीरामे यांनी विशेष सहकार्य लाभले. पर्यावरण दिन साजरा करताना उपस्थित सर्वांनी प्रत्येकाने एक झाड लावा आणि जग वाचवा हा संदेश दिला.



## करमाळा येथे वृक्षारोपण व स्वचछता अभियान

करमाळा नगरपालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाचे महत्त्व आणि त्याची जोपासना करण्याची गरज यावर भर देत, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी हा दिवस विशेषत्वाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात नगरपालिकेच्या आवारात वृक्षारोपण करून करण्यात आली. मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी स्वतः वृक्षारोपण करून या अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी नगरपालिकेचे कर्मचारी, स्थानिक नागरिक, आणि संख्येने उपस्थित होते. पर्यावरणाचे संतुलन राखणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे आवाहन मुख्याधिकारी तपसे यांनी यावेळी बोलताना केले. प्लास्टिकमुक्त करमाळा हे ध्येय ठेवून करमाळा शहरात प्लास्टिक कचरा गोळा करण्यावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. नागरिकांना आपल्या परिसराची स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात आले. करमाळा नगरपालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भविष्यातही असेच उपक्रम राबवून करमाळा शहर अधिक हरित आणि स्वच्छ बनवण्याचा मानस मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी व्यक्त केला.



## वैराग नगरपंचायतीतर्फे विविध प्रजातीच्या रोपांची लागवड

वैराग नगरपंचायतीच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील विद्यामंदिर कन्या प्रशाला आणि विद्या मंदिर प्रशाला, वैराग येथे भारतीय प्रजातीच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. थीमनुसार प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करण्याचे आवाहन मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी केले. शहरातील नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा दैनंदिन जीवनामध्ये वापर न करता त्याला पर्यायी वस्तूंचा वापर करावा असे आवाहन उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांनी केले. आपल्या वसुंधरेच्या रक्षणासाठी जास्तीत जास्त भारतीय प्रजातीचे झाडांची लागवड वैराग शहरात करण्याचे आवाहन नगराध्यक्षा सुजाता डोळसे यांनी केले. यावेळी आरोग्य व दिवाबत्ती सभापती नागनाथ वाघ, पाणीपुरवठा सभापती अतुल मोहिते, संगमेश्वर डोळसे, सतीश सुरवसे, आनंद घोटकर, संजय झाडमुखे, राजू मिर्झा, रोफ बागवान, अक्षय ताटे, कुमार काळोखे, खंडेराव घोडके विद्यामंदिर संस्थेचे चेअरमन भूषण भूमकर, मुख्याध्यापक करंडे सर, नगरपंचायत अधिकारी, कर्मचारी आणि शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# महिलांनी केले ४२५ झाडांचे रोपण; एकता महिला मंचचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ जून-**
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बार्शी तालुक्यामध्ये एकता महिला मंचाच्या वतीने वृक्ष लागवड महाअभियानात सुमारे ४२५ झाडांचे रोपण विविध गावांमध्ये करण्यात आले. पर्यावरणदिनी केवळ वृक्ष लागवड न करता त्यांनी ती झाडं दत्तक घेतली असून विविध प्रकारची झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही सदस्यांनी घेतली आहे. गौडगाव येथील कविता दसवंत आणि अन्य सदस्यांनी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात लागवड केली. या वृक्षांचे संगोपन करण्याचा निश्चय करून ते झाड दतक घेण्याचा निर्णय यावेळी सदस्यांनी केला.

यावेळी सिंदु दसवंत, सविता दसवंत, सुखनंदा सुरवसे, वैष्णवी सुरवसे, गीता सुरवसे, महादेवी माने, मनीषा सुतार, उषा सुतार, बालिका सुतार, कांचन सुतार, दिपाली काजळे, कोमल काजळे,अरुणा काजळे, उषा गरड, सविता भड, पद्मा महाडिक,वसुधा कुंभार आदि सदस्य उपस्थित होते. भालगाव येथील प्रमुख पूजा दराडे आणि अन्य सदस्यांनी मोकळ्या परिसरात लागवड केली. यावेळी पूजा दराडे, स्वाती पाटील, स्वाती ढवळे,आणि इतर सदस्य उपस्थित होत्या. बार्शी येथील प्रमुख वर्षा नलावडे आणि अन्य सदस्यांनी हॅपी थॉट कासारवाडी रोड या ठिकाणी वृक्षारोपण केले. यावेळी झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला. तसेच लहान मुलांना झाडांचे महत्व समजाऊन सांगीतले. यावेळी वर्षा नलवडे, कांचन लोखंडे, ,सुप्रिया गायकवाड, राणी शिंदे,अश्विनी कुरा, स्मिता सातपुते, गीतांजली




काकडे आदीसह सदस्य उपस्थित होते. तांदुळवाडी येथील प्रमुख नुरजहा शेख आणि अन्य सदस्यांनी बार्शी धाराशिव रोडलागतच्या ठिकाणी वृक्षारोपण केले. यावेळी मैनाबाई जाधव, ऐकलाज शेख, राजश्री जाधव, रत्नमाला पाडूळे, जमना सोनवणे आदिसह सदस्य उपस्थित होत्या. सारोळे गावातील सदस्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसरात वृक्ष लागवड केली.

यावेळी स्वाती चौधरी, पुजा भोसले, प्रिया गाटे, गुणंवती चौधरी, सोनाली मुंबरे, सुजाता गाटे, पार्वती चौधरी, रेशमा करंडे, पुजा चौधरी, सविता गाटे, रेशमा करंडे सदस्या उपस्थित होत्या. मळेगाव येथेही वृक्षलागवड केली यावेळी सविता आपुणे, मीनाक्षी गडसिंग व अन्य सदस्या उपस्थित होत्या. दहिटणे येथे लक्ष्मी सुतार, हेमा कावरे, दगडू जगझाप,सुरेखा कोळी, सखु माने, केसर जगझाप ,निमा कोळी,इ सदस्या यावेळी उपस्थिती होत्या. मालेगाव (ता. बार्शी) येथे राधा नाईकवाडी, प्रतिभा नाईकवाडी, साधना भुसारे, शितल नाईकवाडी, नंदाबाई नायकवाडी, सुनंदा नायकवाडी, सुषमा नायकवाडी, मनीषा नाईकवाडी, वैशाली नाईकवाडी, लक्ष्मी खुणे या सदस्यांनी वृक्षारोपण केले. कोरफळे (ता. बार्शी) येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात वृक्षलागवड करून झाडे दत्तक घेण्याचा निर्णय घेऊन, झाडे लावा झाडे जगवा असा सामाजिक संदेश दिला.यावेळी तेजश्री घेमाड, सीमा चव्हाण,अमृता घेमाड व अन्य उपस्थित होत्या. वैराग शहरातील जयमाला कदम, शोभा गेजगे, पुष्पा कटकदौंड, नीता भाडोळे, अर्चना शेळके, मंजुषा गवळी, वंदना गायकवाड, भारती काटमोरे व सदस्यांनी सहभाग घेतला. मुंगशी (आर) (ता. बार्शी) येथील सदस्यांनी वृक्षलागवड करून, झाडे दत्तक घेण्याचा निर्णय घेतला यावेळी लक्ष्मी कुरुंद, गीता कुरुंद, अमृता कुरुंद,शर्मिला कुरुंद इ सदस्या उपस्थित होत्या. उपळे (दुमाला) (ता. बार्शी) येथे घरासमोरील परिसरात वृक्षारोपण करून,झाडे दत्तक घेण्याचा निर्णय घेतला.

यावेळी विद्या जाधव, सोनाली जाधव, पद्मश्री जाधव, रोहिणी जाधव, निर्मला ढेंगळे, मालन जाधव, श्रावणी बुरगूटे, इ.सदस्या उपस्थित होत्या. जामगांव या ठिकाणीही वृक्षारोपण करून झाडे दत्तक घेण्यात आली. यावेळी पल्लवी भालेराव, ज्योत्स्ना भालेराव, सुलक्षणा पाचकडवे, कांता गायकवाड, ऐश्वर्या मस्के, विजया गायकवाड, माधुरी मस्के इ. सदस्या उपस्थित होत्या. गोरमाळे येथे सुशीला सोनवणे,लक्ष्मी बसवंत, वैशाली लीगाडे इ सदस्या उपस्थित होत्या. चिखर्डे येथे शैला गवळी, हर्षा गवळी, अर्चना गवळी, सोनाली कोंढारे, सुनिता मोहिते, नीता मोरे,ज्योती जाधव, हर्षदा मोहिते इ सदस्या उपस्थित होत्या. रुई येथील सदस्यांनी त्यांच्या घरासमोरील परिसरात वृक्षारोपण केले. यावेळी ज्योती ठोकळ, भाग्यश्री पावले, स्वाती चव्हाण, दिपाली मोरे, सोनाली भोसले इ सदस्या उपस्थित होत्या. सुर्डी येथील सदस्यांनी त्यांच्या शेतातील बांधावर वृक्षलागवड करून ते झाड दत्तक घेण्यात आले. यावेळी अर्चना आगलावे, वैशाली डोईफोडे, सुनीता लंबे, छाया आगलावे, छाया माळी, गोकर्णा माळी व सदस्या उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी धनश्री हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. नागेश मलमे, देवराज स्टील सेंटरचे प्रशांत कासार यांनी विशेष सहकार्य केले. तसेच या उपक्रमाचे नियोजन एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांनी केले होते.